# हितगुज




अंक ६२ : गोवा संमेलन विशेषांक : जून २००५






**प्रमुख पदाधिकारी** : <u>गोमंतक परिवार</u> - अपूर्वा अरुण, सदाशिव नारायण, राजाराम रामचंद्र, कालिदास बालकृष्ण . <u>मराठे प्रतिष्ठान</u> - आनंद यशवंत, लक्ष्मण शंकर, मोहन सदाशिव, प्रभाकर दामोदर

प्रास्ताविक


अपूर्वा अरुण

आभार


प्रसाद वसंत


निवेदन - प्रदीप अनंत , शुभदा दीपक

**पदाधिकाऱ्यांचे स्वागत -**


स्वागताध्यक्ष


पुरुषोत्तम परशुराम


नीलकंठ परशुराम


सीताराम यशवंत


देऊ गोविंद


प्रसाद वसंत वामन गणेश

**स्मरणिका प्रकाशन**


कृष्णा काशिनाथ- संपादक




डॉ.सीमा शाम



**श्रेष्ठ कुलबांधवांचा सत्कार**


डॉ.रमा, डॉ.रविकिरण


कालिदास बालकृष्ण


हनुमंत मोरेश्वर (हमो)


श्रीधर केशव


अनोखा स्वागत कक्ष

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

मप्र

# हितगुज

गोवा संमेलन विशेषांक

अंक ६२ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून २००५

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## गोवा संमेलन विशेषांकाबाबत

आठवे अखिल भारतीय मराठे परिवार संमेलन गोव्यांत ३० एप्रिल व १ मे रोजी थाटामाटात संपन्न झाले. २५ वर्षांपूर्वी १९८० एप्रिलमध्ये गोव्यातच भरलेल्या पहिल्या संमेलनात मराठे प्रतिष्ठानची स्थापना करण्याचा निर्णय झाला होता. त्यामुळे हे प्रतिष्ठानचे रौप्य महोत्सवी वर्ष समाप्ती अधिवेशन.

विशेष म्हणजे हे अधिवेशन गोव्यातील बिंबल या आडवळणाच्या रम्य वनश्रीने नटलेल्या गावात घेण्यात आले आणि उपस्थित कुलबांधवांना आपली मूळ जीवनपद्धती कशी होती त्याचे दर्शन झाले. अनेकांना ते भावले असे त्यांनी संमेलनात व नंतर समक्ष व पत्राद्वारे समजले.

या अशा ऐतिहासिक संमेलनाबाबत साद्यंत माहिती शक्यतो सचित्र ग्रथित करण्याच्या दृष्टीने यासाठी हितगुजचा खास अंक आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध करावा असा प्रस्ताव संमेलन आयोजकांकडून आला. मुख्य प्रश्न होता तो खर्चाचा. या अंकाचा जादा खर्च संमेलन खर्चातून केला जाईल असे आयोजकांनी सांगितले आणि हा प्रश्न चुटकीसरशी सुटला. म्हणून हा अंक गोवा संमेलन विशेषांक म्हणून आकर्षक स्वरूपात, मोठ्या आकारात प्रसिद्ध होत आहे.

यातील साहित्य तीन गटात विभागले आहे. पहिल्या विभागात संमेलनाचा तपशीलवार आढावा आहे. दुसऱ्यात सभासद वृत्त आणि दोन विशेष काही करणाऱ्या कुलबांधवांचा परिचय आहे. तिसऱ्या विभागात प्रामुख्याने सभासदांचे साहित्य दिलेले आहे. याशिवाय मुखपृष्ठापासून चारही कव्हर पानांवर आणि आतील दोन पानांवर संमेलनाच्या स्मृति जागवणारी छायाचित्रे दिली आहेत.

यासाठी आवश्यक संमेलन वृत्त, संमेलनातील उपस्थित कुलबांधव, विविध क्षेत्रातील विशेष कर्तबगारीबद्दल सत्कारित कुलश्रेष्ठ, माहेरवाशिणी इ. माहिती आणि संमेलनाची छायाचित्रे अशी सर्व सामग्री कालिदास मराठे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने पुरविली.

अशा प्रकारच्या खास अंकासाठी नेहमीच

### स्मरण पूर्वसूरींचे




प्रतिष्ठानच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीतले तीन बिनीचे शिलेदार संस्थापक संवर्धक म्हणजे

* १९९० पासून निधनापर्यंत अव्याहत २० वर्षे नेतृत्व करणारे **कार्याध्यक्ष कै. सुरेशभाऊ**
* प्रतिष्ठानचे भीष्मपितामह निवृत्त पोलीस कमिशनर **कै. श्रीधर परशुराम तथा बापुसाहेब**
* प्रतिवर्षी प्रतिष्ठानचा वर्धापनदिन दिमाखदारपणे साजरा करणाऱ्या पुणे शाखेचे शिल्पकार **कै. वामन आत्माराम तथा आण्णा**

हे तिघेहि आज आपल्यात नाहीत. त्यांना

**समस्त मराठे परिवारातर्फे कृतज्ञतापूर्वक वंदन.**




### शाही ब्रिज टूर्नामेंट : १९ जून २००५

मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंद यशवंत यांच्या वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिवर्षी **मामा मराठे ब्रिज स्पर्धा** (Pair Progressive) आयोजित केली जाते.

या वर्षी ही स्पर्धा **१९.०६.०५ रोजीं ठीक सकाळी ९ वाजतां** सुरू होईल. स्पर्धकांनी आपली नांवे त्याच दिवशी सकाळी ८.४० पर्यंत नोंदवावी. पत्ता: लक्ष्मीकेशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड रोड, खोपट, ठाणे. **फोन : २५४७२७७१**

## मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

वेबसाईट : www.marathepratishthan.org

संमेलनस्थळी येण्यास सुरवात झाली होती. त्यांच्यासाठी सकाळी ८ वाजल्यापासून स्वागतकक्षात गोमंतकीय कुलबांधव स्वागतास जातीने उपस्थित होते. सगळे अगदी खुशीत होते. कढीचे पोहे आणि उपीठाचा नाश्ता - कढण घेत, गप्पा-गोष्टी-हास्यविनोदाने खेळीमेळीचे वातावरण निर्माण होत होते.

योजिलेल्या कामाचा शुभारंभ परमेश्वराला साक्षी ठेवून कार्य निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी तसेच ब्राह्मणाने नित्य आन्हीके तरी पार पाडावीत अशा काहीशा पार्श्वभूमीवर सकाळी ठीक १० वाजता लघुरुद्राला श्री. विष्णू पांडुरंग यांच्या अधिपत्त्याखाली सुरवात झाली. रुद्र म्हणणाऱ्यांना देण्यासाठी पळी-पंचपात्री, ताम्हण, सोवळे-उपरणे कुलबांधव श्री. वा. ग. मराठे यांनी दिले. श्री. कृष्णा काशिनाथ, श्री. काशिनाथ कृष्णाजी, श्री. चिंतामणी त्र्यंबक (ठाणे), श्री. देऊ गोविंद, श्री. मनोहर शंकर, श्री. विनायक शिवराम, श्री. सदाशिव नारायण, श्री. यशवंत सीताराम, कु. अमोघ अरुण आदी कुलबांधवांनी हा लघुरुद्र पूर्ण करुन श्री व्याडेश्वराचे आशीर्वाद घेतले. पौरोहित्य केले भालचंद्र दामोदर भावे यांनी. या सोहळ्यासाठी दक्षिणा म्हणून रु. ५०० श्रीमती शालिनी धुंडिराज, मुंबई यांनी देऊन आपली सेवा व्याडेश्वर चरणी रुजू केली.

ठीक १२.३० वाजता आरती, तीर्थप्रसाद झाल्यावर भोजनाचा कार्यक्रम पार पडला. जेवणात उडदामेथी, फणसाची भाजी, पंचामृत, गऱ्याचे पापड यासारख्या खास गोमंतकीय पदार्थांची रेलचेल होती. गोव्याबाहेरून आलेल्या बांधवांनी प्रत्येक पदार्थाचे नाव विचारीत, त्याची वाखाणणी करीत ते चवीने जेवले.

दुपारी बरोबर ३ वाजता संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्याला प्रारंभ झाला. सुरवातीला पाच सुहासिनींनी नऊवारी साडी नेसून हातात पंचारती घेऊन मान्यवरांना ओवाळले व त्यांना व्यासपीठावर आणून स्थानापन्न केले. व्यासपीठावर मराठे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. आनंद यशवंत, कार्यवाह श्री. मोहन सदाशिव, कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर दामोदर, समन्वयक श्री. लक्ष्मण शंकर तसेच गोमंतक मराठे परिवाराचे अध्यक्ष श्री. राजाराम रामचंद्र, स्वागताध्यक्ष श्री. सदाशिव नारायण, कार्यवाह सौ. अपूर्वा अरुण व प्रमुख आयोजक श्री. कालिदास बाळकृष्ण हे उपस्थित होते.

सर्वप्रथम जे कुलबांधव आज आपल्यात हयात नाहीत अशा ज्ञात व अज्ञात कुलबांधवांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली व श्री. काशिनाथ कृष्णाजींनी शांतिमंत्र म्हटला. उपस्थितांच्या स्वागतासाठी चि. अनिशप्रसाद, चि. प्रणव, कु. अपर्णा व कु. आभा यांनी विघ्नहर्त्याची, सरस्वतीची व कुलदेव व्याडेश्वराची प्रार्थना करून मधुर स्वरात स्वागत-गीत गाईले. 'जय व्याडेश्वर जय सिद्धेश्वर' च्या तालात मंडपातील उपस्थित तल्लीन झालेले दिसत होते. या स्वागतगीताचे तालदिग्दर्शन श्री. बाळकृष्ण लक्ष्मण यांनी केले. होते.

### स्वागतगीत

**- सौ. शुभदा दीपक** (पृ. ५३३),
शिरोडा, गोवा.

जय व्याडेश्वर, जय सिध्देश्वर, जय सातेरी माते
वंदुनिया पूज्य भावे, स्वागतास सिध्द व्हावे
दुर्गादेवी, आंबेजोगाई द्या आशीर्वचनाते ।।धृ।।
गोमंतभू पावनभूमी, प्रसाद परशुरामाचा
संमेलनास स्थल उचित बिंबल ग्रामांत
पुरुषोत्तम निवासे होतसे संपन्न संमेलन ते
स्वागतास सिध्द आम्ही,
करू वंदन कुलबांधवांते ।।१।।
पथप्रदर्शक सुरेशभाई कुलभूषण मराठ्यांचे
घेऊनी स्फूर्ती तयांची
होती थोर ज्ञानवंत, कुलवंत,
धनवंत कुलबांधवाते ।।२।।
पूजाअर्चा नित्यपाठ दैनंदिनी ही आम्हाते
करी वाचन आणि पठण करिती नित्य आन्हिकांते
प्रात:समयी स्मरण करिती
अपुल्या दिग्गज पूर्वजां ।।३।।
जितुके गुण तितुकेच दोष परि न हार मानिती
हिंमतवान, कार्यकुशल जिद्दी असती हे कुलवंत
धन्यवाद या मंगल समयी,
निज थोर कुलबांधवाते ।।४।।
'हितगुज' अमुचा असे आरसा
गुणगौरव तो होतसे खासा
वधुवरांचाही तो कवडसा
नवोदित लेखक-कवी येती उदया,
धरुनी तयाच्या अंगुलीते ।।५।।
'चित्पावनी' ही भाषा अमुची
खासियत ती गोमंतकियांची
घ्या स्वाद सुग्रास भोजनास्रवे तयाचा
हात जोडुनी त्रिवार वंदन,
या गोमंतकी सर्वांचे ।।६।।

स्वागत सुरांनी तसेच शब्दसुमनांनीही व्हावे असा संकेत असल्याने **स्वागताध्यक्ष मा. श्री. सदाशिव नारायण** यांचे सर्व उपस्थितांना उद्देशून छोटेसेच पण 'मराठी आणि चित्पावनीचा सुरेख संगम' साधून अचूक शब्दात केलेले **स्वागतपर भाषण** सर्वांची मने जिंकून गेले. दोन दिवसांच्या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर **सौ. अपूर्वा अरुण यांनी समर्पक असे प्रास्ताविक** केले. व्यासपीठावरील **मान्यवरांचा अगदी मोजक्या शब्दात परिचय** करून दिला **सौ. शुभदा दीपक** यांनी.

मान्यवरांच्या परिचयानंतर पुष्पसारस्वताने म्हणजेच पुष्प व पुस्तक प्रदान करून पाहुण्यांचे स्वागत यजमान कुलबांधव श्री. पुरुषोत्तम परशुराम, श्री. नीळकंठ परशुराम, श्री. सीताराम यशवंत, श्री. देऊ गोविंद, श्री. सुरेश ऊर्फ गणेश शंकर, श्री. अजित लक्ष्मण, श्री. मनोहर शंकर व सौ. प्राजक्ता प्रदीप यांनी केले. कार्यक्रमाचा मुख्य गाभा म्हणजे दीपप्रज्वलनाने सोहळ्याची शानदार सुरवात करणे. तत्पूर्वी शकुनाचा **नारळ वाढवून** (नारळ फोडणे हा खास गोमंतकीय शब्द) गोमंतक मराठे परिवाराचे अध्यक्ष **श्री. राजाराम रामचंद्र यांच्या हस्ते शुभारंभ** करण्यात आला. तद्नंतर श्री. व्याडेश्वर व श्री. केवलानंद सरस्वती यांच्या फोटोची पूजा पुष्पमाला व फूल वाहून **समन्वयक श्री. लक्ष्मण शंकर** यांनी केला. प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष **श्री. आनंद यशवंत** यांनी दीपप्रज्वलन केले. तत्क्षणी चि. पूर्वा प्रसाद या चिमुरडीने 'दीपज्योती परमज्योती दीपज्योती जनार्दना' गायला सुरवात केली आणि मंद तेवणाऱ्या त्या आत्मज्योतीच्या प्रकाशात मधुर गाण्याच्या लयीत संमेलन सोहळ्याचे रीतसर उद्घाटन झाले. सुवासिक सोनचाफ्याच्या फुलांनी या सोहळ्याला अपूर्व असा बहर आणला. (विशेष म्हणजे ही सर्व सोनचाफ्याची फुले

स्वागताध्यक्षांच्या बागेतलीच होती.)

गोमंतक मराठे परिवारातर्फे तयार करण्यात आलेल्या 'पालखी' या स्मरणिकेचे प्रकाशन कार्याध्यक्ष श्री. आनंद यशवंत यांच्या शुभहस्ते झाले. तत्पूर्वी **स्मरणिका समिती प्रमुख श्री. कृष्णा काशिनाथ** यांनी 'प्रतिष्ठान ही 'पालखी' असून आपण सर्व कुलबांधव हे या पालखीचे भोई आहोत.' अशा शब्दात पालखीचे गुपित सांगून प्रत्येक कुलबांधवाला प्रतिष्ठानसाठी अविरतपणे कार्य करीत रहावे असेच सूचित केले. या स्मरणिकेचे **संपादन साहाय्य,** मुद्रण-शोधन आणि मांडणी **श्री. मोरेश्वर हरी** यांनी केली होती. शेवटी **कार्यवाह श्री. मोहन सदाशिव** यांचे छोटेसे भाषण झाले.

यासोबतच मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीवर असलेल्या सर्व उपस्थित पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ, पुस्तक व सुवासिक फूल प्रदान करून सत्कार तथा गौरव करण्यात आला. सत्कारमूर्तीपैकी काहींनी विशेषत: सी. गो. खांबेटे, सौ. सुमेधा प्रभाकर, श्री. वामन गणेश, सौ. नीलांबरी आणि विशेष म्हणजे कुमार सौरभ सुरेश यांनी तरुणांनी प्रतिष्ठानच्या कार्यात रस घ्यावा असे सत्काराला उत्तर देताना सांगितले. उद्घाटन सोहळ्याची सांगता **कार्यवाह श्री. प्रसाद वसंत यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने** झाली. वरील संपूर्ण कार्यक्रमाचे **सूत्रसंचालन सौ. शुभदा दीपक व श्री. प्रदीप अनंत** यांनी केले.

यानंतर चहाबरोबरच सर्व उपस्थितांना भावलेला आगळा वेगळा कार्यक्रम 'भाजलेले काजू फोडून खाणे' श्री. सीताराम यशवंत व श्री. गणेश शंकर यांच्या सहकार्याने पार पडला. श्री. गणेश शंकर यांची ही कल्पना सर्वांनाच आवडली.

संध्याकाळी ६ ते ७ ची वेळ होती परस्पर परिचयाची. यात वय ६ ते ३५ वर्षापर्यंत युवा गट आणि ३५ वर्षावरील प्रौढ गट अशा दोन गटात विभागणी झाली. युवागटात चि. पूर्वा प्रसादने घातलेल्या सूर्यनमस्कारानी सुरवात झाली. त्यानंतर प्रत्येकाने थोडक्यात स्वत:चा परिचय करून दिला व **श्री. प्रभाकर दामोदर यांनी योगावर (पहिले पाच व्यायाम) मार्गदर्शन** केले व चर्चा घडवून आणली.

प्रौढ गटात कार्यक्रम थोडा वेगळ्या स्वरूपात झाला. पुणे, मुंबई, गोवा-कोकण विभाग सोडून इतर ठिकाणाहून आलेल्या बांधवांना प्राधान्य देण्यात आले व त्यांचा परिचय मुलाखत, प्रश्नोत्तरे अशा स्वरूपात करून घेण्यात आला. त्या त्या भागातील कुलबांधवांची संख्या, त्यांच्या समस्या जाणून घेऊन तिथे प्रतिष्ठानचे कार्य वाढवावे हा त्यापाठीमागे उद्देश होता. मध्यप्रदेश, विदर्भ, सोलापूर, गुजरात, बंगलोर, कारकल, बिहार-गया आदी ठिकाणाहून आलेले सर्व बांधव यात सहभागी झाले. कर्नाटकातील चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. भालचंद्र डोंगरेही यात सहभागी झाले होते.

महाराष्ट्रातून गया येथे स्थायिक झालेले श्री. प्रभाकर मराठे यांच्या तिथे जाऊन चौदा पिढ्या झाल्या तरी ते अस्खलित मराठी बोलतात. गया येथील 'पंड्ये' त्यांना देत असलेल्या वागणुकीचे उदाहरण त्यांनी सांगितले, ''मी दिवसाला एकदा मरतो व पुन्हा जिवंत होतो, म्हणून मी बळकट आहे.'' त्याचा खुलासा विचारताच ते म्हणाले, परगावहून कुणी जर आपणाला शोधीत आले आणि मराठे आहेत का ? असे विचारले असता, हे पंड्ये लोक 'मराठे मेले' असे बिनधास्त सांगतात. अशा प्रकारे सर्वांनीच खूप चांगला प्रतिसाद दिला. सर्वजण शेवटी 'मराठे प्रतिष्ठान' व 'चित्पावन संघ' बळकट करावा या मताशी सहमत होते.

यानंतर सर्वांच्या आवडीच्या सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरवात झाली. पहिल्या दिवशी फक्त गोमंतकातलेच कार्यक्रम होते. यात मुख्यत: देखणी, फुगडी हे कार्यक्रम झाले. फुगडी इतकी विविधांगी व छान झाली की 'पुन्हा एकदा' या स्वरूपात दुसऱ्या दिवशीही दाखविण्याचा आग्रह झाला. या कार्यक्रमाचे **सूत्रसंचालन कु. प्राची पुरुषोत्तम व मालती मधुकर** यांनी केले.

रात्रौ भोजनोत्तर ठीक १० वाजता कोकण व गोव्यात जत्रेमधून सादर केले जाणारे प्रसिद्ध मोचेमाडकर कंपनीचे दशावतारी नाटक दाखविण्यात आले.

आजचा (३० एप्रिलचा) विशेष - कळवा, जि. ठाणे येथील कुलबांधव श्री. चिंतामण त्र्यंबक व सौ. रोहिणी चिंतामण यांच्या लग्नाचा ४५वा वाढदिवस. सर्वांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. श्री. व सौ. नी त्यानिमित्त ५०१ रुपयांचा

---

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## संमेलन स्मृतिचिन्ह

मराठे प्रतिष्ठानचे रौप्यमहोत्सव वर्ष समाप्ती संमेलन बिंबल गोवा येथे ३० एप्रिल व १ मे २००५ रोजी संपन्न झाले. संमेलन सर्वार्थाने संस्मरणीय झाले. याची आठवण कायम रहावी यासाठी मराठे प्रतिष्ठानने चांदीचे स्मृतिचिन्ह (१० ग्रॅम) तयार केले आहे. (पहा मागील कव्हर - किमंत रु. २००)

**ज्या कुलबांधवांना स्मृति चिन्ह हवे असेल त्यांनी प्रतिष्ठानच्या अध्यक्षांना कळवावे.** पत्ता - आनंद यशवंत मराठे, मे. यशवंत विठ्ठल मराठे (प्रा.) लि., कौपिनेश्वर मंदिर, ठाणे (प.) ४००६०१.
फोन :(०२२) २५३३४७३५, २५३३२२२४.
email : supriya@yvmarathe.com

---

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## 'पालखी'चे गुपित

हे आठवे संमेलन शहरी जीवनापासून दूर, शांत व निसर्गाने नटलेल्या माडा-कुळागारांच्या कुशीत आयोजित करीत असल्याचे सांगण्यास सार्थ अभिमान वाटतो. गोव्यातील समुद्रकिनारे, पंचतारांकित हॉटेल्स, चर्चेस, मंदिरे या व्यतिरिक्त गोव्यात अजूनही कांही प्रेक्षणीय/लक्षणीय आहे याची जाणीव या संमेलनस्थळाने आपणा सर्वांस झाली असेलच.

स्मरणिकेचे मुखपृष्ठही याच धोरणावर केंद्रित आहे. समुद्रकिनारा, हिरवीगार शेती, बागायतीमधील फळफळावळीसह बहुतांश मराठे कुलबांधवांचे श्रध्दास्थान शिवलिंग व जननी यांचे बोधचिन्ह आणि उगवत्या सूर्याचा उष:काल ही संकल्पना यातून प्रतिबिंबित होते.

**प्रतिष्ठान ही 'पालखी' असून आपण सर्व कुलबांधव या पालखीचे भोई आहोत.**

- **कृष्णा काशिनाथ** (पृ.५२३), गोवा

देणगीही दिली. त्यांचे उर्वरित जीवन आरोग्यदायी व सुखाचे जावो.

**दि. १ मे २००५**

संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाची सकाळ. नाश्त्याला पाव-भाजी. ठीक ९.१५ ला कार्यक्रमांना सुरवात. पहिलाच कार्यक्रम होता व्याख्यान. विषय होता **पर्यावरण व भारतीय संस्कृती. वक्ते होते श्री. दिलीप कुलकर्णी. पाहुण्यांचे स्वागत व परिचय कु. तृप्ती शशिकांतने** करून दिला. श्री. दिलीप कुलकर्णी यांनी भारतीय संस्कृती ही पर्यावरणाशी समतोल साधणारी आहे हे विविध उदाहरणासहीत प्रभावीपणे मांडले. जीवनात शरीर आणि मनाची धारणा, समाजाची धारणा ही मर्यादित स्वरूपात सर्व उपभोग घेणारी आहे. कारण त्यामुळे निसर्गावर आक्रमण होत नाही.

> नव्या युगाची देशभक्ती
> सायकल आणि सौरशक्ती

म्हणूनच त्यांनी **आवाहन केले की, उपभोग नका सोडू. सोडा ती फक्त 'हाव'.** एकदा का 'हाव' म्हणजेच स्वार्थ दिसू लागला की प्रथम व्यक्तीचे अध:पतन होते. दुसऱ्या बाजूने पर्यावरणाची हानी होते व पर्यावरण संतुलन बिघडते. यासाठी आधुनिक अतिरेकी उपभोग टाळणे अपरिहार्य ठरले आहे. म्हणूनच 'तस्मात् तृष्णा' म्हणजेच मर्यादीत उपभोग निसर्गाच्या शोषणाकडून दोहनाकडे चला असा बहुमोल संदेश त्यांनी दिला.

त्यांच्या खळखळत्या झऱ्याप्रमाणे ओघवत्या वाणीने दिलेल्या विविध उदाहरणांनी श्रोतृवर्ग भारावून गेला. पर्यावरण संतुलनाचे महत्त्व त्यांना उमजले. **श्री. प्रदीप अनंत यांनी आभार** प्रदर्शित केले. श्री. दिलीप कुलकर्णी यांना शाल, श्रीफळ, पुस्तक व सुवासिक सोनचाफ्याचे फूल प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

**ठीक १०.३० वाजता खुल्या चर्चेला प्रारंभ झाला.** व्यासपीठावर प्रथितयश लेखक श्री. ह. मो. मराठे कर्नाटक चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. भालचंद्र डोंगरे, अध्यक्ष श्री. आनंद यशवंत, समन्वयक श्री. लक्ष्मण शंकर, प्रमुख आयोजक श्री. कालिदास बाळकृष्ण हे उपस्थित होते. **श्री. ह. मो. यांनी** 'ब्राह्मणाच्या कामगिरीचा वस्तुनिष्ठ ग्रंथ हवा' यावर ब्राह्मण समाजाला इतर ज्ञाती समाजाकडून कोणकोणत्या प्रकारे, कशी

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## श्री. दिलीप कुलकर्णी



इंजिनियरींगची पदवी घेऊन टेल्को कंपनीत कामाला लागले. परंतु पूर्वीपासूनच आपली जीवनशैली ही शक्य तेवढ्या कमी उपभोगाची हवी यासाठी निसर्गाशी अधिक जवळीक साधण्यासाठी खेडेगावात जाऊन राहण्याचा ध्यास असल्याने १९८४ मध्ये नोकरी सोडून विवेकानंद केंद्राचा पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम सुरू केले. 'विवेकविचार' या पत्रिकेचे संपादन सुरू केले.

वैदिक गणितावरील पुस्तके स्वखर्चाने प्रसिद्ध केली. पर्यावरणातील 'निसर्गायण' पुस्तक गाजले. त्यानंतर दरवर्षी एकेक पुस्तक लिहिले ज्यामध्ये दैनंदिन पर्यावरण, हसरे पर्यावरण, वेगळ्या विकासाचे वाटाडे, अणुविवेक ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. सन १९९३ प्रथम रत्नागिरी जिल्ह्यातील पंचनदी आणि त्यानंतर सन १९९५ कुडावळे येथे स्थायिक झाले. सन. २००१ पासून 'गतिमान संतुलन' ही मासिक पत्रिका सुरू केली.

या कामांत पत्नी सौ. पौर्णिमा यांची साथ त्यांना मिळते.

अवहेलना सोसावी लागते. कधी न ऐकलेले, वाचलेले भीषण आरोप ब्राह्मणावर कसकसे केले गेले आहेत हे विविध उदाहरणासहित स्पष्ट केले. त्या आरोपांची शहानिशा करण्याचे काम एक ज्ञातिबांधव म्हणून आपण करणार असे ते म्हणाले. न पेक्षा पुढच्या पिढीला हा 'इतिहास' वाचावा लागेल अशी भीती व्यक्त केली. प्रतिष्ठानच्या बाबतीत सर्वांनी टाळ्या वाजवून जेव्हा त्यांचे स्वागत केले तेव्हा ते विनोदाने म्हणाले, ''मी परिवारात आलो म्हणून तुम्हा सर्वांना आनंद होत आहे. पण मला मात्र दु:ख वाटते.''



भालचंद्र डोंगरे, हमो आणि आनंद यशवंत

चित्पावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष **श्री. भालचंद्र डोंगरे** यांनी आपण सर्व मतभेद विसरून एकसंघ राहिलो तरच ही सर्व आव्हाने पेलू शकणार आहोत असे स्पष्ट केले. यासाठी चित्पावन संघ मजबूत करणे गरजेचे आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. **श्री. कालिदास बाळकृष्ण** यांनी सर्व उपस्थितांसमोर '**मराठे प्रतिष्ठान**' पुढील आव्हाने थोडक्यात चर्चेसाठी मांडली.

**प्रतिष्ठानपुढील आव्हाने**

१) सर्व कुटुंबातील किमान दोन व्यक्तींनी प्रतिष्ठानचे सभासद व्हावे.
२) मुंबई येथे कार्यालय स्वत:च्या वास्तूत सुरू करणे.
३) मुंबई, पुणे, गोवा येथे पर्यटन कुटीर उभारणे.
४) 'हितगुज' त्रैमासिकाचे मासिकात रूपांतर करणे.
५) मराठे वेबसाईट अत्याधुनिक करणे.
६) पुढील अधिवेशन मंगलोर/ बडोदा/ नागपूर/ गुहागर येथे भरविणे.
७) कुलवृत्तांताची अद्ययावत आवृती काढणे.
८) गुहागर येथे व्याडेश्वर, श्री दुर्गादेवी - व्याडेश्वरी सेवेसाठी प्रतिष्ठानने कार्यक्रम आखणे.
९) चित्पावनी भाषेचा कुटुंबातील सभासदांनी उपयोग करणे

याानंतर खुली चर्चा करण्यांत आली. पण विशेषत: प्रत्येकाने ब्राह्मण-ब्राह्मणेतर किंवा 'मी कोणते कार्य केले' सारखे विषयाशी संबंधित नसलेले बोलणेच जास्त झाले. सर्व विषय योग्य त्या प्रमाणात हाताळले गेले नाहीत.

या चर्चेत खालील उपस्थितांनी भाग घेतला.

१) सी. गो. खांबेटे
२) श्री. कृष्णा काशिनाथ
३) श्री. प्रभाकर केशव - चित्पावनीचे संशोधन व भाषा संपन्न बनविण्यासाठी प्रयत्न.

४) श्री. मोहन सदाशिव
५) श्री. शरदचंद्र केशव
६) श्री. प्रभाकर गणेश - गुहागर येथे व्याडेश्वराची सेवा कार्यक्रम
७) श्री. विनायक केशव
८) कुमार सौरभ सुरेश - सर्वच विषय चांगले प्रत्येकाने आपल्याबरोबर आणखी एक आणावा असे प्रतिष्ठानचे कार्य वाढेल.
९) श्री. विजयकुमार भिकाजी
१०) श्री. पुरुषोत्तम विष्णू - ब्राह्मणाने ब्राह्मण्य राखल्यास मान आपोआप मिळतो तो मागावा लागत नाही.
११) श्री. परशुराम केशव
१२) श्री. केशव रामचंद्र
१३) डॉ. सौ. रमा रविकिरण - ब्राह्मणेतरांवर घणाघाती टीका. विविध उदाहरणे देऊन टीकाकारांचे पारिपत्य.
१४) श्री. गजानन मराठे - कुत्र्याचे कामच भुंकणे हे असते त्याकडे लक्ष न देता आपण आपले काम करावे. यश आपलेच निश्चित आहे.
१५) श्री. दिवाकर विद्वांस
१६) श्री. चिंतामण त्र्यंबक

वरील कुलबांधवांनी चर्चेत उत्स्फूर्तपणे, वेळेच्या बंधनाला न जुमानता सहभाग दर्शविला. समन्वयक श्री. लक्ष्मण शंकर यांनी 'आपण आपापले विचार लेखी स्वरूपात प्रतिष्ठानकडे पाठवून द्यावेत ते 'हितगुज' च्या माध्यमातून आम्ही सर्वांसमोर मांडू' असे उपस्थितांना आवाहन केले.

कालच्याप्रमाणेच आजही विविधांगी जेवण होते. 'मणगणे' हा आजचा खास गोड पदार्थ होता. हास्यविनोदात, एकमेकांच्या ओळखी-देखी नाती-गोती सांगत जेवण आटोपले.

ठीक ३ वाजता समारोप सोहळ्याच्या सत्राला प्रारंभ झाला. सर्वप्रथम सौ. मनीषा सीताराम, सौ. राधा देवू, सौ. सरस्वती राजाराम व सौ. अन्नपूर्णा वसंत या ज्येष्ठ महिलांनी **माहेरवाशिणांना हळद-कुंकू लावून खणा नारळाने ओटी भरली** व पुस्तक भेट देऊन सन्मानित केले. या सोहळ्यात सर्वात वयोवृद्ध माहेरवाशीण श्रीमती इंदूताई नामजोशी या होत्या. या जिव्हाळ्याच्या समयी प्रत्येकीने आपले पूर्वाश्रमीचे व आताचे नाव-गाव सांगून आपली ओळख करून दिली. या सर्व माहेरवाशिणी परिवाराच्या निमंत्रणाला प्रतिसाद देऊन संमेलनाला उपस्थित राहिल्यामुळे त्या कौतुकास पात्र ठरल्या आहेत. या सर्वांनी 'हितगुज' चे वर्गणीदार होऊन परिवाराशी असलेले नाते द्विगुणित करावे अशी आमची प्रेमळ सूचना.

माहेरवाशिणीबरोबरच **मराठ्यांच्या परिवारात विवाहबंधनाने प्रवेश केलेल्या नववधू** १) सौ. गिरीजा अजित, खोतोडे, २) सौ. गौतमी गजानन, व ३) सौ. श्रुती महेश, पाळीवेळगे, यांचेही यथोचित स्वागत करण्यात आले. श्री. सीताराम यशवंत यांच्या आग्रहाला मान देऊन त्यांनी उखाण्यातून नावेही घेतली हे विशेष. अशा प्रकारे एखादा लग्नसमारंभ असल्यासारखे कार्यक्रमाला पूर्ण घरगुती स्वरूप प्राप्त झाले होते. एकामागून एक सोहळा पार पडत होता. सर्वच उत्साह, आनंद दिसत होता.

ज्यांनी **पंचाहत्तरी ओलांडली आहे अशा वयोवृद्धांचे सत्कार करण्यात** आले. यांचे पूर्वायुष्य खडतर असले तरी ते खूपच उत्साही दिसत होते. कुलबांधवांकडून गौरव यासारखी आनंदाची व समाधानाची दुसरी कोणतीच गोष्ट नाही, असेच जणू त्यांच्या चेहऱ्यावरील प्रफुल्लित भाव सांगत होते. बाहेरगावहून येणाऱ्या कुलबांधवांची अथरुणा पांघरुणाची सोय व्हावी म्हणून गोधड्या शिवून ठेवणारी श्री. अरुण शिवराम यांची आई सौ. रमाबाई. कोणत्या शब्दात आपण त्यांचे कौतुक करणार ? आज या घडीला जे हयात नाहीत पण पूर्वकालात आपल्या कर्तृत्वाने ज्यांनी ज्यांनी यशशिखरे गाठली आहेत अशा **दिग्गज कुलबांधवांचेही निधनोत्तर सत्कार** करण्यात आले.

शेवटी विविध क्षेत्रात ज्या कुलबांधवांनी नाव कमावले आहे अशांचा सत्कार करण्यात आला. (सर्व सत्कारमूर्तींची नांवे असलेली यादी सोबत जोडली आहे.) ज्या कुलबांधवांनी या सोहळ्याला उपस्थित राहून सन्मान स्वीकारला व आयोजकांना उपकृत केले त्या सर्वांचे प्रतिष्ठान ऋणी आहे. तसेच ज्यांना काही कारणास्तव उपस्थित राहता आले नाही व ज्यांनी शुभेच्छा संदेश पाठविले अशा सर्वांचे प्रतिष्ठान ऋणी आहे.

मराठे प्रतिष्ठानला २५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल रौप्यमहोत्सवी सांगता सोहळ्याच्या या संमेलनात ज्यांनी ज्यांनी विशेष कार्य केले आहे, अशा कार्यकर्त्यांना, मराठे प्रतिष्ठानतर्फे संमेलन स्मृतिचिन्ह व कृतज्ञतापत्र देण्यात आले. कार्याध्यक्ष श्री. आनंद यशवंत यांनी त्याचे वाचन केले व अग्रक्रमाने प्रमुख आयोजक श्री. कालिदास बाळकृष्ण यांचा गौरव केला. संमेलनस्थळी मराठे कुलबांधवांव्यतिरिक्त ज्या चार हस्तींनी सर्वतोपरी मदत केली होती असे श्री. महादेव गणपुले, श्री. दामोदर भावे, श्री. प्रसाद बर्वे व श्री. अरविंद पाटील यांना सन्मानपूर्वक स्मृतिचिन्ह व कृतज्ञतापत्र प्रदान करण्यात आले. शिवाय आयोजन समितीतील सर्व सदस्यांना व इतर प्रत्येक समिती प्रमुखालाही स्मृतिचिन्हे व कृतज्ञतापत्रे देऊन त्यांचे गौरव करण्यात आले.

पूर्ण दोन दिवसीय सोहळ्याचा अभिप्राय, सभासदांचे मनोगत या कार्यक्रमात विविध विभागवार प्रतिनिधींनी आपापले संमेलनविषयीचे अभिप्राय तसेच पुढील कार्याच्या अपेक्षा सांगितल्या.

१) सर्वप्रथम **श्री. दिनकर रामचंद्र** - पाली-मुंबई यांनी या संमेलनाच्या आयोजनात कसलीही त्रुटी राहिलेली नाही. खूपच चांगला अनुभव मिळाल्याचे सांगितले.

२) **युवा बांधव श्री. महेश्वर महादेव** (रामदुर्ग) संघटना असावी, ज्यातून देशहीत साध्य व्हावे. स्वदेशी वस्तू प्रथम ओळखाव्या व त्यांच्या दैनंदिन जीवनात वापर करावा असे आवाहन केले.

३) **श्री. प्रभाकर द. मराठे** - संमेलनात असलेल्या त्रुटी विसरून जाऊन चांगले ते बरोबर न्यावे. परिवाराने खूपच चांगले कार्य केल्याची त्यांनी

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## नववधूंचे स्वागत

पुणेकरांनी ७व्या संमेलनात माहेरवाशिणींचे स्वागत करण्याचा पायंडा पाडला. ८व्या संमेलनात गोमंतकीयांनी नववधूंचे स्वागत करण्याची प्रथा पाडली. तीनच नववधू होत्या; पण पतीपत्नी दोघांनीहि 'नांव' घेण्याची फर्माईश झाल्यामुळे कार्यक्रमांत फारच रंगत आली. - **संपादक**

पावती दिली.

४) **सौ. प्रतिभा प्रभाकर** - नागपूर - गोव्याचा निसर्ग, खेडेगाव, आदरातिथ्य खूपच चांगले. जणू नव्या जुन्याचा संगमच इथे दिसून आला. जेवणातले सगळे पदार्थ आपल्याला नवीन होते आणि रुचकरही होते. एवढ्या तेवढ्यावरून नावे ठेवण्यासारखे काही नव्हतेच मुळी.

५) **राजीव मराठे - सोलापूर** - अगदी सुटसुटीत व्यवस्था. शंका, मतभेदांना इथे वाव नाही, असे आदरातिथ्य मी पहिल्यांदाच अनुभवतो.

६) **सौ. विभावरी पुरुषोत्तम** - संमेलन पूर्ण यशस्वी. सगळंच चांगलं व नवीन. खूपच आवडलं सर्व काही.

७) **श्री. सुरेश मराठे - डोंबिवली** - अतिशय उत्कृष्ट. कोणत्याच त्रुटी नाहीत, उपस्थित पूर्णपणे संमेलनात रममाण झालेले दिसले. गोमंतकीयांचे त्यांनी मुक्तकंठाने कौतुक केले.

८) **सौ. नीलांबरी रमेश** - कूपनपद्धती थोडीशी खटकली, तरी व्यवस्थेच्या दृष्टीने चांगली. जेवणातील पदार्थ सगळेच नवीन आणि रुचकर. पण पुणेकरांविषयीचा गैरसमज दूर करा. एका हाताची पाचही बोटे सारखी नसतात, असे त्या म्हणाल्या. नीलांबरीताई तेवढं आपण विसरून जाऊ. अहो शेवटी आपण प्रतिष्ठानच्या वटवृक्षाच्या फांद्या, वारा येताच एकमेकांना लागणारच.

९) **श्री. चिंतामण त्र्यंबक** - चर्चेला खूप कमी वेळ मिळाला. धार्मिक कार्यक्रम थोडे आटोपते घेतले असते तर चर्चा अधिक रंगली असती.

शेवटी समन्वयक श्री. लक्ष्मण शंकर यांनी वरील सर्व सूचनांचा आढावा घेऊन 'हितगुज' त्रैमासिकातर्फे योग्य तो न्याय देण्याचे आश्वासन दिले. या दोन दिवसांच्या सोहळ्याचा अंतिम टप्पा जो ऋणनिर्देश तो अगदी थोडक्यात सुटसुटीत अशा स्वरूपात सौ. अपूर्वा अरुण यांनी केला.

वरील संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सत्कारमूर्तींचा परिचय करून दिला - सौ. शुभदा दीपक व श्री. प्रदीप अनंत यांनी. (सांस्कृतिक कार्यक्रम - सूत्रसंचालन श्री. प्रसाद वसंत व सौ. पूजा प्रसाद)

संध्याकाळचे ७ वाजून गेले होते. लगेचच सांस्कृतिक कार्यक्रमाला **श्री. अजित लक्ष्मण आणि स्थानिक युवकांनी म्हटलेल्या घुमट आरतीने शुभारंभ** झाला. त्यानंतर नाट्यगीते, हार्मोनियम वादन, धाकू पाणेल्या सारखी छोट्यांची अर्थपूर्ण नाटिका, चित्पावनीतून केलेली सासूची नाट्यछटा असे एकाहून एक उत्तम कार्यक्रम सादर केले गेले. शेवटी कु. अपर्णा विश्वनाथ व पूजा नीळकंठ यांनी गायिलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

जेवणानंतर रात्रौ उशीरा 'गोंधळ' सादर करण्यात आले. तिसऱ्या दिवशी सकाळी चहा, नाश्ता घेऊन गोव्याबाहेरून आलेले बांधव परतीच्या वाटेला लागले. बरोबर खूपशा आठवणी, भेटीगाठी, ओळखी-पाळखी, नाती-गोती, नवीन सुंदर परिसर सर्व काही मनरूपी गाठोड्यात घट्ट बांधून तृप्त मनाने निरोप घेतला व मार्गस्थ झाले.

* * *

# विशेष कामगिरीबद्दल कुलबांधवांचा सन्मान

प्रतिष्ठानचे रौप्यमहोत्सवी वर्षातील पदाधिकारी आणि आपापल्या क्षेत्रांत विशेष कामगिरी करणारे कुलश्रेष्ठ बांधव (दिवंगतासह), तसेच उपस्थित ज्येष्ठ कुलबांधव (७५ वर्षांवरील), मराठ्यांच्या माहेरवाशिणी आणि नववधू (गेल्या संमेलनानंतरच्या) यांचा संमेलन आयोजकांतर्फे सन्मान करण्याचे ठरविले. याबाबत स्वागताध्यक्षांनी त्यांना पाठवलेल्या पत्रात खालील मजकूर होता :

''मराठे परिवाराचे सदस्य या नात्याने आपण आपल्या क्षेत्रात जी कामगिरी केली आहे त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. आपल्या या स्पृहणीय कार्याबद्दल या अधिवेशनात १ मे रोजी आपला सन्मान करण्याचे भाग्य आम्हाला द्यावे. तरी आपण आपल्या कुटुंबियासह या कार्यक्रमाला उपस्थित रहावे. कार्यबाहुल्यामुळे आपणाला प्रत्यक्ष येऊन हा सन्मान स्वीकारायला जमत नसल्यास कृपया आपला प्रतिनिधी तरी पाठवावा अशी नम्र विनंती करीत आहोत. तरी उलट टपाली आपली स्वीकृती पाठवल्यास आभारी राहू.''

त्यानुसार संमेलनामध्ये ज्यांचा सत्कार करण्यात आला त्यांची नांवे पुढे दिली आहेत. जे कुलबांधव अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते त्यांच्या नांवापुढे '*' अशी खूण केली आहे.

> **संमेलनाची वैशिष्ट्ये**
>
> **सत्कार संमेलन**
>
> गोवा संमेलनांत सत्कारच फार झाले. त्यामुळे चर्चेला वेळ थोडा राहिला असे मत संमेलनांत काही लोकांनी बोलून दाखवले.
>
> आपला सत्कार झाला की माणसाला बरे वाटते. त्यामुळे माणसे जोडली जातात; संस्था बांधली जाते, वाढते. रौप्यमहोत्सवी वर्ष असल्याने सत्कार जरा जास्त झाले हे खरंच - २५ वर्षांचे साचलेले होते ना? - **संपादक**

**अ) मराठे प्रतिष्ठानचे कार्यकारी मंडळ सदस्य**

सर्वश्री - अध्यक्ष आनंद यशवंत, कार्यवाह मोहन सदाशिव, कोषाध्यक्ष प्रभाकर दामोदर, हितगुज संपादक लक्ष्मण शंकर, आणि सभासद विनायक केशव, सी. गो. खांबेटे, प्रमोद कृष्ण, पुष्कराज वामन (यांच्या तर्फे सन्मान त्यांचे वडील वा.ग. यांनी स्वीकारला) डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर, सौरभ सुरेश, वामन गणेश, (जोगेश्वरी), सुरेश गोविंद, सौ. नीलांबरी रमेश, पुणे, श्रीनिवास गोपाळ, पुणे.

**पुढील सदस्य उपस्थित नव्हते**. सर्वश्री : कार्योपाध्यक्ष रमाकांत माधव विद्वांस, सहकार्यवाह हेमंत अरुण, आणि सभासद अरविंद दामोदर, हेमंत महादेव, चिंतामण महादेव, अरुण दत्तात्रय, पुणे, सौ. अदिती यशवंत, यशवंत सुरेश, श्रीमती सुलभा सुरेश (पहिल्या अध्यक्षांना समर्थ साथ, आतां विश्वस्त)

**ब) विविध क्षेत्रांतील विशेष कामगिरीबद्दल**

१. डॉ. चंद्रकांत रामचंद्र*, सांगली - संशोधन
२. श्री. नारायण बाळकृष्ण, पुणे - संशोधन (यांच्या सूचनेनुसार प्रतिनिधी म्हणून वामन नारायण यांनी सन्मान स्वीकारला)
३. श्री. विनायक गोपाळ*, अमेरिका - कुलवृत्तांत व मुखपत्र हितगुजचे पहिले संपादक
४. डॉ. एकनाथ व्यंकटेश, अमेरिका - संशोधन, शिक्षण (पुतण्या श्रीनिवास यांचे मार्फत)

५. श्री. हनुमंत मोरेश्वर (हमो), पुणे - लेखन, संपादन

६. श्री. श्रीधर केशव, वेंगुर्ले - संपादक, मुद्रक

७. श्री. रंगनाथ यशवंत*, पुणे - लेखक

८. श्री. प्रभाकर दत्तात्रय*, चिंचवड, पुणे - लेखन

९. श्री. श्याम मराठे*, पुणे - लेखन, गणित

१०. श्री. सतीश काशिनाथ*, मुंबई - बँकिंग

११. विंग कमांडर यशवंत लक्ष्मण, पुणे - संरक्षण

१२. अरविंद वासुदेव, पुणे - संशोधन

(क्र. ११ व १२ संमेलनाला आले. पण अचानक परत जावे लागल्याने त्याचे प्रतिनिधी म्हणून सौ. नीलांबरी रमेश यांचेमार्फत)

१३. भास्कर नरहर*, रत्नागिरी - रत्नागिरी संमेलनाचे निमंत्रक

१४. सदानंद (भाऊ) मराठे*, मुंबई - सूत्र निवेदन

१५. सौ. अनुराधा मुकुंद*, पुणे - गायन

१६. सौ. मालविका मराठे*, मुंबई - सूत्रनिवेदन

१७. सौ. मंजिरी मराठे, मुंबई - सूत्रनिवेदन (त्यांचे श्वशुर अनंत रामचंद्र यांचेमार्फत)

१८. डॉ. सौ. सीमा मराठे, पुणे - वैद्यकीयक्षेत्र

१९. डॉ. रविकिरण यशवंत, बेळगांव - वैद्यकीयक्षेत्र

२०. डॉ. सौ. रमा रविकिरण, बेळगांव - वैद्यकीयक्षेत्र

२१. श्री. नारायण कृष्णाजी, बेळगांव - शिक्षणक्षेत्र

२२. सौ. सुप्रिया शरद, मुंबई - प्रकाशनक्षेत्र

२३. श्री. उज्ज्वल मधुकर*, पुणे - म. प्र., वेबसाईट निर्माण

२४. कर्नल प्रमोदन प्रभाकर*, पुणे - संरक्षण, युवकक्षेत्र

२५. डॉ. स्मृति विद्वांस* - अमेरिका - संशोधन

२६. सौ. दीपा कुलकर्णी-मराठे*, मुंबई - क्रीडाक्षेत्र

२७. श्री. सुशांत हेमंत*, मुंबई - क्रीडाक्षेत्र

२८. सौ. सरिता मराठे*, पुणे - क्रीडाक्षेत्र

२९. श्री. सदाशिव नारायण, गोवा - १ ल्या संमेलनाचे अध्यक्ष

३०. श्री. परशुराम (नंदा) दिवाकर, गोवा - गोव्यातील मागील (१९८६) संमेलनाचे यजमान

३१. श्री. गणेश शंकर बिंबल - गोवा (दिल्ली) - नाटयक्षेत्र

३२. श्री. सदाशिव वामन, धारबांदोडा, गोवा - राजकारण (आमदार)

३३. श्री. नीळकंठ परशुराम, डिचोली, गोवा - उद्योगक्षेत्र

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## संमेलनात साप !

बिंबल (गोवा) गाव शांत आणि निसर्गाने नटलेल्या माडा-कुळागारांच्या कुशीत वसले आहे. आपल्या मुंबईकरांना सिमेंटची जंगले पाहायची सवय. कुठेही दृष्टी टाका इमारती, उंच इमारती दिसतात. पण बिंबल गावात कुठेही नजर टाका झाडे आणि जंगलेच दिसतात. माझ्या मनात विचार आला एवढ्या गर्द रानात, निबिड जंगलात हिंस्र पशू असतीलच. नागा-सापांची तर रेलचेलच असणार.

आणि खरंच काय आश्चर्य ! संमेलनाला साक्षात् साप महाराज हजर. व्यासपीठावर विराजमान होण्याच्या विचारात होते की काय कोण जाणे ?

संमेलनातील गर्दीतल्या मध्यभागी बसलेल्या महिला प्रेक्षकांच्या मध्ये हा साप जर निघाला असता तर समस्त महिला वर्गाची भीतीने गाळणच उडाली असती. (साध्या झुरळाला घाबरणाऱ्या शहरी महिला)

...... पण दक्ष कार्यकर्त्यांचे तिकडे लक्ष गेले आणि परिवारातील या साहसी बंधूंनी एका फटक्यासरशी त्याला मारले. सुटकेचा नि:श्वास टाकला. त्यांनी या सापप्रकरणाचा 'बभ्रा' होऊ न देता जो समंजसपणा दाखविला तो मला कौतुकास्पद वाटला.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर** (पृ.१२०), वडाळा, मुंबई

३४. श्री. मोरेश्वर हरी, शिरसई, गोवा - लेखन

३५. श्री. कालिदास बाळकृष्ण, गोवा - म. प्र. चे संस्थापक सदस्य, शिक्षणक्षेत्र

३६. श्री. प्रमोद अरुण, अमरावती - क्रीडाक्षेत्र, वैद्यक

३७. श्री. भालचंद्र डोंगरे, मैसूर. कर्नाटक चित्पावन संघाचे अध्यक्ष

**क) उपस्थित ज्येष्ठ व्यक्ती (७५ वर्षावरील)**

१. अनंत रामचंद्र, पुणे

२. श्री. दामोदर हरि, वडाळा, मुंबई

३. श्री. रघुनाथ बाळकृष्ण, बेळगांव (चुलतभाऊ गणेश शंकर यांचेमार्फत)

४. श्रीपाद नारायण, बेळगांव - (बंधु गोविंद नारायण यांचेमार्फत)

५. शिवराम जनार्दन, आंबेली, गोवा

६. रामचंद्र सदाशिव, होंडा, गोवा

७. वामन नारायण, पुणे

८. दत्तात्रय आत्माराम, मुंबई

९. भालचंद्र श्रीपाद, विलेपार्ले, मुंबई

१०. श्रीमती सीता रामचंद्र, पाळे, गोवा (मुलगा प्रकाश मार्फत)

११. रुक्मिणी कृष्ण, पर्ये, गोवा (मुलगा पांडुरंग मार्फत)

१२. रुक्मिणी विष्णु, बिंबल, गोवा

१३. भागिरथी राम, बिंबल, गोवा

१४. श्रीमती मनोरमा काशिनाथ, सुर्ल, गोवा (मुलगा कृष्णा मार्फत)

१५. श्रीमती राधा बाळकृष्ण, ढवळी, गोवा (नात तृप्ती शशिकांत मार्फत)

**ड) निधनोत्तर सत्कार -**

१. कै. सुरेश सखाराम* ऊर्फ सुरेशभाऊ - प्रतिष्ठानचे १ ले अध्यक्ष, उद्योजक

२. कै. बापूसाहेब मराठे*, पुणे - पोलिसदल, पुणे संमेलनाचे स्वागताध्यक्ष

३. कै. आण्णा (वामन आत्माराम), पुणे शाखेचे संस्थापक संवर्धक - पुतण्या रमेश भिकाजी मार्फत

४. कै. राम मराठे*, ठाणे - गायन

५. कै. संजीवनी मराठे*, पुणे - काव्यनिर्मिती

६. कै. अनंत मराठे*, मुंबई - अभिनय

७. कै. रामचंद्र विनायक, मुंबई -कोशकार (पुत्र अनंत रामचंद्र यांचे मार्फत)

८. कै. काशिनाथ शास्त्री, गोवा - संस्कृत पंडित (पुत्र कृष्णा काशिनाथ मार्फत)

९. कै. पांडुरंग बाळकृष्ण, सुर्ल, गोवा - फ्रेंच - संस्कृत क्षेत्र (पुत्र विष्णु मार्फत)

१०. कै. गोपाळ सीताराम*, पणजी, गोवा - वकिली

११. कै. लक्ष्मण पांडुरंग - खोतोडे, गोवा - सामाजिक क्षेत्र (पुत्र अजित मार्फत)

१२. कै. पांडुरंग दत्ताराम, पर्वरी, गोवा - नाट्यक्षेत्र (भाऊ विश्वनाथ मार्फत)

१३. कै. विश्वनाथ ऊर्फ रामदास विठ्ठल - कवळे, गोवा - कीर्तन (मुलगा अतुल मार्फत)

'*' अशी खूण केलेल्यांच्या प्रतिनिधींकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही.

**इ) संमेलनाला उपस्थित माहेरवाशिणी**

१. श्रीमती इंदूताई नामजोशी, मुंबई (कोषाध्यक्ष प्रभाकर दामोदर यांची आत्या)

२. सौ. विजय कमलाकर ओगले (विष्णु जनार्दन, आंबेली, गोवा यांची मुलगी)

३. सौ. राधिका मुकुंद लेले (सीताराम यशवंत, बिंबल, गोवा यांची मुलगी)

४. सौ. सुमन परशुराम जोशी (कै. परशुराम नारायण, बिंबल, यांची मुलगी)

५. सौ. ज्योती नारायण जावडेकर (कै. प्रभाकर नारायण, डिचोली, गोवा यांची मुलगी)

६. सौ. अलका विनायक जोशी, जमशेदपूर (प्रभाकर काशिनाथ, गया यांची मुलगी)

७. सौ. सुप्रिया विनायक लिमये, पुणे (रघुनाथ भालचंद्र, दादर, मुंबई यांची मुलगी)

८. सौ. अश्विनी देव, पुणे (सुप्रिया लिमये, पुणे यांची नणंद)

९. सौ. सुपर्णा सु. जोग (रामचंद्र गणेश, पुणे यांची मुलगी)

१०. सौ. मंजिरी मनोहर जोशी, धावे, गोवा (विनायक नारायण, आंबेडे यांची मुलगी)

११. सौ. शुभदा मधुसूदन जोगळेकर (कै. सुदर विष्णु, पाली यांची मुलगी)

१२. सौ. वंदना विनायक परांजपे (कै. रामचंद्र विष्णु, पाली यांची मुलगी)

१३. सौ. सुषमा वसंत पळनिटकर (कै. विश्वनाथ रामचंद्र जोशी (पृ.७५०), दिगवळे यांची मुलगी)

१४. सौ. वैशाली उदय देशपांडे (वामन नारायण, पुणे यांची मुलगी)

१५. सौ. गीता उद्धव बर्वे (कै. रामचंद्र श्याम, बिंबल, गोवा यांची मुलगी)

१६. सौ. प्रज्ञा रत्नाकर बर्वे, अन्साभाट, म्हापसा (अनंत दत्ताराम, मु. पो. वेळगे - पाळी, गोवा यांची मुलगी)

१७. सौ. सिंधू अरविंद कुलकर्णी (कै. विनायक नारायण, आंबेडे यांची मुलगी)

१८. सौ. सरिता शिरीष गाडगीळ (सदाशिव नारायण, वेळगे, गोवा यांची मुलगी)

१९. सौ. आरती अरविंद पाटील (कै. प्रभाकर नारायण, डिचोली यांची मुलगी)

२०. सौ. स्नेहल सु. बर्वे (श्रीपाद मराठे, चिरेव्हाळ, गोवा यांची मुलगी)

२१. श्रीमती मालती महाबळ (कै. नारायण पुरुषोत्तम, बेळगांव यांची मुलगी) ★★★

# मराठे प्रतिष्ठानच्या आठव्या अधिवेशनाला उपस्थितांची नांवे

| अ. क्र. | संपूर्ण नांव | गांव |
|---|---|---|
| १. | श्री. प्रभाकर काशीनाथ | गया |
| २. | सौ. सुनंदा प्रभाकर | ,, |
| ३. | सौ. अलका विनायक जोशी (श्री. प्रभाकर यांची कन्या) | जमशेदपूर |
| ४. | श्री. पुरुषोत्तम नारायण | वडोदरा |
| ५. | सौ. विभावरी पुरुषोत्तम | ,, |
| ६. | कु. पल्लवी पुरूषोत्तम | ,, |
| ७. | श्री. गजानन रंगनाथ | बंगलोर |
| ८. | श्री. केशव रामचंद्र | दुर्ग-कारकल |
| ९. | सौ. कविता केशव | ,, |
| १०. | श्री. प्रभाकर गणेश | दादर-मुंबई |
| ११. | श्री. अरविंद गणेश | डोंबिवली |
| १२. | सौ. ललिता अरविंद | ,, |
| १३. | श्री. आनंद यशवंत | ठाणे |
| १४. | सौ. नंदिनी आनंद | ,, |
| १५. | श्री. विनायक केशव | वरळी-मुंबई |
| १६. | श्री. सीताराम गो. खांबेटे | अंधेरी-मुंबई |
| १७. | श्री. मनोहर दामोदर | अंबरनाथ |
| १८. | सौ. मालिनी मनोहर | अंबरनाथ |
| १९. | श्री. सुधाकर भगवंत | ,, |
| २०. | सौ. रजनी सुधाकर | अंबरनाथ |
| २१. | श्री. सुरेश गोविंद | डोंबिवली |
| २२. | सौ. स्मिता सुरेश | ,, |
| २३. | श्री. सौरभ सुरेश | ,, |
| २४. | श्री. राजेंद्र व्यंकटेश | ,, |
| २५. | सौ. गीता श्रीपाद | ,, |
| २६. | श्री. दिलीप आत्माराम | बोरीवली |
| २७. | श्री. प्रमोद कृष्ण | ठाणे |
| २८. | श्री. मोहन सदाशिव | खार |
| २९. | श्री. भालचंद्र श्रीपाद | विलेपार्ले |
| ३०. | सौ. वीणा भालचंद्र | ,, |
| ३१. | श्री. चिंतामण त्र्यंबक | कळवा |
| ३२. | सौ. रोहिणी चिंतामण | ,, |
| ३३. | श्री. प्रभाकर दामोदर | वडाळा |
| ३४. | श्री. दामोदर हरि | ,, |
| ३५. | सौ. सुमेधा प्रभाकर | ,, |
| ३६. | कु. मधुरा प्रभाकर | ,, |
| ३७. | श्रीमती इंदुमती (मराठे) नामजोशी | विलेपार्ले |
| ३८. | श्रीमती भारती केशव भातखंडे | मुरबाड |

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## उपस्थित अष्टप्रधान १९८० व २००५

प्रतिष्ठानच्या १९८० च्या प्रथम संमेलनाला उपस्थित असलेले पुढील क्रियाशील कार्यकर्ते २००५ च्या संमेलनातहि उपस्थित होते. मुंबईतले सर्वश्री आनंद यशवंत, मोहन सदाशिव व वामन गणेश, गोव्यांतील सर्वश्री कालिदास बाळकृष्ण, सदाशिव नारायण, कृष्णा काशिनाथ व मोहन बाळकृष्ण आणि वेंगुर्ल्याचे श्री. श्रीधर केशव.

हे अष्टप्रधानमंडळ यापुढीलहि गोव्यांतील संमेलनाला उपस्थित राहावे अशी अपेक्षा.

(मोहन बाळकृष्ण, आता स्थायिक पुणे, हे आजारपणामुळे संमेलनाला येऊ शकले नाहीत. त्यांचे **शरीर पुण्यांत होते, पण मन मात्र सतत बिंबलातच होते!** रोज रात्री ते बिंबलात माझ्या घरी फोन करून संमेलनाची खबर घेत. - **संपादक**

| | | |
|---|---|---|
| ३९. | श्री. लक्ष्मण शंकर | मुलुंड |
| ४०. | सौ. उर्मिला लक्ष्मण | ” |
| ४१. | श्री. दत्तात्रय आत्माराम | ” |
| ४२. | सौ. नीला दत्तात्रय | ” |
| ४३. | श्री. दिनकर रामचंद्र | पाली-रायगड |
| ४४. | सौ. ज्योती दिनकर | ” |
| ४५. | श्री. मधुकर रामचंद्र | ” |
| ४६. | सौ. जयश्री मधुकर | ” |
| ४७. | सौ. वंदना विनायक (मराठे) परांजपे | ” |
| ४८. | श्री. वामन गणोश | जोगेश्वरी |
| ४९. | श्री. शरद कृष्णाजी | बोरीवली |
| ५०. | सौ. सुप्रिया शरद | ” |
| ५१. | सौ. शीला दामोदर | ” |
| ५२. | कु. राजश्री राम | ” |
| ५३. | श्री. श्रीकांत य. जोशी | ” |
| ५४. | सौ. जयश्री श्रीकांत | ” |
| ५५. | श्री. अरुण रामचंद्र | पाली-रायगड |
| ५६. | सौ. अलका अरुण | पाली-रायगड |
| ५७. | श्री. नृपेन सुरेश विद्वांस | चौल-रायगड |
| ५८. | श्री. शैलेश विनायक | वरसोली-रायगड |
| ५९. | श्री. प्रभाकर केशव | नागपूर |
| ६०. | सौ. प्रतिभा प्रभाकर | ” |
| ६१. | श्री. शरदचंद्र केशव | भंडारा |
| ६२. | डॉ. प्रमोद अरुण | अमरावती |
| ६३. | श्री. दत्तात्रय भिकाजी | कालवी |
| ६४. | सौ. गीता दत्तात्रय | ” |
| ६५. | श्री. विजयकुमार भिकाजी | तळकट |
| ६६. | सौ. वैशाली विजयकुमार | ” |
| ६७. | श्री. महेश्वर महादेव | रामदुर्ग |
| ६८. | श्री. प्रसाद रमाकांत | मळेवाड |
| ६९. | डॉ. रविकिरण यशवंत | बेळगांव |
| ७०. | डॉ. सौ. रमा रविकिरण | ” |
| ७१. | श्री. नारायण कृष्णाजी | ” |
| ७२. | श्री. अरुण बाळकृष्ण | कोल्हापूर |
| ७३. | श्री. विठ्ठल महादेव | सांगली |
| ७४. | श्री. अनिल महादेव | ” |
| ७५. | श्री. राजीव दिवाकर | सोलापूर |
| ७६. | श्री. बाळकृष्ण अनंत | उपळे-राजापूर |
| ७७. | सौ. ममता बाळकृष्ण | ” |
| ७८. | श्री. अनंत गजानन | सोल्दे-दोडा मार्ग |
| ७९. | सौ. मोहिनी अनंत | ” |
| ८०. | सौ. अर्चना गोपाळकृष्ण मराठे-जोशी | रत्नागिरी |
| ८१. | श्री. गोपाळकृष्ण ग. जोशी | ” |
| ८२. | कुमार गंधार गोपाळकृष्ण | ” |
| ८३. | श्री. बाळकृष्ण गणेश | तुळस |
| ८४. | श्री. परशुराम केशव | ” |
| ८५. | श्री. श्रीधर केशव | वेंगुर्ले |

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## आत्मसंशोधन बैठक

संमेलन झाल्यावर लगेच पुढच्या रविवारी ८ मे रोजी संमेलनाचे हिशेब पूर्ण करण्यासाठी बैठक झाली. या बैठकीत संमेलनातल्या त्रुटींचाहि आढावा घेण्यात आला. तो असा -

१) रात्री उशीरापर्यंत कार्यक्रम ठेवल्याने लांबवर रहायला असलेल्यांना वाहनासाठी कार्यक्रम संपेपर्यंत ताटकळत रहावे लागले; दुसरे दिवशी कार्यक्रमाला वेळेवर येणे कठीण झाले.

२) सत्कारात फार वेळ गेला.

३) लघुरुद्र चालू असतानाच दुसरा चर्चेचा इ. कार्यक्रम होऊ शकला असता.

४) गोमंतकीय चित्पावनी पदार्थांची नांवे टेबलावर लावायला हवी होती; तसेच जेवणाची घोषणा करताना आज विशेष काय तेहि सांगायला हवे होते.

५) प्रतिनिधींना स्वतंत्रपणे हिंडाफिरायला मोकळा वेळ मिळण्याच्या दृष्टीने कार्यक्रम सकाळी ११ ते ५ अगर सायंकाळी ३ ते ८ इतकाच ठेवावा.

**- संपादक**

| | | |
|---|---|---|
| ८६. | श्री. श्रीकृष्ण जयवंत | वेंगुर्ले |
| ८७. | श्री. भालचंद्र डोंगरे | म्हैसूर |
| ८८. | श्री. विजय भालचंद्र | पुणे |
| ८९. | सौ. ललिता विजय | ” |
| ९०. | श्री. प्रभाकर गजानन | ” |
| ९१. | श्री. मुकुंद सीताराम | ” |
| ९२. | सौ. माधवी कमलाकर | ” |
| ९३. | सौ. नीलांबरी रमेश | ” |
| ९४. | श्री. रमेश रामचंद्र | पुणे |
| ९५. | श्री. श्रीनिवास गोपाळ | ” |
| ९६. | सौ. उर्मिला श्रीनिवास | ” |
| ९७. | श्री. विजय विष्णू | ” |
| ९८. | सौ. अंजली विजय | ” |
| ९९. | कुमारी धनश्री विजय | ” |
| १००. | कुमार अथर्व विजय | ” |
| १०१. | श्री. गजानन दत्तात्रय | ” |
| १०२. | सौ. अनुराधा गजानन | ” |
| १०३. | श्री. दिवाकर ज. विद्वांस | ” |
| १०४. | सौ. अलका दिवाकर | ” |
| १०५. | श्री. अनंत रामचंद्र | ” |
| १०६. | सौ. लीला अनंत | ” |
| १०७. | सौ. मीना आनंद | ” |
| १०८. | श्री. विश्वास यशवंत | ” |
| १०९. | सौ. ज्योती विश्वास | ” |
| ११०. | कुमारी सुप्रिया विश्वास | ” |
| १११. | श्री. अशोक रामचंद्र | ” |
| ११२. | सौ. अश्विनी अशोक | ” |
| ११३. | श्री. दत्तात्रय मोरेश्वर | ” |
| ११४. | श्रीमती शुभदा शंकर | ” |
| ११५. | श्री. चिंतामण शंकर | ” |
| ११६. | श्री. विनायक बाळकृष्ण | ” |
| ११७. | डॉ. सौ. सीमा शाम | ” |
| ११८. | श्री. माधव वासुदेव | ” |
| ११९. | सौ. तेजस्विनी माधव | ” |
| १२०. | सौ. कस्तुरी माधव | ” |
| १२१. | सौ. नीता नरेंद्र | ” |
| १२२. | धनश्री विजय विद्वांस | ” |
| १२३. | नीलम विजय विद्वांस | ” |
| १२४. | श्री. केशव कृष्ण | ” |
| १२५. | सौ. सुनीता केशव | ” |
| १२६. | श्री. अरविंद वासुदेव | ” |
| १२७. | श्री. यशवंत लक्ष्मण | ” |
| १२८. | श्री. निरंजन दि. पुणतांबेकर | ” |
| १२९. | श्री. गणेश चं. पुणतांबेकर | ” |
| १३०. | कु. जयदीप पुणतांबेकर | ” |
| १३१. | श्री. कालिदास बाळकृष्ण | ढवळी-गोवा |
| १३२. | श्री. बाळकृष्ण कालिदास | ” |
| १३३. | सौ. प्रतिभा शशिकांत | ” |
| १३४. | कुमारी तृप्ती शशिकांत | ” |

| | |
|---|---|
| १३५. श्री. अरुण शिवराम | ढवळी-गोवा |
| १३६. सौ. अपुर्वा अरुण | ,, |
| १३७. कुमार अशोक अरुण | ,, |
| १३८. कुमारी आभा अरुण | ,, |
| १३९. श्री. शिवराम जनार्दन | आंबेली |
| १४०. सौ. रमाबाई शिवराम | ,, |
| १४१. श्री. गजानन शिवराम | ,, |
| १४२. सौ. गौतमी गजानन | ,, |
| १४३. श्री. अशोक शिवराम | वेलींग |
| १४४. श्री. विनायक शिवराम | आंबेली |
| १४५. सौ. विनया विनायक | ,, |
| १४६. श्री. मधुकर दिवाकर | साखळी |
| १४७. श्री. विष्णू अनंत | ,, |
| १४८. सौ. पूजा विष्णू | ,, |
| १४९. कुमारी पूर्वा विष्णू | ,, |
| १५०. श्री. कृष्णा काशीनाथ | ,, |
| १५१. चि. प्रीती कृष्णा | ,, |
| १५२. श्री. सीताराम यशवंत | बिंबल |
| १५३. सौ. मनीषा सीताराम | ,, |
| १५४. श्री. यशवंत सीताराम | ,, |
| १५५. सौ. रमा यशवंत | ,, |
| १५६. डॉ. विश्वनाथ सीताराम | ,, |
| १५७. चि. शुभंकर यशवंत | ,, |
| १५८. सौ. प्रशीला राधिका (मराठे) लेले | पुणे |
| १५९. चि. यश मुकुंद लेले | ,, |
| १६०. श्री. पुरुषोत्तम परशुराम | बिंबल |
| १६१. सौ. अर्चना पुरुषोत्तम | ,, |
| १६२. चि. प्राची पुरुषोत्तम | ,, |
| १६३. चि. प्रीती पुरुषोत्तम | ,, |
| १६४. श्री. नीळकंठ परशुराम | डिचोली |
| १६५. सौ. निर्मला परशुराम | ,, |
| १६६. चि. आनंद नीळकंठ | ,, |
| १६७. चि. पूजा नीळकंठ | ,, |
| १६८. श्री. सुरेश शंकर | बिंबल |
| १६९. श्री. मधुकर नारायण | भोंबेडे |
| १७०. सौ. मालती मधुकर | ,, |
| १७१. श्री. दीपक प्रभाकर | डिचोली |
| १७२. सौ. मेघना दीपक | ,, |
| १७३. श्रीमती सुनंदा प्रभाकर | ,, |
| १७४. कु. चैतन्य दीपक | ,, |
| १७५. श्री. वामन नारायण | पुणे |
| १७६. श्री. उदय देशपांडे | बिंबल |
| १७७. सौ. वैशाली उदय (मराठे) देशपांडे | ,, |
| १७८. श्रीमती भागिरथी रामचंद्र | ,, |
| १७९. जनार्दन ल. भट | ,, |
| १८०. सौ. ज्योत्सना ज. भट | ,, |
| १८१. कु. पांडुरंग जनार्दन | ,, |
| १८२. कुमारी जाई जनार्दन | ,, |
| १८३. श्री. प्रदीप अनंत | वेळगे |

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

## कोण, कुठून, कसे आले?

संमेलनाला महाराष्ट्र व गोव्याबाहेरून उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक इ. राज्यातून प्रतिनिधी आले होते. गोव्याबाहेरून १३४ प्रतिनिधी आले होते. यांत ८२ वर्षांच्या वृद्धांपासून ३ वर्षांच्या बालकांपर्यंत प्रतिनिधी होते. नाचणे, रत्नागिरीहून आलेल्या गोपाळकृष्ण (वय ३२) व अर्चना (वय २७) यांनी गंधारलाहि बरोबर आणले होते.

विशेष म्हणजे सोलापूरहून राजीव दिवाकर हा तरुण त्याच्या एका मित्रासह मोटरसायकलवरून आला होता.

तसेच गयेचे प्रभाकर काशिनाथ हे पत्नी सुनंदा व जमशेटपूर निवासी मुलगी अलका विनायक जोशी यांच्यासह स्वतंत्र गाडी करून आले होते.

चित्पावनीबाबत चर्चेसाठी कर्नाटक चित्पावन संघाचे अध्यक्ष डोंगरेहि बंगलोरच्या गजानन रंगनाथ बरोबर मुद्दाम आले होते.

**- संपादक**

| | |
|---|---|
| १८४. श्री. प्राजक्ता प्रदीप | वेळगे |
| १८५. कुमार प्रणव प्रदीप | ,, |
| १८६. कुमारी श्रिया प्रदीप | ,, |
| १८७. श्रीमती इंदिरा अनंत | ,, |
| १८८. श्री. विश्वनाथ दत्ताराम | पाळी |
| १८९. सौ. प्रतिभा विश्वनाथ | ,, |
| १९०. श्री. दत्ताराम विश्वनाथ | ,, |
| १९१. सौ. मयुरा महेश | वेळगे |
| १९२. कुमारी उषा विश्वनाथ | पाळी |
| १९३. श्री. देऊ रामचंद्र | बिंबल |
| १९४. सौ. राधा देऊ | ,, |
| १९५. श्री. दीपक देऊ | ,, |
| १९६. सौ. निशा दीपक | ,, |
| १९७. कुमारी मिथिला दीपक | ,, |
| १९८. कुमारी मानसी दीपक | ,, |
| १९९. श्रीमती निर्मला जनार्दन | |
| २००. श्री. पांडुरंग कृष्ण | मठ-पर्ये |
| २०१. श्री. मोरेश्वर हरि | थिवी |
| २०२. सौ. वीणा मोरेश्वर | ,, |
| २०३. श्रीमती सुगंधा लक्ष्मण | खोतोडे |
| २०४. श्री. अजित लक्ष्मण | ,, |
| २०५. सौ. गिरीजा अजित | ,, |
| २०६. कु. कीर्ती लक्ष्मण | ,, |
| २०७. श्री. दत्ताराम अनंत | डिचोली |
| २०८. सौ. जयश्री दत्ताराम | ,, |
| २०९. चि. हर्षा दत्ताराम | ,, |
| २१०. चि. उत्कर्षा दत्ताराम | ,, |
| २११. मिलिंद परशुराम | बिंबल |
| २१२. सौ. विभा मिलिंद | ,, |
| २१३. कुमारी प्राजक्ता मिलिंद | ,, |
| २१४. कुमारी तेजल मिलिंद | ,, |
| २१५. कुमार सिद्धेश मिलिंद | ,, |
| २१६. कुमारी ललिता | ,, |
| २१७. श्री. दीपक बाळकृष्ण | शिरोडा-गोवा |
| २१८. सौ. शुभदा दीपक | ,, |
| २१९. श्री. प्रसाद विश्वनाथ | पाळी |
| २२०. श्री. निलेंद्र दत्तोबा | धारबांदोडा |
| २२१. श्री. वामन कृष्णाजी | साकोर्डा |
| २२२. श्री. शैलेश वामन | ,, |
| २२३. श्री. प्रकाश रामचंद्र | पाळी |
| २२४. श्रीमती आशा सुरेश | साखळी |
| २२५. श्री. राजाराम रामचंद्र | धामसे |
| २२६. सौ. सरस्वती राजाराम | ,, |
| २२७. श्री. अजय राजाराम | ,, |
| २२८. श्री. प्रकाश विनायक | वाळपई |
| २२९. श्री. परशुराम दिवाकर | मुळगांव |
| २३०. श्री. वसंत विष्णू | चिरेव्हाळ |
| २३१. श्री. गोविंद नारायण | तिस्क उसगाव |
| २३२. सौ. गीता गोविंद | ,, |
| २३३. कुमारी गंधाली गोविंद | तिस्क उसगाव |

| | |
|---|---|
| २३४. श्री. शिवानंद दिवाकर | कुंभारजुवे |
| २३५. श्री. वामन जनार्दन | वाडे |
| २३६. श्री. बाळकृष्ण लक्ष्मण | कुर्टी |
| २३७. सौ. संध्या बाळकृष्ण | '' |
| २३८. कु. अतिष बाळकृष्ण | '' |
| २३९. श्रीमती शीतल रामदास | कवळे |
| २४०. अतुल रामदास | '' |
| २४१. अपर्णा रामदास | '' |
| २४२. विनायक भास्कर | मुळगांव |
| २४३. श्री. रामचंद्र सदाशिव | होंडा |
| २४४. सौ. अन्नपूर्णा रामचंद्र | '' |
| २४५. श्री. हनुमंत मोरेश्वर | पुणे |
| २४६. श्री. शशांक यशवंत | सुर्ल |
| २४७. श्री. विष्णू विश्वनाथ जोशी | रायपूर |
| २४८. श्रीमती सुषमा वसंत पळनिटकर | '' |
| २४९. श्री. आनंद राजाराम | बेतीवेरे-गोवा |
| २५०. श्रीमती भागिरीथी रामचंद्र | बिंबल |
| २५१. श्रीमती रुक्मिणी विष्णू | '' |
| २५२. श्रीमती मालती महाबळ | '' |
| २५३. समीक्षा शिरीष जोशी | '' |
| २५४. सौ. विजया कमलाकर ओगले | '' |
| २५५. सौ. सुमन प. जोशी | '' |
| २५६. सौ. ज्योती नारायण जावडेकर | '' |
| २५७. सौ. अश्विनी देव | पुणे |
| २५८. सौ. मंजिरी मनोहर जोशी | बिंबल |
| २५९. सौ. शुभदा मधुसुदन जोगळेकर | पाली-रायगड |
| २६०. सौ. गीता उध्दव बर्वे | बिंबल |
| २६१. सौ. प्रज्ञा रत्नाकर. बर्वे | वेळगे पाळी |
| २६२. सौ. सिंधु अरविंद कुलकर्णी | आंबेडे |
| २६३. सौ. सरिता गाडगीळ | वेळगे |
| २६४. कु. वीणा विनायक | आंबेली |
| २६५. सौ. अश्विनी अशोक | वेलींग |

* * *

## कार्यकर्त्यांना कृतज्ञतापत्र

संमेलन यशस्वी करणारे कुलबांधव आणि 'अ'मराठे शेजारी यांना दिलेले कृतज्ञतापत्र :

*सप्रेम नमस्कार,*

*मराठे प्रतिष्ठानच्या आठव्या अखिल भारतीय अधिवेशनाच्या निमित्ताने आपण सर्व एकत्र येत आहोत ही अत्यंत सुखद घटना आहे.*

*गोमांतकात अखिल भारतीय अधिवेशन भरविण्याची ही तिसरी संधी आहे. दोन अधिवेशने भरविण्याचा अनुभव गाठीशी असला तरी प्रत्येक वेळी मेहनती मध्ये भरच पडत असते. कारण कोणत्याही सार्वजनिक संस्थेचे अखिल भारतीय पातळीवरील अधिवेशन आयोजित करणे ही तारेवरची कसरतच असते.*

*आपण हे अधिवेशन यशस्वी होण्यासाठी जे कष्ट घेतलेत त्यांची व्याप्ती शब्दांकित करणे केवळ अशक्य आहे. गोमांतकासारख्या अभिजात सुंदर प्रदेशात, प्रसन्न वातावरणात आणि इतक्या देखण्या स्वरूपात अधिवेशनाची संकल्पना आखणे, आयोजित करणे आणि कोणत्याही स्वरूपाचे रुसवे, मतभेद होऊ न देता ते यशस्वी रीत्या पार पाडणे ही किमया आपणासारखे कार्यकर्तेच करू शकतात.*

*आपण गोवेकर खरोखरच भाग्यवान. या लाल मातीचा स्पर्श आपणाला निरंतर होत असतो. कोकणाला पारखे झालेल्या बांधवांना तर कोकणात भरलेली अधिवेशने हा कपिलाषष्ठीचा योगच असतो. दिवसा-दोन दिवसांसाठी का होईना पण ते मातृगृही येतात. तांबड्या मातीच्या सुगंधात सर्व क्लेश, दुःख आणि मानापमान विसरून जातात. अपार मेहनत घेऊन कोकणात अधिवेशने भरवितांना आपण या मायलेकरांची भेट घडवून आणण्याचे महान पुण्यकर्म करता, याची कदाचित् आपणास कल्पनाही नसेल.*

*अधिवेशन उदंड यशस्वी केल्याबद्दल आपले पुन्हा एकदा आभार.*

*आपले,*

*कार्याध्यक्ष*　　　　*कार्यवाह*

### आयोजन समिती

१. अध्यक्ष - राजाराम रामचंद्र धामसे
२. उपाध्यक्ष - कृष्णा काशिनाथ, सांखळी प्रमुख - स्मरणिका समिती
३. उपाध्यक्ष - नीळकंठ परशुराम, डिचोली, प्रमुख - निधी समिती
४. संघटक - कालिदास बाळकृष्ण, ढवळी
५. खजिनदार - मधुकर दिवाकर, सांखळी
६. कार्यवाह - प्रदीप अनंत, वेळगे
७. कार्यवाह - प्रसाद वसंत, सांखळी
८. कार्यवाह - सौ. अपूर्वा अरुण, फोंडा प्रमुख - नोंदणी व्यवस्था
९. कार्यवाह - सौ. शुभदा दीपक, शिरोडा
१०. सभासद - पुरुषोत्तम परशुराम, बिंबल
११. सभासद - गणेश (सुरेश) शंकर, बिंबल
१२. सभासद - अरुण शिवराम (फोंडा) प्रमुख - सत्कार आयोजन
१३. सभासद - दीपक बाळकृष्ण, शिरोडा
१४. सभासद - सुदिन सदाशिव, वेळगे

### स्वागत समिती

१५. अध्यक्ष - सदाशिव नारायण, वेळगे
१६. उपाध्यक्ष - परशुराम दिवाकर (ऊर्फ नंदा), मुळगांव
१७. उपाध्यक्ष - सदाशिव वामन, धारबांदोडा

### निरनिराळ्या समित्यांचे प्रमुख

१८. वाहतुक - निलेंद्र दत्तोबा, धारबांदोडा
१९. निवास - सीताराम यशवंत, बिंबल
२०. भोजन - श्रीमती सुनंदा प्रभाकर, डिचोली
२१. मंडप - मनोहर शंकर, खोतोडे
२२. स्वयंसेवक - सौ. प्राजक्ता प्रदीप, वेळगे
२३. सांस्कृतिक - दीपक प्रभाकर, डिचोली
२४. धार्मिक - विष्णु पांडुरंग, पीर्ण
२५. वैद्यकीय सेवा - डॉ. विश्वनाथ सीताराम, बिंबल
२६. थिवी स्वागत - मोरेश्वर हरी, थिवी
२७. निवास सोय -शिवराम जनार्दन, आंबेली
२८. निवास सोय - देऊ गोविंद, बिंबल
२९. निवास सोय - अजित लक्ष्मण, खोतोडे
३०. निवास सोय - सौ. मंगला पांडुरंग, धामसे
३१. वाहन सोय - संदीप परशुराम, बिंबल

### 'अ'मराठे ग्रामस्थ

३२. महादेव कृष्ण गणपुले
३३. प्रसाद गणपती बर्वे
३४. दामोदर भिकू भावे
३५. अरविंद पाटील
३६. रामनाथ गावडे

# आयोजकांच्या निमंत्रणाला कुलबांधवांचा प्रतिसाद

### सन्मानाचं आगळं महत्त्व

आपल्या संमेलनाचे अगत्याचे आमंत्रण मिळाले. त्याचप्रमाणे समस्त कुलबांधव माझा सन्मान करणार आहेत हे वाचून फार आनंद झाला. बाहेर खूप सत्कार होतात. परंतु कुलबांधवांकडून होणाऱ्या सन्मानाचं महत्व फार वेगळं आहे. पूर्वनियोजित कार्यक्रमांमुळे मला संमेलनाला हजर राहता येणार नाही त्याबद्दल दिलगीर आहे. पण माझे प्रतिनिधी म्हणून माझे मेहुणे श्री. अशोक खरे उपस्थित राहणार आहेत. संमेलनास हार्दिक शुभेच्छा. - **भाऊ मराठे,** मुंबई

*(श्री. खरेहि संमेलनाला उपस्थित नव्हते. - संपादक)*

### लांबचा प्रवास करू शकत नाही

माझी प्रकृती सध्या ठीक नसल्याने इतका लांबचा प्रवास मी करू शकत नाही याचे मला अतिशय वाईट वाटते. खरंतर या संमेलनास उपस्थित राहण्याची माझी मन:पूर्वक इच्छा होती. कारण गोव्यावर मी मनापासून प्रेम करतो. या निमित्ताने तिकडे येणे झाले असते. प्रत्यक्ष येऊन मी हा सन्मान स्वीकारू शकत नाही त्याबद्दल क्षमा असावी. - **रंगा मराठे,** पुणे

### आता आणखी सत्कार कशाला?

२६.१.२००५ रोजी पुण्याच्या मराठे प्रतिष्ठानच्या अधिवेशनांत प्रतिष्ठानने यथोचित गौरव केलाच आहे. शिवाय डिचोली-मुळगांव येथे झालेल्या अधिवेशनांतही आपण मला स्वागताध्यक्षपद दिले होते. आता आणखी सत्कार स्वीकारून मी काय करू? आपल्या कार्यकारिणीला वाटत असेल तर **श्री. वा. ना. मराठे 'बिंबल'** हे संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. त्यांच्याजवळ सन्मान सुपूर्द करावा. अधिवेशनाला माझ्या शुभेच्छा आहेत.

- **नारायण बाळकृष्ण** (पृ.५५९), पुणे

### वय व प्रकृती-अस्वास्थ्य

इच्छा असूनही वय व प्रकृती-अस्वास्थ्य यामुळे आम्ही उभयता संमेलनात सहभागी होऊ शकत नाही. यास्तव क्षमस्व!

आपण करणार असणाऱ्या माझ्या सन्मानाबद्दल मी श्याम मराठे आपणा सर्वांचा आभारी आहे. - **श्याम मराठे** (वासुदेव गंगाधर, पृ.२७३), पुणे

### माझे योगदान नगण्य

आपल्या आमंत्रणाबद्दल आभार. माझे प्रतिष्ठानच्या कार्यात योगदान हे नगण्य आहे. या कारणास्तव मी सन्मानायोग्य नाही व मी तो स्वीकारणार नाही. - **पुष्कराज वामन,** (पृ.५०३), मुंबई

*(पुढील काळांत भरीव योगदानासाठी हा विसार आहे असे समज, पुष्कराज! - संपादक)*

### रु. ५००१ संमेलन देणगी

Received your invitation to attend 'Marathe Pratishthan's 8th All India Samelan on 30.4.05 and 1.5.05. It would be difficult to attend. I am attaching a cheque for Rs. 5001/- with a request to utilise it as you deem it fit.

- **A. K. Marathe,** Bhuj

### देणगी २०० कॅनेडिअन डॉलर्स

आपले अखिल भारतीय मराठे प्रतिष्ठान - रौप्य महोत्सवाचे, अगत्याचे आमंत्रण मिळाले, आभारी आहे.

या पत्रासोबत २०० कॅनेडिअन डॉलर्स, बँक मनीऑर्डर, महोत्सवाला देणगी म्हणून पाठवीत आहे, त्याचा स्वीकार करावा. माझा पुतण्या श्रीनिवास गोपाळ हा आपल्याला संमेलनांत भेटेलच. संमेलन अतिशय यशस्वी व्हावे ही शुभेच्छा.

- **डॉ. एकनाथ व्यंकटेश व सौ. सुनिती मराठे** (पृ.३८९), कॅनडा

### अनुकरणीय प्रथा - पायंडा

माझ्या आयुष्यातील सार्वजनिक ठिकाणी सत्काराचा पहिलाच योग असल्याने आनंदित झालो होतो. पण अचानक काविळीचा प्रादुर्भाव होऊन मी आजारी आहे. सारासार विचार करून आज अगदी शेवटच्या दिवशी व्यथित अंत:करणाने उपस्थित न राहण्याचा निर्णय घ्यावा लागत आहे. आपली इच्छा असून भागत नाही. दैवाचाहि पाठिंबा लागतो. माझा योग नव्हता हेच खरे.

संमेलनाच्या यशस्वितेसाठी माझ्या शुभेच्छा. १९८० व १९८६ अशी दोन संमेलने आयोजित करण्याचा अनुभव आपणास आहेच. म्हणजे आपण आता 'हॅटट्रिक' करीत आहा.

कुलबांधवांच्या उल्लेखनीय कार्यासाठी खास सत्कार आपण करीत आहा. घरच्या माणसांची कौतुकाची थाप पाठीवर पडणे याला जीवनात फार महत्त्व असते. आपण हा तो नवीन पायंडा (प्रथा-उपक्रम) पाडला आहे. तो यापुढील संमेलन आयोजकांना अनुकरणीय असाच आहे.

- **भास्कर नरहर** (पृ.४६), रत्नागिरी

### अन्य शुभेच्छा संदेश

१. श्री. वि. गो. ऊर्फ भाऊसाहेब मराठे - अमेरिका (टेलिफोनवरून)
२. श्री. प्रभाकर द. मराठे - चिंचवड, पुणे
३. श्री. वि. म. मराठे - विश्रामबाग, सांगली
४. श्री. ना. का. चक्रदेव - चिंचवड, पुणे
५. श्री. चिंतामणी रा. मराठे - कोथरूड, पुणे
६. श्री. वि. गं. विद्वांस - पुणे
७. सौ. व श्री. अविनाश विद्वांस, अहमदाबाद
८. बाळकृष्ण सखाराम - चिंचवड गाव, पुणे
९. मधुकर यशवंत ऊर्फ तात्या - गांधीनगर, अकोला
१०. मुक्ता श्रीखंडे, पुणे (मराठ्यांची माहेरवाशीण)
११. ॲड. वर्षा जाधव (चंद्रकांत मराठे यांच्यातर्फे - सांगली)

***

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

### 'हमो' हाजिर है ?

संमेलनात सत्कारमूर्तींची नांवे पुकारताना 'हनुमंत मोरेश्वर, हनुमंत मोरेश्वर' असा दोनदा पुकारा झाला. प्रेक्षागृहात अगदी मागील बाजूस 'हमो' बसलेले दिसत होते. पण कोणीच उठेना. तेव्हा अध्यक्षांनी पुकारले, अहो 'हमो' उठा ना. तेव्हा ते खडबडून उठले, खळखळून हसले आणि स्टेजवर आले.

'हमो' हेच नांव इतके रूढ झाले आहे की 'हनुमंत मोरेश्वर' हे आपलेच नांव आहे हेच जणू 'हमो' विसरले! - **संपादक**



॥ श्री व्याडेश्वर प्रसन्नोस्तु ॥

आमचे कुलदैवत श्री व्याडेश्वर, गुहागर आणि आमच्या पूर्वजांचे, तसेच त्यांनी स्थलांतर करीत गेलेल्या क्रमशः होंड, सोनशी, चिरेव्हाळ सुर्ल-तेलबांध, पाटवळ व पाळी या गांवच्या ग्रामदैवतांच्या आशीर्वादाने

तसेच आमचे पितामह कै. विश्वनाथ दिवाकर तथा सोनेभट मराठे, पाळी, आणि आमचे



पिताश्री - नारायण विश्वनाथ मराठे

मातोश्री - लक्ष्मी नारायण मराठे

यांच्या पुण्याईच्या संचयी ठेवीवरील निरंतर कळांतराने आमचे जीवनं समृद्ध झाले आहे.

त्यांच्या कृपादृष्टीचा प्रकाश आमच्या व पुढील पिढ्यांचे पदपथ सदैव उजळत राहो ही प्रार्थना.

**श्रीपाद नारायण मराठे**, B.A., बेळगांव
**गोविंद नारायण मराठे**, पाळी-तिस्क, गोवा
**विष्णू नारायण मराठे**, AMIE, पुणे
**ॲड. नागेश नारायण मराठे**, B.Com., LLM, DTC, पुणे

# संमेलनाला उपस्थित कुलबांधवांच्या प्रतिक्रिया

### अधिवेशनास योग्य ठिकाण

मी बिंबल (गोवा) येथील मराठे प्रतिष्ठानच्या संम्मेलनास उपस्थित होते. आणि **कायमस्वरूपी टिकणाऱ्या चांगल्या स्मृतींचा संच पुण्यास घेवून आले.** एकतर बिंबल हे ठिकाण गोव्यातील अंतर्गत भागातील वनश्रीच्या कुशीत वसलेल. अतिशय रम्य. अधिवेशन घेण्यास ह्याहून योग्य ठिकाण दुसरं असणं असंभव.

सर्व प्रथम हातात कार्यक्रम पत्रिका पडली आणि तिनेच मन जिंकून घेतलं. 'व्याडेश्वर चरणी लघुरुद्र सेवा' ह्या धार्मिक कार्यक्रमाने सुरवात झाली अन समाधान वाटले. धर्माचं अधिष्ठान मराठे परिवाराच्या स्नेहसंम्मेलनांत नसतं तर मोठीच त्रुटी जाणवली असती.

पुढील **एकामागून एक कार्यक्रमांची मालिका अगदी सुयोग्य तऱ्हेने मांडली गेली.** तेथे उपस्थित असलेल्या **प्रत्येक व्यक्तीस कोणत्या ना कोणत्या कार्यक्रमांत सहभाग घेण्याची संधी मिळाली.** हे विशेष! त्यामुळे व्यक्तिगत विचार, मतं मोकळेपणाने मांडता आले. हे अन्य ठिकाणी मांडता आले नसते!

ब्राह्मण समाजाची (चित्पावन) श्रेष्ठ बुध्दिमत्ता, कर्तुत्वनिष्ठा ब्राह्मणांच्या कामगिरीचा आढावा व वस्तुनिष्ठ इतिहास ह्यावरील चर्चा मला फार भावली. आणि सर्वात शेवटी **सर्व चित्पावन व मराठे बांधवांनी एकत्र येवून एकमेकांस सर्वतोपरी सहाय्य करावे हा निष्कर्ष स्वागतार्ह वाटला,** बिंबल येथून निघतांना प्रत्येक मराठे बांधव आपले आद्य कर्तव्य म्हणून व अस्तित्व टिकवावं म्हणून 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' हया मंत्राचे पालन करण्यास कटिबध्द झाला असणार हयात शंका नाही.

भारताच्या वेगवेगळ्या भागातून मराठे बांधव आले असल्या कारणाने नवीन ओळखी झाल्या. कलागुण सादर करता आले. सर्वच वातावरण उत्सवाचे, आनंदाचे होते. **गोमंतक बंधूभगिनींनी आदरातिथ्यात कोणतीही कसूर ठेवली नाही. संयोजन उत्तम व आदर्श होते.**

माझ्यापुरंत - वैयक्तिक म्हणायचं झालं तर मला खरं समाधान मिळालं ते माझा सत्कार वा कौतुक केल्याचं. तसं पाहिलं तर पुणे महानगरपालिकेपासून तर इतर अनेक प्रतिष्ठाने व संस्थाकडून गौरव पुरस्कार मिळाले आहेत. परन्तु आपल्या '**घरच्या कुटुंबियांकडून आपल्या कार्याची दखल घेतली जाणे,** वा कौतुकाची थाप पाठीवर मारली जाणे ह्या सारखी आनंदाची बाब दुसरी कोणतीही नाही असं मी समजते. आणि **हे भाग्य मला लाभले.**'

**- डॉ. सौ. सीमा श्याम** (पृ.४११), पुणे

### आयोजनाचा आदर्श नमुना

हे पत्र लिहीत असताना संमेलनाच्या गारुडातून (जादू) बाहेर आलेलो नाही. अद्यापही या संमेलनाच्या हृद्य आठवणी मनात रेंगाळत आहेत. संमेलन खऱ्या अर्थाने अखिल भारतीय झाले.

आपण केलेल्या सर्व व्यवस्था अगदी वाहतुक व्यवस्थापनेपासून, मांडव (माटव) भोजन, चहापान कार्यक्रम यांचे नेटके आयोजन याचा हा आदर्श नमुना होता. याचे सारे श्रेय आपणा सर्वांना व आपले समन्वयक श्री. लक्ष्मणराव यांना आहे.

या निमित्ताने नव्या पिढीच्या उत्साहाचा खास उल्लेख करावा लागेल. कारण मुले, मुली, सुना, नातवंडे हे त्यांच्या आजी-आजोबा, आई-वडील यांच्या प्रमाणेच सहभागी झाले होते.

हे संमेलन खऱ्या अर्थाने यशस्वी झाले. यशाची ही परंपरा आपण सर्व कुलबांधवांनी पुढे चालवावयाची आहे.

**- सुरेश गोविंद,** (पृ.८७), डोंबिवली

### स्वागत सदैव स्मरणात राहील

दि. २९.४.०५ रोजी मांडवी एक्स्प्रेस थिवी येथे चार तास उशीरा म्हणजे रात्री ९ वा. पोचली. तेथे पाहुण्यांच्या स्वागतासाठी येऊन चार तास स्टेशनवर थांबलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक आभार. तसेच बिंबल येथे रात्री १० वा. गरमागरम जेवण व त्यानंतर निरनिराळ्या गांवी रात्री झोपण्यासाठी अचानक आलेल्या अनोळखी पाहुण्यांचे त्या त्या घरी झालेले स्वागत सदैव स्मरणांत राहील. **- चिंतामणि त्र्यंबक** (पृ.२४८), कळवा, ठाणे

### अत्यंत चांगली सुटसुटीत व्यवस्था

येथील यजमान गोमंतक मराठे परिवाराने अत्यंत चांगली आणि सुटसुटीत व्यवस्था केली आहे. त्यामध्ये काही त्रुटी राहू नये म्हणून त्यांचे सर्व कार्यकर्ते मनापासून काम करीत आहेत, त्याबद्दल त्यांचे आभार.

काही लोकांकडून असेही ऐकावयास मिळत आहे की, हा कार्यक्रम अत्यंत आडवळणाच्या गावी ठेवण्यात आला. येथील सोयी सर्वच बाजूने अपूर्ण आहेत/कमी आहेत. हे ऐकल्यावर मात्र खूपच वाईट वाटले. कारण हा कोणताही समारंभ सोहळा किंवा मोठा कार्यक्रम नसून हे आपणच सर्व बांधवांनी एकत्रित बसून केलेले गेट-टुगेदर आहे.

सकाळीच काही मान्यवर आपल्या चित्पावन लोकांनी एकत्र येऊन काहीतरी मोठे ठाम कार्य करावे असे सांगत असतानाच, अशी (वरील उल्लेखित) मते ऐकावयास मिळाल्याने आपण सर्व लोक कितपत एकत्र येऊ शकू याविषयी शंका वाटते. त्यामुळेच पुढील वेळी आपापसातील मतभेद टाळले गेल्यास बरे वाटेल.

**- राजीव दिवाकर** (पृ.१४०), सोलापूर

### पुन्हा बिंबलला 'आपल्या घरी' कधी जायचे?

माझे सासरे-मामंजी ती. दामोदर हरि, आम्ही त्यांना दादा म्हणतो. वय वर्ष ८३. विस्मरण हा त्यांचा सध्या स्थायीभाव झालेला. त्यांनाही आम्ही संमेलनाला घेऊन गेलो होतो. चांगले रमले ते.

परत आल्यानंतर दोन-तीन दिवसांनी मला विचारले, ''आपण पुन्हा आपल्या त्या बिंबलच्या मोठ्या घरी कधी राहायला जायचे?'' म्हातारपण म्हणजे दुसरे बालपण असते, त्यांना कशाला उगाच नाराज करा, या विचाराने मी म्हटले 'गणपतीत, दिवाळीच्या सुट्टीत जाऊ आपण'. माझ्या या उत्तराने त्यांचे समाधान झालेले नाही - ते अधून मधून विचारतात. बिंबलला कधी जायचे?

बिंबल परिवाराने जी आत्मीयता दाखविली ती त्यांच्या मनात अजून 'घर' करून आहे.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर** (पृ.१२०), वडाळा

## हसतमुख, मदतीला तत्पर कार्यकर्ते

गोव्याचा पाहुणचार मी गेली कित्येक वर्षे घेत आहे. परंतु आपल्या परिवारातल्या माणसांनी आमची जी बडदास्त ठेवली ती अतुलनीय होती. प्रत्येकजण घरचेच कार्य असल्याप्रमाणे खपत होता. प्रचंड उत्साह, सर्वजण हसतमुख, मदत करायला तत्पर आणि हे सर्व करताना कुठेही अभिनिवेष नाही. सर्व काम अतिशय सहज व आत्मीयतेने.

आम्ही उभयता भारावून गेलो. आभार मानावे कुणाकुणाचे आणि किती.

व्यक्तिशः आपल्यापैकी कोणासही माझ्याकडून जी मदत होऊ शकेल ती अवश्य करीन. कृपया संकोच करू नये.

**- आनंद यशवंत** (पृ.२७७), ठाणे

### विवाह सहाय्य

**१. वधू - सुखदा दत्तात्रय चितारी,** दे.ब्रा., गोत्र वसिष्ठ, जन्म १९.८.१९८० उंची ५ फूट १ इंच, गहूवर्ण, रक्तगट o +ve, अव्यंग, चष्मा नाही, बी.ई. (कॉंप्युटर) इन्फोसिस पुणे येथे कंप्युटर प्रोग्रामर, मा.प्रा. रु. २००००. आई बँकेत नोकरी, वडील शिक्षक, बहीण शिकत आहे. **अपेक्षा** : इंजिनिअर, अव्यंग, निर्व्यसनी, मनमिळावू, वय २७ ते २८, ब्राह्मण. **संपर्क** : द. व. चितारी, १०१ बी, लक्ष्मीउदय अपार्टमेंटस, पवनबाग रोड, मालाड, मुंबई-४०००६४. (फोन - २८७४३९७८)

**२. वधू - प्राची प्रफुल्ल भातखंडे,** को.ब्रा., जन्म २२.११.८२, उंची ५'-४'', गहूवर्ण, शिक्षण बी.कॉम, नोकरी पोष्टाची बँक, GPOला. आईवडील व लहान भाऊ आहे. **अपेक्षा** : शक्यतो कोकणस्थ, मुंबई किंवा जवळपास. **संपर्क** : प्रफुल्ल अ. भातखंडे, B१०३, हर्षवर्धन, चाणक्य नगरी, समेळपाडा, नालासोपारा (वेस्ट). फोनः २४०३१२६. सायं. ७ ते १०.

## बोल बोलायचे राहुन गेले

*वामन गणेश ही प्रतिष्ठानच्या स्थापनेमागील प्रेरक शक्ति. १९७८ मध्ये त्यांनी गोव्यातील कुलबांधवांना यासाठी उत्तेजित केले. त्याबाबतच्या त्यांच्या उंचबळून आलेल्या आठवणी - गोवा संमेलनात व्यक्त करायच्या राहिलेल्या! - संपादक*

दिनांक ३० एप्रिल सकाळी बिंबल गांवात सनईचे सूर निनादू लागले आणि हिरव्यागार अशा उपवनात कपिकुलोत्पन्न माकडे (माणसे) सैरावैरा उड्या मारू लागली. माकडेच ती, त्यांना कोण आवरणार? तरी पण ती माणसासारखी वावरू लागली हिरव्यागार शिवारांत. ''अरे तॉ वांदर आयलॉ सॅ केळी खायेल, नाय जाले पोंपयं खायेल; चिंचाचे झाडावर, घरावर येल., में बंदुक घेवनी येसां. नाय जाले वर दबॉ वाजव्वे हवॉ. नाय जाले मारांदे, नायते गरंडेल लावनी आवाज कर मरे.''

आम्ही लहान असताना या माकडाचे चाळे अगदी जवळून पाहिलेत. आमच्या पूज्य पिताजींनी तर एका वांदराला यमसदनाला पाठविले होते. आमचे पिताजी शिकारीसुद्धा होते. आमच्या घरातील बंदुकीने रानांतली डुकरेसुद्धा मारून आणली होती. त्या काळी व आजही बारस म्हणून गांवच्या देवस्थानी केली जाते. त्यावेळी आमची बंदुक लक्ष्यभेद अशीच होती. वडिलांचे नांव गणेश; गावातले गणपतभट म्हणत. ती बंदुक मला उचलता येत नसे. पण ती धुणे, साफ करणे, दारु व छरे भरणे हे काम मी आवडीने करत असे.

आता त्या फक्त स्मृतिच राहिल्या परंतु आम्ही सगळी माणसे म्हणजेच माकडे आज पंचवीस वर्षे सर्वच झाडांच्या फांद्यावरून उड्या मारत आलो आहोत व आम्हीही आता एखाद्या हुप्या वानरासारखे म्हातारे झालो आहोत. आम्ही आता पावेतो पाठुंगळीला मराठे प्रतिष्ठान नांवाचे पोर बांधून वाट्टेल तशा हवेतून, पाण्यातून, आकाशातून, डोंगरावरून व टेकड्यांवरून उड्या मारीत निसर्गाच्या कुशीत बिंबल येथे जमा झालो होतो.

इथे आम्हाला एक नवा सूर उमगला तो म्हणजे माकडांची भाषा. ती चित्पावनी आणि आमचे चित्त पावन होऊन गेले. गोवा स्वतंत्र झाला. कोकणातले बरेचसे लोक, विशेषतः व्ह. फा. झालेले म्हणजे इयत्ता ७वी पास झालेले विद्यार्थी मास्तर म्हणून गोव्यात आले. मी मात्र गोव्यात प्रवेश केला तो १९७८ च्या शेवटीच आमचे गावातंले वेशीवरचे श्री. गजानन कृष्ण (पृ.४९४) शिक्षणाधिकारी यांच्याबरोबर एका संध्याकाळी मी गोव्यात प्रवेश केला. तेव्हा तर मला वास्को दी गामा बनल्यासारखे वाटले.

विशेष म्हणजे या संमेलनातही मी श्री. गजानन (शिक्षणाधिकारी) यांचे ऐवजी श्री. परशुराम मराठे (शिक्षणाधिकारी) (परशुराम केशव, पृ.४९७) यांच्याबरोबर येण्याचा योग आला. १९७८ मध्ये मी श्री. गजाननराव यांच्या घरी गेलो होतो. तेव्हासुद्धा श्री. परशुराम यांनीच मला श्री. गजाननरावांबरोबर जाण्यास सांगितले. विशेष म्हणजे आमचे धर्मपुरोहित श्री. ताम्हनकर यांचे जावई श्री. सदाशिवराव मराठे (सदाशिव वामन, पृ.५४८) हे असल्याने त्यांच्याकडेच आमची पहिली दिंडी दरवाजातून प्रवेशती झाली. गुळपाणी झाले व आम्ही श्री. कालिदास मराठे (कालिदास बाळकृष्ण, पृ.५४१) व नंतर श्री. दत्तोबा मराठे (दत्तोबा वामन, पृ.५४३) यांच्याकडे पुढील प्रस्थान ठेवले. त्यानंतर कृष्णा मराठे (कृष्णा काशिनाथ (पृ.५२३) व श्री. शशिकांत मराठे (शशिकांत बाळकृष्ण, पृ.५४१) मुंबई यांच्याशी आमची भेट होऊन मराठे परिवाराची शिडाची होडी गोव्याच्या समुद्रात ढकलली. आज त्या पंचवीस वर्षात शिडांत वारा भरून जवळ जवळ सातासमुद्राकडे किंबहुना पलीकडे ती वाटचाल करीत आहे.

श्री. (कै.) सुरेशभाऊसारखा कॅप्टन आम्हाला लाभला कै. सुरेशभाऊंचे वडील कै. अप्पासाहेब मराठे हे बोटीवरचे दिवे बनवत असत. पहिल्या हिरव्या वॉटर बॅगाही बनवत असत. तर अशी ही बोटीवरच्या कप्तानाच्या दिव्यात अंधारातून प्रकाशाकडे आपली सर्वांची वाटचाल चालू आहे. ती अशीच चालू राहावी अशी त्या केवलानंदांच्या चरणी विनम्र प्रार्थना! **- वामन गणेश** (पृ.५०३), जोगेश्वरी, मुंबई

***

## संमेलनातील क्षणचित्रे

### पदाधिकारी मंचाकडे जाताना



### म.प्र. कार्यकारिणीतील स्त्री शक्तीचा सत्कार



सौ. सुमेधा प्रभाकर



सौ. नीलांबरी रमेश.

### म.प्र. कार्यकारिणीतील पिता- पुत्र



सुरेश गोविंद



सौरभ सुरेश

### कार्यकारिणीतील माजी कार्यवाह व कोषाध्यक्षांचा सत्कार



विनायक केशव



सी. गो. खांबेटे

### तल्लीन प्रेक्षक



### सत्काराला उत्तर देताना -



भालचंद्र डोंगरे



सौ. सुप्रिया शरद, प्रकाशिका

### अभिप्राय- मनोगते व्यक्त करताना उपस्थित कुलबांधव



सौ. विभावरी पुरुषोत्तम



दिनकर रामचंद्र



महेश्वर महादेव



सौ. अपूर्वा अरुण



प्रभाकर मराठे



सुरेश गोविंद



सौ. प्रतिभा प्रभाकर

### कार्यकर्त्यांना प्रतिष्ठानतर्फे कृतज्ञता पत्र, संमेलन स्मृति-चिन्ह प्रदान











सत्कार - माहेरवाशिणी आणि नववधूंचा

## संमेलनातील क्षणचित्रे



















सन्मानित ज्येष्ठांच्या पत्नी


सौ. रमाबाई शिवराम


सौ.अन्नपूरणा रामचंद्र


काजू फोडून खाण्याचे प्रात्यक्षिक ←

तल्लीन प्रेक्षक →



# मराठे प्रतिष्ठान : पुढील वाटचाल, आव्हाने - परिसंवाद

## म.प्र. - एक सशक्त NGO

पुढील वाटचाल खंबीरपणे व सशक्तपणे होण्यासाठी काही उपक्रम हाती घेता येतील.

१) म.प्र. विभागवार नोंदणी आहेच, तर प्रत्येक विभागासाठी एखादे निश्चित कार्य ठरविणे.

२) हुशाराचं कौतुक शाल, नापास झालेल्यांचं काय? कित्येक म.प्र. सदस्य अजूनही कठीण, गरीबीत दिवस काढतात त्यासाठी आपण काय करू शकतो?

३) तरुणांसाठी, बेकारांसाठी खास विभाग व ऑक्टोबर ते डिसेंबर याच काळात एखादा परिसंवाद - interaction नोकरीच्या संधीबाबत माहिती, स्वयंरोजगार, परिवारातल्या सदस्यांचं काम करून देणे इ.

४) सहलीचं आयोजन/ Catering इ.

५) चिमुकल्यांसाठी व वृद्धांसाठी खेळ व विश्रांतीगृह.

६) मनोविकृतीची शिकार छोटी, तरुण होता कामा नये यासाठी आधारगट, कौटुंबिक सल्ला केंद्र.

७) या सर्व गोष्टी अंमलात आणण्यासाठी व आदर्श होण्यासाठी व आपल्या इतिहासाची खरी कल्पना असण्यासाठी आपल्या घराण्याच्या इतिहास लिखाणाचीही गरज आहे.

आज भारतासमोर, आपल्या समाजासमोर व आपल्या मराठे परिवारासमोर जागतिकीकरण व खवळलेल्या/ गढुळलेल्या समाजाचं आव्हान आहे व ते पेलण्यासाठी दूरदृष्टी, संयम व संस्कार हेच उपयोगी पडतील. मानवी उन्नतीसाठी संकुचित विचारसरणी सोडून आपल्या म.प्र. बरोबरच अख्ख्या भारतीय समाजाला आपलं करण्याची किमया घडवून आणावयाची असेल तर म.प्र. एकीकरण व सर्वांना आपल्याबरोबर नेण्याचा दृष्टीकोन आत्मसात करावा लागेल जेणेकरून आपण एक सशक्त NGO प्रमाणे काम करू शकू. यामुळे समाजात समता, सभ्यता, सामंजस्य, सहिष्णुता व समाधान राखता येईल व बौद्धिक, वैचारिक पातळीवरील आपली प्रगल्भता आपल्याबरोबरच इतरांना आनंद देईल.

**- सौ. अपूर्वा अरुण** (पृ.५३१),
फोंडा, गोवा.

## सर्वांसाठी सर्वजण एकत्र येण्याचा प्रयोग

**- कृष्णा काशिनाथ** (पृ.५२३), गोवा

***मराठे प्रतिष्ठानचे संस्थापक-सदस्य, १९८० पासूनचे क्रियाशील कार्यकर्ते कृष्णा काशिनाथ (पृ.५२३), गोवा, यांच्या या आत्मचिंतनांतून मराठे प्रतिष्ठान कशासाठी व कसे निर्माण झाले आणि यापुढील वाटचाल कोणत्या दिशेने व्हावी हे स्पष्ट होईल. - संपादक***

वेंगुर्ला पंचक्रोशीतील एक गृहस्थ श्री. वामन गणेश मराठे यांचे गोव्यातील आगमन झाले. त्यांची भेट झाली, गप्पाटप्पा झाल्या आणि येण्याचा उद्देश समजला. मराठे आडनाव धारण करणारे सर्व कपिगोत्री ब्राह्मण कुटुंबीय एकत्र येतील का? यावर कालिदास, वामन व मी यांनी बराच विचार केला. एक प्रयोग म्हणून याची रूपरेषा ठरविली आणि ''माला नाय, तुलाय नाय, घाल कुत्र्याला'' यातून बाहेर पडून सर्वांसाठी सर्वजण एकत्र येण्याच्या प्रयोगाची नांदी सुरू झाली.

मुंबई-पुणे मध्ये वामन गणेश, गोवा-बेळगांव मध्ये कालिदास, कोकण भागात श्रीधर केशव अशा सर्वांनी सर्व मराठे कुलबंधु-भगिनींना प्रत्यक्ष भेटून, समजावून सर्व मराठे बांधवांना समान धाग्याने जोडणारे एक व्यासपीठ असावे, एक संस्था असावी या विचाराने भारित होऊन सन १९८० मध्ये पहिले मराठे संमेलन - ढवळी, फोंडा, येथे संपन्न झाले. यामध्ये सातारा/ कराडचे मधुकर काका, बेळगांवचे सोलरकुकरवाले प्रभाकर काका, माहीमचे भाऊसाहेब व श्री. वामन गणेश यांचे योगदान अतुलनीय होय. याच संमेलनात 'मराठे प्रतिष्ठान'ची स्थापना करण्याचे ठरले आणि श्री. सुरेशभाऊ मराठे, मराठे उद्योग भवन, मुंबई यांच्या कार्यालयात 'प्रतिष्ठान'चे कार्य सुरू झाले.

सुरूवातीपासूनचे दोन सदाशिव (सदाशिव वामन, धारबांदोडा व सदाशिव नारायण, वेळगे) व कालिदास यांच्या अथक प्रयत्नामुळे 'प्रतिष्ठान'चे हे रोपटे वयात आले आहे. आपला समाज व सामाजिक बांधिलकीचा विचार करूनच यापुढील प्रतिष्ठानचे कार्यक्षेत्र/ कार्यप्रवणता वाढावी ही इच्छा. गोव्यातील आमच्या समाजात होत असलेला बदल खचितच स्तुत्य आहे. केवळ बागायती/ शेती व भिक्षुकी ही चरितार्थाची जुनी साधने. बरोबरच वैद्यकी, वकिली, स्थापत्य, इंजिनियर, संगणक, पत्राकरिता, लेखक, उद्योग, चार्टर्ड अकाऊंटंट, शिक्षक आदि नवीन नवीन क्षेत्रामध्ये आपली युवा पिढी पदार्पण करत आहे, चांगले आहे.

प्रतिष्ठानचे विविध उपक्रम व योजना यांचा आढावा घेत घेतच नव नवीन कल्पना/ उपक्रम राबविणे आणि संभाव्य गोष्टींचे अनुमानाने आकलन करीत आपली वाटचाल करणे हे आजच्या विकसित युवा पिढीला अशक्य नाही. हे आव्हान आपण स्वीकारायलाच हवे.

आपणास आपला धर्म (समाज) टिकवायचा आहे आणि त्यासाठीच ''एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ'' ही उक्ती कृतीत आणण्यासाठी आपले प्रतिष्ठान हे योग्य पीठ आहे. त्याचा खराखुरा आणि योग्य उपयोग व्हावा यासाठी प्रत्येकाने मन:पूर्वक शपथबद्ध व्हायला हवं - ''मी माझ्या कुवतीप्रमाणे मला जमेल तसं, साह्यकारी होईन, न जमल्यास निदान क्लेशदायी तरी नक्कीच होणार नाही.''

***

**संमेलनाची वैशिष्ट्ये**

### मराठे आणि 'मराठे'च !

मराठे प्रतिष्ठानचे गोव्यांतील संमेलनानंतर १५ दिवसांनी ठाण्यातील कौपिनेश्वर मंदिरांत मला उज्जैनचे श्री. वैशंपायन नावाचे गृहस्थ भेटले. त्यांना रुद्राभिषेक करायचा होता. मी करीन म्हटले. माझे नाव 'मराठे' सांगितले. लगेच ते म्हणाले मी गयेला गेलो असता तिथेहि मला मराठे गुरुजीच भेटले होते. त्यांनी अतिशय समाधानकारकपणे धर्मकृत्ये केली होती.

हेच गयेचे मराठे गोव्यात आमच्या संमेलनात मला भेटले होते असे सांगितले. त्यांना खूपच आनंद झाला. गयेत मराठे आणि ठाण्यातहि 'मराठे'. काय हा योगायोग!

**- चिंतामणि त्र्यंबक** (पृ.२४८) कळवा, ठाणे.

*परिसंवाद पुढे चालू...*

## 'चित्पावनी'बाबत संशोधन हवे

मराठे कुलबांधवांची किंबहुना सर्व चित्पावनांची भाषा (मातृभाषा) चित्पावनी बोलीचे संशोधन हाती घ्यावे. सत्तरीमधील चित्पावनी, पेडणे तालुक्यातील चित्पावनी, तळवणे (ता. सावंतवाडी) येथील चित्पावनी, कर्नाटकातील चित्पावनी अशा अनेक ठिकाणच्या चित्पावनीचा अभ्यास करून

अ) चित्पावनी बोलीतील शब्दांचा संग्रह (ग्राफिक मराठीत समान अर्थाने असलेले शब्द वगळून)

ब) चित्पावनीतील म्हणी वाक्प्रचारांचा संग्रह

क) चित्पावनीतील लोकगीते - स्त्रीगीते यांचा संग्रह

ड) प्रसिद्ध झालेल्या चित्पावनातील साहित्याचा संग्रह

२. ''हितगुज'' नियतकालिकांत चित्पावनी बोलीतील लेख, कथा, कविता यांना प्रसिद्धी द्यावी.

३. प्रतिष्ठानच्या मुख्य व विभागीय कार्यक्रमात चित्पावन विषयक ग्रंथांचा संग्रह करणे.

४. आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन. जोडप्यातील एक व्यक्ती मराठे कुळातील असावी.

५. प्रतिष्ठानखेरीज अन्य सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करणे.

६. मराठे कुलबांधवातील काही भिक्षुकीचा व्यवसाय करतात. कर्मकांडातील कालबाह्य रूढींचे उच्चाटन करणे. वेदोक्त पुराणोक्त असा भेद न करता सर्व धार्मिक विधी व्हावे. संस्कृत भाषेचे ज्ञान नसतानाही केवळ पाठांतराने विधी केले जाऊ नयेत.

महत्त्वाचे धार्मिक विधी संस्कृतमध्ये करणे उत्तरोत्तर कठीण होत आहे. लग्न, मुंज, शांति, अन्त्येष्टी या सारख्या विधीतील मंत्रांचे समश्लोकी मराठीत रूपांतर करण्याचा प्रयत्न व्हावा. असा प्रयत्न ख्रिश्चन धर्मियांनी केला आहे.

७. सध्या कर्मकांडाचे शिक्षण देणाऱ्या वेदपाठशाळा जुन्या पद्धतीप्रमाणे चालू आहेत. शिक्षणात गेल्या २-३ वर्षांत क्रांतिकारक बदल झाले. पण वेदशाळेत बदल नाही. आधुनिक पद्धतीची वेदशाळा सुरू करण्याचे प्रयत्न व्हावे. प्रवेश सर्वांना खुला असावा.

**- प्रभाकर केशव** (पृ.४९७),
तुळस, जि. सिंधुदुर्ग

## आपल्या पाल्याचा दृष्टिकोन काय?

प्रतिष्ठानपुढील आव्हाने या चर्चेच्या विषयात येणाऱ्या पालकांनी आपल्या पाल्याचा दृष्टीकोन प्रतिष्ठानबाबत व कार्याबाबत काय आहे? यावर चर्चा व्हावी अशी इच्छा आहे. प्रतिष्ठानला तरुणांचा प्रतिसाद अल्प असतो याची कारणे त्यातून समजतील.

**- वसंत रावजी** (पृ.११७), खुडीपाट

## व्यावसायिक माहितीचा कोष करावा

१. जो जो मराठे आहे, हिंदुस्थानात किंवा जगाच्या पाठीवर तो कोठेही असू दे, त्याचे नाव, पत्ता, व्यवसाय व कौटुंबिक माहितीचा कोष तयार करावा.

२. सर्वांचा परिचय लहानपणापासूनच व्हावा म्हणून १०वी पास झालेल्यांचे परिचय संमेलन घ्यावे.

३. मराठे परिवारासाठी आचारसंहिता (सोपी) असावी. आध्यात्मिक अधिष्ठान वाढविणारी असावी.

४. ब्राह्मणांवर होणारे आरोप लक्षात घेऊन याचे खच्चीकरण रोखण्यासाठी त्याची उत्तरे दर्शविणारे लेख प्रसिद्ध व्हावे व त्याची जबाबदारी, क्षमता लक्षात घेऊन काही विचारवंतावर द्यावी.

५. नोकरी व व्यवसाय यासाठी विचारल्यास मार्गदर्शन व्हावे.

६. विवाहानंतर मुलगा किंवा मुलगी यांची नोंद व्हावी.

७. मराठे प्रतिष्ठानचे जिल्हा किंवा विभागश: संपर्क स्थान असावे.

८. मराठे प्रतिष्ठानला आर्थिक कोष निर्माण करावा.

**- विजयकुमार मराठे** (पृ.४०१),
तळकट, जि. सिंधुदुर्ग


*मराठे प्रतिष्ठानला*
*माहेरवाशिणीच्या हार्दिक शुभेच्छा*

***श्री. व सौ.***
***स्मिता वसंत जोशी***

आर्यकृष्ण अपार्टमेंट, २ रा मजला, बदलापूर.


## वृद्धत्वरोधक हिरडा

आयुर्वेदात जेवढी म्हणून औषधी द्रव्ये वा वनस्पती यांचे वर्णन केलेले आहे, त्यात हिरडा सर्वश्रेष्ठ मानला गेला आहे. प्राचीन व अर्वाचीन आयुर्वेदीय ग्रंथात हिरड्याचे गुणवत्तास्थान सर्वात वरचे आहे.

शरीराची हालचाल, तरतरीतपणा, बुद्धिवाढ, स्मृतीला उजाळा, आयुर्मर्यादित वाढ हे सर्व गुण हिरड्यात असून तारुण्यरक्षक, चापल्य व शीघ्रबुद्धी यासाठी याचे सेवन नित्यनेमाने करणे आवश्यक आहे. हिरड्याचा मुख्य उपयोग जरा (वृद्धत्व) येऊ नये म्हणून केला जातो.

म्हातारपण येऊ नये वा दूर राहण्यासाठी हिरडयाचे सेवन खालीलप्रमाणे करावे. निरोगी राहू इच्छिणाऱ्यांनी रोज हिरडा खावा. वजनदार, उत्तम प्रतीचा हिरडा निवडून घ्यावा. औषधी भांडारातून हिरडा मिळू शकतो. त्याची पूड (भुकटी) करून त्याचा वापर करावा. बाजारात मिळणारी तयार पूड वा चूर्ण न वापरल्यास चांगले, कारण त्यात भेसळ असू शकते. ही हिरडयाची पूड (भुकटी) रोज सकाळी १ ग्रॅम घेऊन ती भिजेल एवढे तूप घालून खावी. सतत घेत राहिल्याने उत्तम गुण येतो. यासाठी कोणतेही पथ्य नाही. मात्र हवामानाप्रमाणे अनुपान (सोबत घ्यावयाचे द्रव्य) पाळावे.

**अनुपान**

(१) वसंत ऋतू : मध, (२) ग्रीष्म ऋतू (कडक उन्हाळा) : गूळ, (३) वर्षा (पावसाळा) : सैंधव (औषधी मीठ), (४) शरद ऋतू : साखर, (५) हेमंत ऋतू : सूंठ, (६) शिशिर ऋतू : पिंपळी अगर मिरपूड. ही अनुपाने १ ग्रॅम घ्यावी.

प्रेषक : **प्रमोद कृष्ण** (पृ. ३७६), ठाणे.


*मराठे प्रतिष्ठानच्या कार्यास शुभेच्छा*

**कृष्णा काशिनाथ मराठे**

१३६९, गृहनिर्माण वसाहत,
हरवळे-सांखळी, गोवा ४०३ ४०५.

# मराठे प्रतिष्ठान - २५ वर्षांची वाटचाल

- **लक्ष्मण शंकर** (पृ. ५२०), मुलुंड, मुंबई.

**पूर्वेतिहास**

मार्च १९७९ मधें बडोद्यांत भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात मुंबईहून आलेले वामन गणेश (वाग पृ.५०३) आणि कलकत्त्याहून आलेले नारायण बाळकृष्ण (नाबा पृ.५५९) हे दोन 'मराठे' योगायोगाने एकमेंकाना भेटले. चर्चेतून 'मराठे' कुलबांधवांची संस्था असावी असा विचार पुढे आला. मुंबईत परतल्यावर 'वाग'नी सुरेश सखाराम (सुरेशभाऊ पृ.३९९) यांचेशीं हा विषय काढला. त्यांनाही ही कल्पना भावली. 'वाग' गोव्यांत जाऊन आले. जुलै १९७९ मधें कालिदास बाळकृष्ण (काबा पृ.५४१) यांच्या घरीं धारबांदोडा, गोवा येथे कुलबांधवांची सभा झाली. गोवा विभागासाठी कार्यकारिणी निवडण्यात आली.

ऑगस्ट १९७९ मधें सुरेशभाऊंनी मराठे उद्योग भवनात काहीं निमंत्रितांची सभा घेऊन त्यांचेपुढें कल्पना मांडली. त्यांनी ती उचलून धरली. संस्था असावी असा निर्णय झाला. सुरेशभाऊंनी एक पत्रक तयार करून माहितीच्या कुलबांधवांकडे धाडले.

गोमंतकांतल्या कुलबांधवांची दुसरी सभा सप्टेंबर १९७९ मधें श्रीवडदेव देवस्थान, होंडा येथे झाली. या सभेत मराठे परिवाराचे अखिल भारतीय संमेलन १६, २७ जानेवारी १९८० रोजी गोव्यात घेण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर १८ नोव्हेंबर व २३ डिसेंबर १९७९ रोजी अनुक्रमे मुळगांवात परशुराम दिवाकर (पृ.५३८) आणि वेलिंग येथे मोहन बाळकृष्ण (पृ.५२०) यांच्या घरीं सभा घेऊन संमेलनाची सर्व सिद्धता करण्यात आली.

**स्थापना**

२६, २७ जानेवारी १९८० रोजी १ ले अखिल भारतीय मराठे परिवार संमेलन संपन्न झाले. या संमेलनात 'मराठे प्रतिष्ठान' या नांवाने संस्था स्थापन करण्याचा निर्णय झाला. त्यासाठी एक अस्थायी समितीही स्थापन करण्यात आली.

या समितीने मुंबईतील कुलबांधवांच्या सभा घेऊन प्रतिष्ठानची घटना व नियम तयार केले. त्यांवर दादर मुंबई येथे झालेल्या २ ऱ्या मराठे परिवार संमेलनात २६-१०-१९८० रोजी सर्वांगीण चर्चा होऊन मसुदा मान्य करण्यात आला. त्यानंतर १२-१-१९८१ रोजी 'मराठे प्रतिष्ठानची' चॅरिटेबल ट्रस्ट अॅक्टखाली नोंदणी करण्यात आली.


**एकमेकां साह्य करू**

श्री बल्लाळ विनायक शिक्षण प्रसारक मंडळ, पाली, जि. रायगड, ४१०२०५, या संस्थेतर्फे पाली येथे नवीन माध्यमिक शाळा जून २००५ पासून चालू करीत आहे. (विना अनुदान तत्त्वावर) त्यासाठी जागा, इमारत, शैक्षणिक साहित्य व इतर सर्व बाबींसाठी आर्थिक व्यवस्था होणे जरूरीचे आहे.

मराठे परिवार पाली यांच्यातर्फे विशेष प्रयत्नाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तरी सर्व मराठे परिवारास नम्र विनंती आपण सर्वांनी सढळ हाताने आर्थिक मदत करावी.

**- अरुण रामचंद्र मराठे,** सेक्रेटरी


**प्रमुख उद्देश**

१. मराठे परिवाराच्या सर्वांगीण विकास व उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे. (मराठे, विव्दांस, खांबेटे, चक्रदेव, जाईल, जोशी, रटाटे व फडणीस या आडनावाच्या चित्पावन कपिगोत्री व्यक्तींचा मराठे परिवारांत समावेश होतो.)

२. मराठे परिवारातील गरजू व्यक्तींना सहाय्य, तांत्रिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यासाठी योग्य ते उपक्रम सुरू करणे.

३. मराठे प्रतिष्ठानच्या सभासदांमधे परस्पर सहकार्याची भावना जोपासणे, त्यासाठी संमेलने, चर्चासत्रे, परिसंवाद, विभागीय मेळावे, शिबिरे, सत्कार समारंभ व इतर कार्यक्रमांचे आयोजन करणे.

४. विद्यामंदिरे, वसतिगृहे, वृध्दाश्रम, दवाखाने, लघुउद्योग, व्यवसाय इत्यादींची योजना करणे.

५. मराठे कुलवृत्तांत अद्ययावत करून प्रकाशित करणे.

**आजवरचे कार्य**

प्रतिष्ठानच्या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने परिणामकारक कार्यवाही व्हावी म्हणून निरनिराळ्या प्रकारच्या कार्यासाठी प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या उपसमित्या, कांही स्थायी तर कांही तात्कालिक कामासाठी, नियुक्त केल्या जातात. त्यामुळे जास्तीत जास्त कुलबांधवांना कार्यात सहभागी करून घेणे शक्य होते. या समित्या अशा (१) कुलवृत्तांत समिती (२) शैक्षणिक समिती (३) हितगुज समिती (४) वैद्यकीय समिती (५) सांस्कृतिक कार्यक्रम समिती (६) उद्योग प्रेरणा समिती (७) महिला समिती

**संमेलने, मेळावे, चर्चासत्रे**

प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून आजपर्यंत झालेल्या सभा (विश्वस्त व कार्यकारी मंडळाच्या सभा वगळून) संमेलने, विभागीय मेळावे, चर्चासत्रे, परिसंवाद, शिबिरे इत्यादींची सारांशरूपाने माहिती खालील प्रमाणे (एकूण ५७).

१) अखिल भारतीय संमेलने (स्थापनेपूर्वीची २ धरून) एकूण ८, गोवा. (१९८०, १९८६, २००५), मुंबई (१९८०), पुणे (१९८७, १९९६, २००३) रत्नागिरी (१९९७)

२) वैद्यकीय परिसंवाद/व्याख्याने - एकूण ३ (सर्व मुंबईत)

३) तरुण लघुउद्योजक, व्यावसायिक यांचे मेळावे, चर्चासत्रे - एकूण ९ (पुणे ४, रत्नागिरी १, मुंबई-ठाणे ४)

४) वसंतगौरव, कलादर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम - (मुंबईत) - १०

५) पुणे-मुंबईत कार्यकर्ते व सभासद संयुक्त सभा, शिबिरे - २

६) विभागीय मेळावे - सभा - एकूण २२ - पुणे (३), वेंगुर्ले (१), पुरळ (१), गोमंतक (३), नागपूर (४), औरंगाबाद (१), सांगली (३), ठाणे (२), डोंबिवली (२), मुंबई (२)

३) सदस्यांच्या सहली - ४ (खंडाळा, गोरेगांव मुंबई. आवास, गोवादर्शन)

(यात पुण्यांत प्रतिवर्षी साजरा होणारा वर्धापनदिन कार्यक्रम समाविष्ट नाही)

### कुलवृत्तांत

१९४६ मधें प्रसिध्द झालेल्या कुलवृत्तांताची अद्ययावत माहितीची ९०० पानांची देखणी दुसरी आवृत्ती ऑक्टोबर १९९२ मधे प्रसिध्द करण्यात आली. यातील माहिती साधारणपणे १९८८-९० पर्यंत अद्ययावत आहे. त्यानंतर आतां १५ वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. कुलवृत्तांतात विद्यार्थी म्हणून दर्शविलेले अनेक कुलबांधव आतां कर्ते बनून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करीत असणार. त्यांची माहिती, विशेषत: उद्योग-व्यवसाय इ. माहितीचे अद्ययावतीकरण करून ती उपलब्ध करून देण्याची गरज आहे. कुलवृत्तांताच्या प्रतीही शिल्लक नाहीत. त्यामुळे कुलबांधवांकडून आलेली मागणी भागवतां येत नाही.

सर्व ११५ घराण्यांची माहिती एकत्रितपणे एकदम प्रसिध्द करण्याऐवजी घराण्याचे 'गट' करून (उदा. गोमंतकीय घराणी) गटवार या कामाची जबाबदारी त्या त्या घराण्यांतल्या लोकांनी उचलली तर हें काम सुलभ होईल. 'दरवर्षी कांही गट' या पध्दतीने तसेच ही पध्दत कायमची चालू ठेवल्यास प्रत्येक घराण्याची माहिती जास्तीत जास्त ४-५ वर्षांत अद्ययावत होऊं शकेल.

### शिक्षण सहाय्य

कुलबांधवांकडून मिळणाऱ्या देणग्यांतून शिक्षण निधी निर्माण करण्यात आला असून त्यांतून गुणवान विद्यार्थ्यांना पारितोषिके आणि गरजूंना आर्थिक सहाय्य करण्यात येते. याची सुरवात स्थापनेनंतर लगेचच म्हणजे ऑक्टोबरमधे एका कुटुंबातील मुलाला रु. ५०० परतफेडीचे (बिनव्याजी) सहाय्य देऊन करण्यांत आली. तसेच १९८५ मधें इंजिनियरिंगची फी भरण्यासाठी एका होतकरू विद्यार्थ्यास रु. ३५०० अर्थसाहाय्य देण्यात आले. शिक्षण निधी वापराची नियमावली तयार झाल्यावर १९८८ च्या परीक्षांपासून १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर इ. परीक्षांतील गुणवंतांना तसेंच कला, क्रीडा इ. क्षेत्रांतल्याही कामगिरीबद्दल प्रतिवर्षी पारितोषिके देण्यास सुरवात झाली.

शैक्षणिक बाबतींत केवळ आर्थिक सहाय्यच नव्हे तर विविध शिक्षणक्रम, व्यवसायसंधी इ. बाबत मार्गदर्शनपर माहिती हितगुजमधून कुलबांधवांपर्यंत पोचवली जाते.

### वैद्यकीय मदत

बायपास सर्जरी, कॅन्सर उपचार, किडनी ट्रान्सप्लांट यांसारख्या मोठया खर्चिक आजारांत कुलबांधवांना वैद्यकीय मदत करण्यासाठी एका कुलबांधवाच्या देणगीतून निधी निर्माण करण्यात आला आहे. मात्र सध्याच्या वाढलेल्या वैद्यकीय खर्चाच्या संदर्भात ही मदत तुटपुंजीच पडते.

### उद्योजकांसाठी 'इन्क्युबेटर'!

श्रीनिवास ठाणेदार हे मराठी उद्योजक जिद्दीच्या बळावर अमेरिकेत गेले; आज कोटयवधी डॉलरची उलाढाल असणाऱ्या त्यांच्या अनेक कंपन्या आहेत. आता पुढच्या काळात धडाडी व चिकाटी असणाऱ्या भारतीय तरुणांना उद्योजक होण्यासाठी मदत करावी, असे त्यांना वाटते. लहानग्या बाळांना डॉक्टर जसे 'इनक्युबेटर'मध्ये ठेवतात, तसे जिद्दी तरुणांना सुरुवातीच्या काळात स्वत:च्या पायावर चालण्यासाठी आधार द्यावा आणि मग त्यांनी भरारी घ्यावी, असे त्याचे स्वप्न आहे. ते पुरे करण्यासाठी आता ते प्रयत्न करणार आहेत.

आज तरुण असता तर अमेरिकेत गेला असता का ? या प्रश्नावर नकारार्थी उत्तर देत ठाणेदार म्हणाले की, भारतात आता इन्फ्रास्ट्रक्चरचा चांगला विकास होत आहे. आपली झपाट्याने प्रगती होत आहे. अशावेळी भारतात राहूनही प्रगतीची नवी शिखरे गाठणे शक्य आहे.

*(आभार: महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, ३.४.०५)*

### व्यावसायिक कर्जे

एका कुलबांधवाला स्वत:चे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी रू. ५००० चे बिनव्याजी कर्ज देण्यात आले. आणि त्याची परतफेडही मुदती आधीच करण्यात आली.

### विवाह सहाय्य

पुणें व सांगली येथे प्रतिष्ठानच्या वतीने वधू-वर सूचक मंडळे कार्यरत आहेत. केवळ मराठेच नव्हे तर अन्य बांधवही या सेवेचा फायदा घेतात. मुंबईतही वधू-वर सूचक मंडळ सुरवातीला काहीं काळ चांगले काम करीत होते. पण तें चालू ठेवणे शक्य झाले नाही.

### संपर्कमाध्यम हितगुज

सभा-संमेलने, मेळावे इ. मार्फतचा संपर्क हा नैमित्तिक असतो. सर्वांनाच ते शक्य नसते. यासाठी घरबसल्या परस्परांशी विचारांचे, माहितीचे आदान-प्रदान करण्याच्या दृष्टीने हितगुज त्रैमासिक उपयुक्त ठरते.

आतांपर्यंत हितगुजचे ६१ अंक प्रसिध्द झाले आहेत. प्रतिष्ठानवृत्त, सभासदवृत्त, प्रतिष्ठानचे कार्यक्रम व उपक्रम यांची माहिती, प्रासंगिक निवेदने, आवाहने, वाचकांच्या सूचना/प्रतिक्रिया, परस्पर सहकार्यासाठी उपयुक्त माहिती, (सहकार्य देणारे व सहकार्य हवे असणारे अशी दोघांचीही), कर्तुत्ववान कुलबांधवांचा परिचय तसेच कुलबांधवांचे ललित वा वैचारिक लेखन अशा तऱ्हेचा मजकूर हितगुजमधें येत असतो.

प्रकाशनाचा खर्च आणि टपालाचेही वाढते दर लक्षांत घेता एकदा घेतलेल्या तहहयात वर्गणीच्या रु. २०० वरील व्याजातून हितगुजचा खर्च भागवणे अशक्य होत आहे. कुलबांधवांच्या देणग्या-जाहिराती यांच्या आधाराने हितगुज अजून तरी चालू राहिले आहे, आणि पुढेंही राहील अशी खात्री आहे. कारण आपणा सर्वांना ते हवे आहे. एकमेकांशी संवाद-संपर्क साधण्याचे ते एक प्रभावी माध्यम आहे.

### उद्योग प्रवर्तन

सर्वसामान्य मराठी माणसाच्या मध्यमवर्गीय मानसिकतेला साजेसा मराठे मंडळींचा जीवनाचा दृष्टिकोन 'उत्तम नोकरी, मध्यम व्यापार, कनिष्ठ शेती' असा राहिला आहे. अलिकडच्या काळांतली राजकीय, सामाजिक परिस्थिती पाहतां ही मानसिकता बदलण्याची आता निकड निर्माण झाली आहे. चित्पावन कोकणस्थ ब्राम्हणांना आतां नोकऱ्या मिळणे जास्त जास्त अवघड होत आहे. मी त्याला ब्राम्हणजातीला मिळालेला 'जानव्याचा

शाप' म्हणतो.

प्रतिष्ठानचे संस्थापक, संवर्धक कै. सुरेशभाऊ आणि त्यांचे सहकारी यांना या गोष्टीची चाहुल लागली असावी. म्हणून त्यांचा पहिल्यापासूनचा रोख आपले कुलबांधव अधिकाधिक उद्योग-व्यवसाय-प्रवण कसे होतील यासाठी प्रयत्न करण्यावर होता. गेल्या १०-१२ वर्षात तर तरुणांचे मेळावे, लघुउद्योग-व्यावसायिकांचे खास मेळावे, सफल उद्योजक-व्यावसायिकांशी त्यांची चर्चासत्रे असे कार्यक्रम प्रतिष्ठान मार्फत आयोजित करण्यावर त्यांचा भर होता. हितगुज मधूनही अशा प्रयत्नांना प्रेरणा मिळेल, दिशा सापडेल, आर्थिक, तांत्रिक, व्यवस्थापनविषयक माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारचे साहित्य वाचकांपर्यंत पोचवण्याचा प्रतिष्ठानचा अट्टाहास आहे.

याचा इष्ट परिणामही हळूहळू दिसत आहे. आज बऱ्याचशा 'मराठे' कुटुंबातील नवीन पिढी स्वतंत्र उद्योग-व्यवसाय करण्याची कल्पना स्वीकारू लागली आहे. निदान नोकरी बरोबरच साईड बिझनेस म्हणून तरी उद्योग-व्यवसाय क्षेत्रांत मुशाफिरी करीत आहेत असे चित्र आज बऱ्याच 'मराठे' कुटुंबात दिसू लागले आहे.

**संस्थापक-संवर्धक कार्यकर्ते**

खालील कुलबांधव १९८० पासून (अस्थायी समिति) आजतागायत सातत्याने प्रतिष्ठानच्या कार्यात सहभागी आहेत.

१. कै. सुरेश सखाराम उर्फ सुरेशभाऊ (५-२-२००० रोजी निधनापर्यंत)
२. श्रीमती सुलभा सुरेश (५-२-२००० पर्यंत सुरेशभाऊंबरोबर आणि त्यानंतर स्वत: विश्वस्त म्हणून)
३. वामन गणेश, जोगेश्वरी, मुंबई
४. आनंद यशवंत, ठाणे
५. मोहन सदाशिव, खार, मुंबई
६. अरूण दत्तात्रय, पुणे (पुणे शाखा कार्यवाह)
७. कै. श्री. प. तथा बापुसाहेब, पुणे (२२-२-९८ रोजी निधनापर्यंत)
८. कालिदास बाळकृष्ण, गोवा
९. कृष्णा काशिनाथ, गोवा.

याशिवाय पुढील कुलबांधवांचाही प्रतिष्ठानच्या कार्यात दीर्घकालीन, महत्वाचा वाटा आहे याचीही नोंद घ्यायला हवी.

१. विनायक गोपाळ, मुंबई (१९८३-८४ पासून अजूनही अमेरिकेतून मार्गदर्शन)
२. विनायक केशव, वरळी, मुंबई (१९८६-८७ पासून आजतागायत)
३. लक्ष्मण शंकर, मुंबई (हितगुजचे संपादक १९९२-९३ पासून)
४. कै. वामन आत्माराम, पुणे (पुणे शाखेचे सुरवातीपासूनचे सर्वे-सर्वा - ३-३-०५ रोजी निधनापर्यंत)
५. अरविंद गो., मिरज (१९८३-८४ ते २०००-०१)
६. माधव नारायण, डोंबिवली (१९८६-८७ पासून २०००-०१)

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे सुरेशभाऊंचे चिरंजीव यशवंतराव २००१-०२ पासून, त्यांची पत्नी अदिती २००४-२००५ पासून आणि 'वागं'चे चिरंजीव पुष्करराज २००४-०५ पासून, दुसऱ्या पिढीतले प्रतिष्ठानचे कार्यकर्ते म्हणून आता कामाला लागले आहेत. राजकारणात अशी 'घराणेशाही' हा दोष मानला जात असला तरी सामाजिक संस्थांत अशी घराणेशाही वरदानच ठरते, कारण या पिढीला त्यांच्या वडिलांकडून समाजकार्याचे बाळकडू मिळालेले असते.

**सध्याचे सारथी**

प्रतिष्ठानचे प्रचलित विश्वस्त मंडळ आणि कार्यकारी मंडळ २००६-०७ पर्यंत कार्यरत रहाणार आहे. यामधे वर उल्लेख केलेल्या दुसऱ्या पिढीतल्या कार्यकर्त्याप्रमाणेच आनंदराव मराठे, मोहनराव मराठे, वि. के. मराठे, लक्ष्मण शंकर मराठे, सी. गो. खांबेटे (९५-९६ पासून), प्रमोद कृष्ण (९५-९६ पासून) या जुन्या, जाणत्या कार्यकर्त्यांबरोबर युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष सतीश काशिनाथ (२००१-०२ पासून), ओ.एन.जी.सी चे जनरल मॅनेजर, डॉ. राजेंद्र विठ्ठल (२००१-०२ पासून), माजी अध्यक्ष अरविंद दामोदर (१९९५-९६ पासून) तसेंच आंतराष्ट्रीय ख्यातीचे इंजिनियर रमाकांत माधव विद्वांस, सध्याचे कार्योपाध्यक्ष (१९९८-९९ पासून), २५ वर्षांहून अधिक चार्टर्ड अकौंटंट म्हणून व्यवसाय करणारे सध्याचे कोषाध्यक्ष प्रभाकर दामोदर (२००३-०४ पासून), सहकार्यवाह हेमंत अरुण, नालासोपारा (२००१-०२ पासून), प्रॉजेक्ट कन्सल्टंट हेमंत महादेव, विलेपार्ले, मुंबई (२००१-०२ पासून), हाडाचे समाजकार्यकर्ते चिंतामणी महादेव (डिसेंबर १९९९ पासून) आणि संपादकीय कामाच्या अनुभवी डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर (२००४-०५ पासून) असे आपापल्या क्षेत्रांतले अतिरथी-महारथी असा हा जुन्या-नव्यांचा सुंदर संगम झालेला आहे. जोडीला पुणे शाखेचे धडाडीचे कार्यकर्ते सौ. नीलांबर मराठे, मानसतज्ञ, निवृत्त जेल सुपरिटेंडंट अच्युत महादेव आणि श्रीनिवास मराठे ही मंडळी आहेत. या कार्यकर्त्यांच्या समर्थ सारथ्याखाली प्रतिष्ठानची यापुढील वाटचाल - नव्हे घोडदौड, अधिक वेगवान होईल असा विश्वास व्यक्त करायला हरकत नाही.

* * *

## सामान्यत्व

**- सौ. वासंती वसंत**, (पृ. २८०), औरंगाबाद

कोण म्हणतं जगातून जाताना
बरोबर काही येत नसतं
दिल्या - घेतल्याचे वागतांना
सुकृताचं गाठोड जमत असतं
पाप-पुण्याच्या गोष्टी करतांना
अख्ख जीवन निघून जातं
सुख:दुखाच्या गप्पा मारतांना
रितेपणच पदरी पडत जातं
लौकिक सुख भोगतांना
अलौकिक तत्त्व सरून जातं
आदर्शाचा बडेजाव करतांना
अहंकाराचा फुत्कार विष पेरतं
सगळं सगळं मिळावं म्हणतांना
स्वार्थाचा बोजा वाढत जातो
हे सर्व द्वंद बरोबर नेताना
सुकृताचं गाठोड भरगच्च भरतं
त्याच ओझं सहन करतांना
वासनांच मोहोळ आत्म्याभोवती फिरतं
आत्मा जाणिवेच्या रूपात फिरतांना
जन्ममरणाच्या चक्रात पडतो

# में बाबू बोलसां

- विनायक केशव (पृ. २०), वरळी, मुंबई

*संमेलनांत सफल उद्योजक म्हणून 'बाबू' चा सत्कार करण्यांत आला. तेव्हा मी सांगितले होते की, 'बाबू' म्हणजे गोव्यांतल्या संपूर्ण कोकणस्थ ब्राह्मणांपैकी 'टाटा' आहे. याचा प्रत्यय ही मुलाखत वाचताच तुम्हाला येईलच. - संपादक*



**गोवा संमेलनात 'बाबू'चा सत्कार**

**मराठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंद यशवंत यांच्या हस्ते**

गोवा संमेलनानिमित्त मराठे परिवारातील मंडळी एकत्र आली. गप्पागोष्टी, चेष्टामस्करी यांना ऊत आला होता. दुपारी भोजनमांडवात उन्हाळ्याने हैराण होऊन घाम पुसत होतो. मांडवाशेजारच्या घराच्या व्हरांड्यात पंखा गरगर फिरत होता. खाली दोन-चार रिकाम्या खुर्च्या होत्या. मालकाची परवानगी घेऊन खुर्ची काबीज करावी म्हणून पायरी चढलो. इतक्यांत एक गृहस्थ अचानक खोलीतून आले व खुर्चीत बसले. मला हायसं वाटलं. तेच मालक आहेत असं समजून ''बसू ना खुर्चीत ?'' असं वरकरणी म्हणत खुर्चीत स्थानापन्न झालो.

सुरवात करावी म्हणून मी सहज म्हटलं, ''घर किती छान बांधलय ? कोकणात असूनसुद्धा मुंबईचा पेहराव.''

''आता तुमच्यासारख्या पाव्हण्यांना पसंत पडलं म्हणजे बांधल्याचं समाधान वाटतं.''

'अरेच्या, म्हणजे हे गृहस्थ घरमालकच निघाले की', मी मनातल्या मनात पुटपुटलो.

''आपण इथंच राहता ?''

''हो तर, इथं राहतो. डिचोलीला राहतो, जाऊन येऊन असतो. भाऊ इथलं सांभाळतात.''

''अस्सं. म्हणजे आपला व्यवसाय डिचोलीला असतो.''

''अहो, व्यवसाय एकवचनी नव्हे अनेकवचनी आहे.''

''अरे वा. मग तुमची हरकत नसेल तर व्यवसायावरच गप्पा मारू या.''

नीळकंठरावांनी (म्हणजे घरमालकांनी) सुरवातच एवढी मस्त केली की मी त्यांना अडवलच.

''एक मिनीट. नुसत्या गप्पांवर नाही भागणार. मला कागद देता का ? उतरूनच घेतो.''

''कशाला ?''

''कशाला म्हणजे ? आपल्या हितगुजमध्ये एवढी चांगली मुलाखत नको का द्यायला ?''

''बघा बुवा, मला जमेल तसं सांगतो. कसं कसं उतरून घ्यायचं, काय उतरून घ्यायचं, तुमचं काम.''

''प्रथम माझं नांव सांगतो. नीळकंठ परशुराम मराठे. लोक बाबूच म्हणतात. जन्म याच गांवांत १९४९ मध्ये. तारीख सांगायची तर तीस एप्रिल.''

''अरेच्चा. अहो आजची तारीख ३० एप्रिलच. प्रथम तुमच्या वाढदिवशी तुमच्याच घरात तुमचाच चहा पिऊन, अभिनंदन करतो.''

दोघेही पोट भरून हसलो.

''मला चार भाऊ आणि मोठी बहीण. माझं प्राथमिक शिक्षण इथंच (बिंबलमध्ये) झालं. पुढे बेळगांवला Dip. in Mech. Eng. पर्यंत शिक्षण घेऊन परत बिंबलात १९७१ साली आलो.''

पुढे Tyres India या कंपनीत दहा वर्षे कसून नोकरी केली. Tyres India च्या कामात तरबेज झालो. नोकरीचे पाश तोडून स्वतंत्र व्यवसाय करावा म्हणून एक नव्हे तीन प्रयत्न केले. १९७७ मध्ये जागा घेतली पण दुर्दैवाने दुसऱ्या दिवशीच धाकट्या भावाचे अकस्मात निधन झाले. या धक्क्यातून सावरत १९७८ मध्ये होंडा (सत्तरी) येथे भाड्याची जागा घेतली. पण समोरच भीषण अपघात झाला म्हणून हाही प्रयत्न सोडून द्यावा लागला. अखेर १९८० मध्ये डिचोली येथे इन्डस इंजिनिअरींग कंपाऊंडमध्ये भाड्याने जागा घेतली. त्यासाठी रु. १००० अनामत रक्कम भरली पण दुर्दैव पुन्हा आडवं आलं. सरकारने अगोदर यंत्रसामुग्री घ्या मगच शेडचा ताबा देण्याचा विचार केला जाईल असे कळवले. शक्य तो कोणाकडूनही मदत न घेता स्वत:च्या सामर्थ्यावर व्यवसाय उभारण्याच्या स्वप्नाचा चक्काचूर झाला.''

''म्हणजे देव तुमची परीक्षाच घेत होता म्हणायचा.''

''अगदी बरोब्बर. मग मनाला मुरड घालून नाइलाज म्हणून नातेवाईकांच्या व कुटुंबियांच्या मदतीने मार्जिन मनी ची व्यवस्था केली. महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉरपोरेशनकडून रु. ५०००० कर्ज मिळवले आणि सत्तावीस फेब्रुवारी १९८२ रोजी 'ट्रक टायर व कार टायर रिट्रेडिंग'चा व्यवसाय सुरू केला.''

''पुन्हा नशिबाने पलटी खाल्ली. १९८३ मध्ये बाजारात मंदीची लाट आली. मागणी झपाट्याने कमी होऊ लागली. यावर उपाय म्हणून ट्रान्सपोर्ट बसगाड्यांचेच टायर्स रिट्रेडींग करण्याचे ठरवून व्यवसाय कसाबसा चालू ठेवला. पण दुर्दैव माझा पाठलाग करतच होते. रस्ते खराब असल्यामुळे रिट्रेडींग फारसे टिकत नव्हते. दोषारोप मात्र आमचेवर येऊ लागले. ग्राहकांचा रोष, मंदीचा फटका या सगळ्या संकटांना धैर्याने तोंड देत १९८७ साल केवळ ईश्वरी कृपेनेच गाठले.''

''नीळकंठराव...''

''एवढां मोठां नांव नाकां रे. बाबू म्हण माला. तांच बरां लागसे कानाला.''

''बाबू म्हणजे फारच एकेरी वाटतं बुवा. मी बाबुराव म्हणतो.''

''खरं सांगू ? आमच्या गोव्यात एकेरी नावातच खरं प्रेम दडलेलं असतं.''

''असो. म्हणजे १९८७ मध्ये तुम्ही देवाने घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण झालात असंच ना ?''

''असं म्हणायला हरकत नाही. ऑक्टोबर १९८७ मध्ये टाटा कंपनीच्या नवीन गाड्यांच्या भागांचे वेल्डींग करण्याचे सब-कॉंट्रॅक्ट ऑटोमोबाईल कॉरपोरेशन ऑफ गोवा या कंपनीकडून मिळाले आणि पाच वर्षांपर्यंत तरी स्थिरता लाभली.''

''मग पुढे ?''

''एकदा फासे मनासारखे पडू लागल्यावर माझ्यातला हरहुन्नरी बाबू जागा होऊ लागला. एक खांबी तंबू असण्यापेक्षा भावांना निरनिराळे व्यवसाय काढून द्यावे या उद्देशाने १९८९ पासून लाँड्रीचा व्यवसाय भावाला काढून दिला. यासाठी डिचोलीच्या जागेची निवड केली.''

''१९९० मध्ये बँकेचे कर्ज काढून डिचोली येथे नवीन प्रशस्त जागा घेतली व सब कॉंट्रॅक्टचे काम वाढवले. तसेच नवीन जागेच्या पूर्वीच्या मालकाचा सिमेंटचे 'रेडीमेड स्ट्रक्टर' चा व्यवसाय चालू ठेवला.''

''रेडीमेड सिमेंट स्ट्रक्टर म्हणजे नक्की काय?''

''रेडीमेड सदरा, रेडीमेड कोट-पँट मिळतात ना तसेच रेडीमेड स्ट्रक्चर. दूध केंद्र, वॉचमन चौकी, पंप हाऊस, सेप्टीक टँक, इतर टाक्या, शेतीमाल विकण्याची केंद्रे वगैरे बांधकामे आम्ही तयार स्वरूपात विकतो.''

''अरे व्वा, नीळकंठराव, सॉरी. बाबूराव, आता काही दिवसांनी तुम्हाला ऑर्डर दिली की तयार संडास, तयार बाथरूम इतकंच काय पण तयार घर सुद्धा तुम्ही द्याल.''

''तुमच्या कृपेने आणखी बऱ्याच योजना प्रत्यक्षात उतरतील.''

''अहो माझी कसली कृपा? मराठे परिवाराची कृपा म्हणा आणि सगळ्यात महत्त्वाची म्हणजे त्या देव व्याडेश्वराची कृपा.''

''हे बाकी खरंच हां. हा व्यवसाय अगदी उत्तम रीतीने आजपावेतो चालू आहे.''

''मग पुढची भरारी?''

''सांगतो ना. याच जागेत १९९१ मध्ये बँकेचे कर्ज काढून त्यातून जुनी पण उपयोगी यंत्रसामुग्री खरेदी केली व मोझेक राईल्सचा नवा व्यवसाय सुरू केला. जोडीला कडप्पा, मार्बल, ग्रेनाईट, कोटा इत्यादि नॅचरल स्टोनना पॉलिश व कटींगचा व्यवसाय सुरू केला.''

''इ.स. २००० मध्ये सिरॅमिक टाईल्स निर्माण करण्याचा व्यवसाय सुरू केला. या सर्व खटाटोपात सिमेंटचा पुरवठा कमी पडू लागला. मग कायमचा उपाय म्हणून राजश्री सिमेंट व झुआरी सिमेंटची डीलरशिप मिळवली.''

''बाबूराव. पुढे कोणता नवा प्रांत काबीज करणार?''

''१९८८ मध्ये डिचोलीला राहण्यासाठी प्लॉट घेतला होता. सिमेंट, टाईल्सचा व्यवसाय होताच. तेव्हा एक नवीन धाडस करण्याचं ठरवलं. हे धाडस म्हणजे बांधकाम क्षेत्र. नशिबाने बुकिंगच्या द्वारे पैसा हाती आला. शेजारचा भूखंड घेतला. त्यावर फ्लॅटस् बांधून विकले. आणखी एक भूखंड घेऊन स्वत:साठी बंगला बांधला. २००५ मार्चमध्ये डिचोलीच्या मध्यवर्ती भागात एक सुंदर इमारत बांधून लॉज चालू केले.''

''बाबूराव, कर्तव्यपूर्तीचा, आकांक्षापूर्तीचा आनंद सुखकारक असतोच. पण असं म्हणतात की खरे व्यावसायिक कर्जाच्या आधारावरच व्यवसाय करतात. मग कर्जमुक्तीचा आनंद त्यांना कधीच मिळत नाही का?''

''कां नाही? मराठे साहेब....''

''मी कोणी साहेब वगैरे नाही. मराठे प्रतिष्ठानचे सगळेच मला V. K. म्हणतात.''

संमेलनाची वैशिष्ट्ये

## चित्पावनी गोमंतकीय रेसीपीज लोकप्रिय

संमेलनात खास चित्पावनी गोमंतकीय खाद्यपदार्थ जेवणात ठेवले होते. संमेलन स्मरणिकेत 'आमचे मेनू' म्हणून यांतल्या काही पदार्थांच्या कृती दिल्या होत्या.

संमेलनाला आलेल्यांना तर हे सर्व पदार्थ आवडलेच. पण मुंबईला माझ्याकडील स्मरणिका वाचणाऱ्या बऱ्याच वाचकांनी या पदार्थांविषयी विचारले. काहींनी तर त्यांच्या कृती लिहून घेतल्या. - **संपादक**

''बरं V. K. मी १९९९ मध्ये कर्जमुक्तीचा दुर्लभ आनंद उपभोगला. मणामणाच्या बेड्या खळाळून तुटून पडाव्या तशी स्थिती झाली.''

''बाबूराव, उद्योग व्यवसाय करावा अशी धारणा केव्हापासून निर्माण झाली?''

''खरं सांगू का? धारणा वगैरे जड शब्दांची माहिती नाही. पण नोकरीमध्ये शाश्वती नाही याची खात्री झाल्यावर माझ्यासारख्या कुटुंबवत्सल माणसाची झोपच उडाली; तेव्हा अनुभव नसतानासुद्धा नोकरीतल्या कामाची शिदोरी घेऊन उद्योगधंद्यात शिरण्याचे मी निश्चित केले.''

''बाबूराव, या सर्व चढउतारात तुम्हाला साथ कोणाची लाभली?''

''सर्वप्रथम कर्ताकरविता देव व्याडेश्वर. त्याचे छत्र निरंतर आहे. शांतादुर्गा तर महामाता. आता इतर सहाय्य म्हणजे १९८७ मध्ये ऑटोमोबाईल कॉरपोरेशन ऑफ गोवा देवासारखी धावून आली. Ferro Cement च्या बाबतीत Goa Dairy च्या कामामुळे स्थिरता प्राप्त झाली.

''सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझी पत्नी नोकरी करत होती, घरात मर्यादित का होईना पण पैसा येत होता. या दिलाशावरच मी अनेक धाडसी निर्णय घेतले आणि आईवडिलांच्या पुण्याईने यश प्राप्त झाले.''

''परमेश्वरावर माझी अढळ श्रद्धा आहे. आपण त्याच्या कसोटीला उतरले पाहिजे. एकट्यासाठी जगता कामा नये, आपल्या कुटुंबासाठी आपण सर्व शक्तीनिशी झटलं पाहिजे. आपल्या कुटुंबातील माणसांचं समाधान हीच आपल्या प्रयत्नांना मिळालेली पावती असते.'' ★★★


गोव्यांतील अखिल भारतीय मराठे परिवार संमेलनातील जेवण-फराळ-चहापाणी ही व्यवस्था आम्हीच केली होती. - खास गोमंतकीय पद्धतीच्या पदार्थांची योजना करून.

*तुमच्या प्रतिक्रिया जाणून घ्यायला आम्हाला आवडेल.*

**श्री. मराठे कॅटरर्स**

शुद्ध शाकाहारी



प्रोप्रायटर : दीपक प्रभाकर मराठे

सुधा कॉलनी, बोर्डे, डिचोली, गोवा ४०३५०४.

फोन : २३६३३०२ मोबाईल : ९४२२०५६३७६

# सभासद वृत्त

## मानसन्मान

**प्रभाकर गणेश यांना मदर टेरेसा पारितोषिक**



Front for National Progress, दिल्ली, या संस्थेतर्फे २३.५.२००५ रोजी **बंगलोरमध्ये** झालेल्या एका सेमिनारमध्ये **प्रभाकर गणेश (पृ.६१)** यांना **मानव सेवेसाठी त्यांनी केलेल्या कार्याबद्दल मदर टेरेसा ॲवॉर्ड देण्यांत आले.** कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन, नेरे या संस्थेसाठी त्यांनी १९८६ मध्ये एक प्रोजेक्ट रिपोर्ट दिला होता. तो आता पूर्णपणे कार्यान्वित झाला आहे. या कामासाठी त्यांचा हा बहुमान करण्यात आला. मराठे प्रतिष्ठानतर्फे प्रभाकर गणेश यांचे अभिनंदन.

**अजय मधुसूदन यांचा सन्मान**

ए.एम्.डी. फार ईस्ट लि. (इंडिया) या कंपनीचे भारतातील मुख्य माहिती अधिकारी व अध्यक्ष **अजय मधुसूदन (पृ.७०)** यांचा अमेरिकेतील टेक्सास टेक विद्यापीठाच्या इंडस्ट्रिअल इंजिनिअरिंग ॲकेडेमीत समावेश करण्यात आला आहे. औद्योगिक अभियांत्रिकी क्षेत्रांत उच्च दर्जाचे शिक्षण देण्यांत ही ॲकेडेमी अग्रेसर मानली जाते. टेक्सास टेक युनिव्हर्सिटीतच त्याचे शिक्षण झाले. अजय मराठे यांच्या औद्योगिक अभियांत्रिकी क्षेत्रांतील योगदानाचा आढावा घेऊन त्यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली.

अजय यांचा हा सन्मान मराठे कुलबांधवांना खासच अभिमानास्पद आहे. मराठे कुलवृत्तांताचे संपादक विनायक गोपाळ यांचा हा पुतण्या.

अजय मधुसूदन यांचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

**'किरात'ला पारितोषिक**

फेब्रुवारी २००५ मध्ये पुण्यांत झालेल्या महाराष्ट्र मुद्रण परिषदेच्या अधिवेशनात महाराष्ट्रांत **तीन पिढ्यांहून अधिक काळ मुद्रण व्यवसायांत असलेल्या मुद्रणालय चालकांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यांत आला.** त्यांत 'किरात' मुद्रणालयाचा समावेश होता. 'किरात' चे मालक, चालक **श्रीधर केशव** (पृ.३९६) यांचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन.

## विवाह सुवर्ण महोत्सव

मराठे प्रतिष्ठानचे माजी कोषाध्यक्ष आणि मराठे कुलवृत्तांताच्या आवृत्तीचे सहाय्यक संपादक **माधव नारायण (पृ. ३२९), डोंबिवली यांच्या विवाहास दि. १३ मे २००५ या दिवशी पन्नास वर्षे पूर्ण झाली.** त्या निमित्ताने त्यांचा पुत्र मिलिंद व कन्या सौ. अनिता मेहेंदळे व सौ. मनीषा सप्रे यांनी आपल्या माता पित्यांचा विवाह सुवर्ण महोत्सव सोहळा रविवार दि. १५-५-२००५ रोजी मोठ्या दिमाखात साजरा केला. समारंभास अंदाजे १५० जणांची उपस्थिती होती. सर्व आमंत्रितांचे यथोचित स्वागत करून झाल्यावर सर्वांना अल्पोपहार व चहापान करण्यात आले. त्यानंतर स्थानिक कलावंताच्या वाद्यवृंदाचा सुगम संगीत, भावगीते यांचा श्रवणीय कार्यक्रम दोन तास साजरा झाला. डोंबिवली चित्तपावन ब्राह्मण संघाचे अध्यक्ष श्री. माधव घुले यांनी उत्कृष्ट निवेदनाव्दारे हा कार्यक्रम सादर केला. त्यानंतर सुग्रास भोजनाचा आस्वाद घेऊन तृप्त मनाने सर्व उपस्थितांनी 'माना' व पत्नी सौ. विद्या यांचे अभीष्ट चिंतन केले.

## नांदा सौख्य भरे

१. गोव्यांतील प्रतिष्ठानचे सभासद **अशोक रामचंद्र,** कार्यकारी अभियंता (पृ.१८८) **यांचा मुलगा अमित** अमेरिकेत सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून काम करीत आहे. त्याचा विवाह ५.२.२००५ रोजी मानसी मुकुंद देवधर हिच्याशी पुण्यांत श्रुती मंगल कार्यालयांत साजरा झाला.

२. पुण्यातील कुलबांधव **दिनेश त्र्यंबक (पृ.२१८) यांचा मुलगा आशुतोष** याचा विवाह मुक्ता रामचंद्र भिडे, पुणे हिच्याशी २४.५.२००५ रोजी पुण्यात थाटामाटाने साजरा झाला.

३. पुण्यातील सभासद **चिंतामणी रामचंद्र (पृ.४१) यांची मुलगी पल्लवी** हिचा विवाह सचिन अरुण लेले, इंदोर, यांच्याशी ८ जून २००५ रोजी पुण्यात थाटामाटाने साजरा झाला.

***वधुवरांस मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.***

## सहवेदना

१. मराठे प्रतिष्ठानच्या **पुणे शाखेचे संस्थापक-संवर्धक वामन आत्माराम ऊर्फ आण्णा** (पृ.३६६) यांचे अल्पशा आजाराने दि. ३.३.२००५ रोजी पुण्यांत निधन झाले. त्यांना काही दिवस अन्नपाणी जात नव्हते.

गोव्यांत ३० एप्रिल व १ मे रोजी झालेल्या मराठे प्रतिष्ठानच्या ८व्या अ. भा. अधिवेशनात त्यांचा सन्मान करण्याचे ठरविण्यात आले होते. त्याप्रमाणे निधनोत्तर हा सन्मान त्यांचा पुतण्या रमेश भिकाजी यांने त्यांच्यातर्फे स्वीकारला.

२. **मुंबई येथील कुलबांधव मुकुंद गोपाळ जोशी** यांचे ३ एप्रिल २००५ रोजी दुःखद निधन झाले. ते ६० वर्षांचे होते. रोलेक्स या जगप्रसिद्ध घड्याळ कंपनीच्या कुवैत शाखेत ते नोकरीला होते.

३. पुण्यांतील कुलबांधव प्रभाकर दत्तात्रय (पृ.१८२) यांची पत्नी शशिकला यांचे १५-४-२००५ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या.

**सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात मराठे परिवार सहभागी आहे.**

***

### मानसिक अपंगत्व

अपंगता ही शारीरिक व दुसरी मानसिक असते. शरीराने अपंग असलेली माणसे ही समाजाला किंवा जगाला धोकादायक नसतात. परंतु मनाने अपंग असणारी माणसे समाजाला व जगाला धोकादायक ठरतात. कनक, कांता, कीर्ती आणि सत्ता यांच्यापाठीमागे पिसाट होऊन सुसाट धावणारी माणसे फार मोठ्या प्रमाणावर मनाने अपंग असतात. वाटेल त्या स्थरावर जाऊन पैसा-संपत्ती मिळविणारी माणसे व सत्ता संपादन करण्यासाठी सर्व प्रकारची दृष्कृत्ये करणारी माणसे समाजाला व जगाला अक्षरशः दुःखाच्या खाईत ढकलत असतात. शरीराने पूर्ण अव्यंग असणाऱ्या माणसांना पूर्ण अपंग करण्याचे क्रौर्य हे अपंग मनाचे सत्ताधीश व कोट्याधीश करीत असतात.

**- सद्गुरु वामनराव पै**

# त्सुनामी आणि मी

- डॉ. सीमा शाम (पृ.४११), पुणे

***डॉ. सीमा मराठे एक प्रथित यश डॉक्टर तर आहेतच पण वैद्यकीय विषयावर त्यांची अनेक पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. त्या गोव्यातील मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनात उपस्थित होत्या. तिथे त्यांचा विशेष कर्तृत्वाबद्दल सत्कारही करण्यात आला होता.***

दिनांक ३० डिसेंबर २००४ च्या 'सकाळ'मध्ये 'इंडियन रेडक्रॉस पुणे शाखेतर्फे केलेले निवेदन वाचले. त्सुनामी लाटांच्या तडाख्यात सापडलेल्या नागरिकांना तातडीची वैद्यकीय सेवा देण्याकरिता डॉक्टर्सनी ताबडतोब संपर्क साधावा असे आवाहन होते. मी तडक रेडक्रॉसच्या शाखेत दाखल झाले. अकरा वाजता मिटींग झाली आणि दहा जणांची निवड झाली. २६ डिसेंबरला दुपारी १२ वाजता केरळमधील 'कोळम' या जिल्ह्याच्या किनाऱ्यावर त्सुमानी लाटांनी हाहा:कार माजविला, त्या ठिकाणी आम्हाला जायचे होते त्या ठिकाणी असलेल्या रिलीफ कॅम्पसमध्यें हजारो रुग्ण होते.

'दुसऱ्या दिवसी सकाळीच निघायचे आहे. सर्वांची तयारी आहे का?' असे विचारताच मी जरा दचकले. निर्णय अवघ्या पाच मिनिटांत घ्यायचा होता. आणि मी घरी कोणालाही न सांगता येथे आले होते. माझं घर, दवाखाना वगैरे अनेक बाबींची जबाबदारी सांभाळण्याची व्यवस्था करणं गरजेचं होतं. परन्तु डोळयासमोर असहाय अवस्थेतील असंख्य व्यक्ती तरळू लागल्या. त्यांचे हात सहाय्याकरिता माझ्याकडे विनविण्या करीत आहेत असे वाटले. अन् मी कोणताही दुसरा विचार न करतां होकार दिला. 'रेडक्रॉस'चे आवश्यक ते फॉर्मस् भरून दिले. जेट एअरवेजची तिकिट काढण्याकरिता तात्काळ हालचाली झाल्या.

---



# मराठे कुळांतला 'बोहरी' शिरीष वामन

- लक्ष्मण शंकर (पृ.५२०), मुलुंड, मुंबई

चारपांच वर्षापूर्वी पुण्यांत आण्णांकडे (वामन आत्माराम) बोलत बसलो होतो. अचानक खळकन कांचा फुटल्याचा आवाज आला. समोरच्या बंगल्यांतले गृहस्थ तावातावाने भांडत बाहेर आले. रस्त्यावर क्रिकेट खेळणाऱ्या मुलांनी त्यांच्या बंगल्याच्या १ल्या मजल्यावरच्या खिडकीच्या कांचा फोडल्या होत्या. खेळणाऱ्यांत बंगलेवाल्यांचीहि मुले होती. त्यामुळे त्यांच्या 'भांडण्यात' फारसा जोर नव्हता; लटका आवच जास्त होता.

आण्णा त्यांना म्हणाले, ''अहो मुले खेळायचीच. कांचा फुटायच्याच. यांतूनच 'सचिन' निर्माण होतात. सचिन तेंडुलकरने शिवाजी पार्कच्या अनेक बंगल्यांच्या कांचा फोडल्या होत्या. काळजी करू नका. मी शिरीषला फोन करतो. तो लगेच येईल आणि कांचा बसवून देईल''. आण्णांनी फोन केला. 'शिरीष येऊन जारे लगेच म्हणाले. पंधरा वीस मिनिटांत स्कूटरवरून एक पोरगेलासा तरुण आला. आण्णांना वाकून नमस्कार केला आणि म्हणाला 'काय काम आहे आण्णा?'

''अरे शेजारच्या बंगल्याच्या कांचा फुटल्यायत. जरा लगेच बसवून दे ना.'' शिरीषला घेऊन आण्णा त्या बंगल्यात गेले. शिरीषने फुटलेल्या काचांची मापे घेतली. नमुन्यासाठी फुटलेला तुकडा घेतला. जरा न्याहाळून पाहिला. म्हणाला, 'काळजी करू नका. अशाच कांचा आताच मी एका बंगल्यात बसवतो आहे. तुम्हाला अगदी original काचच मिळेल. उद्या सकाळी ११ वाजता माणूस येईल. तासाभरात काम संपेल.'

''बरोबरच बिल पाठव आणि मालकाकडून पैसे घेऊन जा. नाहीतर मला तुझे बिल देण्यासाठी यावे लागेल.'' - आण्णा

'शिरीष' गेल्यावर मी आण्णांना म्हटले, ''तुम्ही कांचवाल्याला फोन केल्यावर कोणीतरी बोहरी मुसलमान येईल. कारण या धंद्यांत त्यांचीच मोनोपॉली. पण आला एक महाराष्ट्रीय माणूस. आला तो आला, आणि तुम्हाला वाकून नमस्कारहि केला. हे काय गौडबंगाल?''

आण्णा म्हणाले, ''अरे हा आपला मराठेच. बेळगांवच्या वामनचा (वामन नारायण) मुलगा. वडिलांचे किराण्याचे दुकान होते. दुकानावर बसायला त्याला आवडायचे. पुण्यात मावशीकडे अधूनमधून येत असे. त्यांच्या बांधकाम व्यवसायांत त्याला इंटरेस्ट वाटे. बी.कॉम. झाल्यानंतर २-३ वर्षे बेळगांवांत दुकानावर, नोकरी-धंद्याच्या शोधात काढली. मराठी-कानडी वादामुळे कुठे डाळ शिजेना.''

मावशीचे दीर म्हणाले,'' माझ्या बांधकाम व्यवसायांत मदतीला का येत नाहीस? व्यवसाय वाढतो आहे. मलाहि घरचा माणूस मदतीला मिळेल.''

शिरीषने ही संधी पकडली आणि तो श्री. मनोहर यांच्या बांधकाम व्यवसायांत सहभागी झाला. चार-पाच वर्षे त्याच्याकडे नोकरी केली आणि १९८६ पासून MGM Corporation या नांवाने स्वत:चा काचेच्या तावदानांचा व्यवसाय चालू केला. बांधकाम व्यवसायांतले व्यापारी संबंध होतेच. त्यामुळे आर्किटेक्टस्, बिल्डर्स, सप्लायर्स यांच्या सहकार्याने धंदा वाढतच गेला. कांचेच्या तावदानाबरोबरच १९८८ पासून ॲल्युमिनियम विंडोज पण चालू केल्या.

वडिलांच्या दुकानावर बसण्याचे लहानपणापासूनचे बाळकडू, मावशीच्या दिरांबरोबर बांधकाम व्यवसायांतले बारकावे हेरण्याची मिळालेली संधी आणि स्वत:चा धंदा उभारण्यासाठी लागणारी चिकाटी, जिद्द, सचोटी आणि अथक परिश्रमांची तयारी यांच्या बळावर आज चाळिशीत शिरीष एक सफल व्यावसायिक म्हणून उभा आहे.

२५ वर्षांपूर्वी बेळगांवांत नोकरी शोधीत वणवण फिरणारा शिरीष आज त्याच्या दुकानांत काम करणाऱ्यांचा ८-१० कुटुंबांचा पोशिंदा आहे.

* * *

घरी आल्यानंतर मी 'इंडियन रेडक्रॉसच्या वतीने त्सुनामी लाटांनी पीडित लोकांची वैद्यकीय सेवा करण्यास जायचा निर्णय घेतला आहे' असे सांगितल्याबरोबर सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला. घरात भीतीचे वातावरण पसरले. माझ्या जाण्याला जोरदार विरोध झाला. तेथील परिस्थिती भयानक असून माझ्या जिवालाही धोका आहे असं सर्वांचं मत होतं. पण मी माझ्या निर्णयावर ठाम होते. आणि जाण्याच्या तयारीला लागले.

२००५ च्या १ जानेवारीच्या पहाटे तीन वाजतां आमची टीम पुण्याहून निघाली. मुंबईहून १०-४० ची फ्लाईट होती. त्रिवेंद्रमहून ८० कि.मी. उत्तरेस असलेल्या कोळम जिल्ह्यातील वेल्लीकाव् (Vellikau) या गावातील 'मातृकृपा' बंगल्यामध्यें आमची निवासाची सोय केली होती. वाहन व्यवस्था चोख केली होती.

तेथे गेल्यावर असं कळलं की भारतातूनच नव्हे तर संपूर्ण पृथ्वीवरील देशांमधूनही आमचीच डॉक्टरांची टीम प्रथम तेथे पोचली होती.

थोडयाच वेळाने आम्ही त्या भयानक त्सुनामी टायडलवेव्हज (Killerwaves) च्या जिभांनी असंख्य व्यक्तींना गिळंकृत केलेल्या ठिकाणी निघालो. अझीकल (Azheeckal) हे गाव अल्लपड (Allapad) पंचायतीत येते. हे समुद्रकिनारी वसलेले बेटच आहे. पश्चिमेला अरबीसमुद्र आणि पूर्वेला मोठी खाडी (कायल) ह्याचा मध्यभागी असून सर्वबाजूंनी पाण्याने वेढलेलेच आहे. बोटीने आम्ही त्या ठिकाणी गेलो.

एरवी समुद्र पहाताक्षणी त्याच्या दिशेने झेपावणारं मन आणि तनाने दूरच रहाण्याचा निर्णय घेतला. ज्या समुद्राने असंख्य जीवांचा बळी घेतला, घरे जमीनदोस्त केली, सर्व आसमंत अवघ्या अर्ध्या तासात अस्ताव्यस्त केला त्या समुद्राची खरोखरच भीती वाटली.

अझीकल गावांतील सर्व घरे रिकामी होती. कोणताही जीव त्यात नव्हता. एवढेच नव्हे तर सामानही वाहून गेले होते. घरांची फरशी वाळूने आच्छादलेली, भिंती अर्धवट किंवा पूर्णपणे पडलेल्या, दारं निखळलेली, छप्पर जमिनदोस्त झालेलं......सर्व आसमंतच भयग्रस्त वाटला. काही नवीन बांधलेली बैठी घरं शाबूत होती. मात्र पूर्णपणे रिकामी. ताठ उभी होती ती नारळाची झाडं. आज तीही मूक आणि गंभीर वाटली. बऱ्याच व्यक्तींना त्यांनीच वाचविले होते. लाटांचे तांडव चाललेलं असतांना ही झाडं थोडीही डगमगली नाहीत, वाकली नाहीत. त्यांना घट्ट धरून अनेक जीव मरणाच्या दारी असूनही जिवंत राहिले.

आम्ही गेलो त्याच दिवशी तुरळक रहिवासी आपापली घरं पहाण्यास तेथे आले होते. आमच्या सोबत दुभाषी असल्यामुळे त्यांनी सांगितलेल्या कथा समजल्या. एकाने आपल्या दोन मुलांना एका हाताने पकडून दुसऱ्या हाताने नारळाच्या झाडाला धरून ठेवले, तिघांचे प्राण वाचले. पत्नी मात्र लाटांमध्ये नाहीशी झाली. दुसऱ्याचे तिन्ही भाऊ, आई वडील सर्व मृत झाले. मात्र कशी कोण जाणे पण आजी वाचली. त्यानेच सांगितले की कधी जन्मात नारळाच्या झाडांवर न चढलेली माणसं लाटांना पाहून झराझर चढली आणि पानांच्या देठांना धरून बसली. लाटा मागे गेल्यावर मात्र खाली पुन्हा उतरणं अवघड झालं. त्यामध्यें काही जखमी झाले व काहींना जीवही गमवावा लागला.

काही घरातील सर्वच्या सर्व माणसं पाण्याखाली गुदमरून घरातच मेली. एकाने सांगितले की तो आणि त्याचे कुटुंब खरेदीकरीता बाहेर कोल्लम मध्यें गेले होते म्हणून वाचले. मात्र घरी वडील एकटे होते ते दगावले. एक ना दोन ........असंख्य कहाण्या कळल्या. प्रत्येक कहाणी वेगळी असूनही सारखीच! व्यवसायाने सर्व लोक मच्छिमार.

समुद्र किनाऱ्यावर असलेल्या इतर खेड्यांचीही हीच अवस्था झालेली. आम्ही तेथेही जाऊन अवलोकन केले. 'अमृतानंदमयी' माताजींच्या आश्रमापर्यंत पोहोचलो. पश्चिमेकडील बांधकाम पूर्णपणे जमीनदोस्त झालेले दिसले. माताजींचे काही युरोपियन शिष्य भेटले. त्यांनी सांगितले की लाटा आल्या त्यावेळी सतरा हजार लोक नव्यानेच बांधलेल्या हॉलमध्ये जमले होते. लाटांची खबर ऐकताच पूर्वेकडे सर्व धावले. तेथे उभ्या असलेल्या अनेक बोटीतून अर्ध्या तासात पलिकडे सुखरूप पोचले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे माताजींच्या आलौकिक शक्तीमुळे एकही व्यक्ती मृत्यूमुखी पडली नाही. हे एक आश्चर्यच आहे. आम्ही सर्व डोळ्यांनी पाहिलेलं आहे. अशीही कहाणी ऐकण्यास मिळाली.

काही तान्ही मुलं, आणि सत्तरीच्या घरातील स्त्री पुरुष वाचले परंतु तरुण वाहून गेले. दैवगती ही अशी, एवढं मात्र खरं की समुद्रकिनारी असलेल्या ह्या गावातील बरेचजण वाचले देखील.

वास्तविक असं झालं....... २६ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजतां समुद्राचं पाणी बरंच मागे गेलं आणि किनाऱ्यावर लहान मोठे असंख्य मासे तसेच राहिले. ताजे मासे सहजपणे मिळतील म्हणून मुले, बायका व पुरुष टोपल्या घेवून पळाले. वयस्क माणसं मात्र ओरडून सांगत होती की 'समुद्र असा मागे ओढला गेला आहे ही शुभ गोष्ट नाही. जाऊ नका. मागे परता. मागे या.' परन्तु त्यांचं म्हणणं ऐकण्याच्या अवस्थेत कोणी नव्हते. टोपल्या मध्ये मासे भरू लागले. पंधरा मिनिटांनी समुद्राचं पाणी हळूहळू पुन्हा किनाऱ्याच्या दिशेने सरकू लागले. बाराच्या सुमारास 'त्सुनामी' महाकाय लाटंचं आगमन झालं आणि एकच भयकल्लोळ सुरू झाला.

असं बरंचसं ऐकून आणि पाहून आम्ही परतलो. रिलीफ कॅम्पमध्यें प्रत्येकाला डयूटी मिळाली. संध्याकाळी साडेपाच वाजतां मी 'SVHSSM' हया मोठया दुमजली शाळेतील कॅम्पमध्ये पोचले. तेथे साडेतीन हजार लोक निर्वासित म्हणून राहात होते. प्रथम मी संपूर्ण कॅम्प हिंडून न्याहाळला. मल्याळी भाषेचा गंधही नव्हता. माझ्या सोबक दोन इंटरप्रिटर्स होते. अर्ध्या तासात सर्व परिस्थितीचा आढावा घेतला आणि मेडिकल युनिटमध्ये गेले. माझ्यासाठी (डॉक्टरसाठी) केलेल्या कॅबिनमध्ये जावून बसले. कंपाऊंडर, ड्रेसिंग करणारा एक सहाय्यक, तीन नर्सेस, दोन अंगणवाडीच्या सभासद, दोन दुभाषी, एक कॅथॅलिक सिस्टर असा माझ्या हाताखाली स्टाफ होता. हया दवाखान्याच्या बाहेर पोलीस बंदोबस्त होता. सर्वांनी माझे मनापासून व आस्थेने स्वागतं केले. तेथे त्या दिवसापर्यंत एकही डॉक्टर आलेला नव्हता त्यामुळे मी गेल्यामुळे त्यांना एक तऱ्हेचा आधार वाटला.

माझी डयूटी सुरू झाली. सर्व प्रकारचे रुग्ण असायचे. अत्यवस्थ असलेल्या रुग्णांना

ॲम्ब्युलन्स बोलावून घव्हर्नमेंट हॉस्पिटलमध्यें शिफ्ट केलें जायचं. संध्याकाळी साडेपाच ते सकाळी दहापर्यंत माझी डयूटी होती. एवढ्या वेळेत शेकडो पेशंटना तपासले व योग्य ती वैद्यकीय मदत दिली.

इतर सर्व दुखण्यांबरोबरच सर्वसाधारणपणे कॉमन तक्रारी म्हणजे डोक जडं होणं, छाती दुखणं, श्वास घेण्यास त्रास होणं ह्या होत्या. मानसिक असंतुलनाची ही लक्षणे होती. अजूनही त्यांना ओरडण्याचे आवाज ऐकू येतात, भुते दिसतात, लाटा दिसतात, भयानक स्वप्ने पडतात असं बरेच जण सांगायचे. चेहेऱ्यावर भय व भविष्याची चिंता स्पष्टपणे दिसायची. अंगावर असलेल्या कपडयांशिवाय त्यांच्याकडे काहीही नव्हतं. सर्व काही नव्याने उभारायच्या आशाही नव्हत्या.

मी माझी डॉक्टरची भूमिका चोखपणे बजावली. त्याकरता तर मी तेथे गेले होते. रुग्णांना औषधे देण्याबरोबरच त्यांचे मनोधैर्य वाढेल ही खबरदारीही घ्यावी लागली. सायकॉलॉजिस्टची भूमिकाही बऱ्यापैकी हाताळंली.

त्यांची भोजनाची व्यवस्था आनंदमयी माता आश्रम व आर.एस्.एस्. चोख बजावीत होते. सर्व भांडी अकळत्या पाण्यातून काढून जंतुनाशक केली जात होती. आणि त्याचमुळे साथीचे रोग झाले नाहीत. जुलाब व उलटया असलेले अत्यल्प रुग्ण होते. तेथील आवारही स्वच्छ ठेवण्यात आलं होत. ॲम्ब्युलन्स आश्चर्य म्हणजे शिवसेनेची यायची. फोन केल्यावर दहा मिनिटात हजर व्हायची. रुग्णांना कपडे चटया, चादरी अनेक संस्थांनी तेथे येवून दिल्या. औषधे रेडक्रॉस तर्फे भरपूर प्रमाणात उपलब्ध करण्यात आली.

आम्ही तेथे गेल्यावर व तेथून निघेपर्यंत कोणतेही दुसरे डॉक्टर (केरळ स्टेटमधीलही) नजरेस पडले नाहीत. आम्ही पंधरा दिवसांच्या सेवेकरितां म्हणून गेलो. परन्तु आठ दिवसातच तेथून निघावं लागलं. कारण दुसऱ्या दिवशीपासून मिलिटरी व नेव्ही सर्व कॅम्पस् आपल्या अधिपत्याखाली घेणार होती. सर्वांना तेथून हलविणार होते.

रिलीफ कॅम्पमधील आमच्या सात दिवसांच्या वास्तव्यात ते रुग्ण, तेथील माणसं, माझ्याबरोबर चोवीस तास काम करणारा स्टाफ यांचं एक मोठं कुटुंबच तयार झालं होतं. पण ....सर्वांपासून दूर जाणं भाग होतं. जड अंत:करणाने सर्वांचा निरोप घेतला. घरी येतांना आठवणींचा संग्रह सोबत आणला. कायमस्वरूपी जतन करण्याकरितां.

***

# वस्तू खरेदी करतांना

- वसुंधरा देवधर, विलेपार्ले, मुंबई (deodhar@vsnl.com)

***वसुंधरा देवधर ह्या गेल्या ६ वर्षापासून मुंबई ग्राहक पंचायतीच्या ग्राहक शिक्षण व ग्राहक संरक्षण विभागात काम करतात. म.प्र. च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य हेमंत महादेव यांच्या विनंतीवरून आपल्या सर्वांच्या या जिव्हाळयाच्या विषयावर हितगुजसाठी लेखन करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्यांचा हा दुसरा लेख. सर्व कुलबांधवातर्फे वसुंधरा देवधर यांचे आभार - संपादक***

आपण नेहमी विविध वस्तू आणि सेवा विकत घेत असतो. यापैकी वस्तूची खरेदी करताना ती प्रत्यक्ष पाहणे, कधी थोडे दिवस वापरणे, तिची गॅरंटी/वॉरंटी असणे, आपल्या ज्ञानानुसार व अनुभवावर आधारित परीक्षण करणे असे अनेक मार्ग उपलब्ध असतात. त्यामुळे वस्तू खरेदी ही सेवा खरेदी पेक्षा वेगळी ठरते. शिवाय नवीन आणलेला टी.व्ही अगर म्यूझिक सिस्टीम नीट काम देत नसेल तर ते ताबडतोब लक्षात येते. मात्र सेवेबाबत अगदी वेगळा अनुभव असतो. तरीही वस्तू खरेदी सुध्दा डोळसपणे व्हावी लागते.

वस्तू खरेदीचे प्रामुख्याने दोन भाग असतात. एक जीवनाश्यक वस्तूंची खरेदी. दुसरी थोड्याफार आरामासाठी होणारी किंवा ऐषो-आरामासाठी होणारी. आपल्या लक्षात येईल की प्राथमिक गरजांच्या वस्तूंची जाहिरात करावी लागत नाही. म्हणजे ग्राहकांनी डाळ, तांदूळ, पाव या सारख्या वस्तू 'या, पहा, घ्या' असे सांगून खरेदी केल्या असे होत नाही. त्यांची खरेदी होतच असते.

मग खाद्यान्नांच्या जाहिराती खूप प्रमाणावर दिसतात, त्या कोणत्या ? तर 'ब्रॅण्डेड' खाद्यान्नाच्या. आज शहरी व निमशहरी भागात तर देशी-विदेशी पॅकबन्द खाद्यान्नाची रेलचेल आहे. भारतातील एकूण अन्न बाजारपेठेपैकी ७ टक्के बाजारपेठ हया ब्रॅण्डेड/प्रक्रियाकृत व पॅकबन्द खाद्यपदार्थांनी काबीज केली आहे. २०२० पर्यन्त हा आकडा २० टक्क्यावर नेण्याची अन्नप्रक्रिया उद्योगाची जोरदार तयारी आहे.

ह्या अन्नाची खरेदी करताना त्यावरील 'लेबल' नीट वाचणे व समजून घेणे आवश्यक आहे. आक्रमकपणे विक्री करणे, भुलवणाऱ्या जाहिराती करणे, मुलांसाठी खास 'फुकट' भेटी वाटणे. या व अशा प्रकारच्या मोहित करणाऱ्या वातावरणात आपण 'पोटात नक्की काय घालतोय' याचे भान ग्राहकांनी ठेवले पाहिजे. त्यासाठी 'लेबल रीडिंग'ची माहिती असणे आणि त्या माहितीचा उपयोग करणे फार महत्वाचे ठरते. ग्राहक-शिक्षणाचे ते महत्वाचे अंग आहे. त्यासाठी वेगळी व्याख्याने ही आयोजित होतात.

दुसरी खरेदी ज्याला एफएम्सीजी म्हणतात त्या वस्तूंची म्हणजे Fast Moving Consumer Goods. साबण, शाम्पू, सौंदर्यप्रसाधने ही याची उत्तम उदाहरणे आहेत. नित्यनेमाने लागणाऱ्या या वस्तूंसाठी ग्राहक आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न सर्व कंपन्या करीत असतात. या क्षेत्रात विशेषत: बहुराष्ट्रीय कंपन्या कार्यरत असतात. त्यांच्या जाहिरातींच्या माऱ्याने ग्राहक हैराण होतात. शिवाय हया जाहिरातींचा खर्च वस्तूंच्या किमतीतून वसूल होतो. म्हणजे आपण ग्राहकच 'जाहिरात-कंपनी'पण चालवतो हेही ध्यानात घ्यायला हवे. मात्र खरेदी करताना आपली गरज आणि एकावर एक/दोनावर एक फुकट योजनांची सांगड घालावी.

बरेचदा असे आढळून येते की हया २

किंवा ३/४ वस्तू एकमेकांना घट्ट-चिकटवून ठेवतात. त्यामुळे त्यांची उत्पादन-तारीख नीट किंवा अजिबात दिसत नाही. मध्यन्तरी असे आढळून आले की नव्या टूथपेस्टबरोबर ३ वर्षे जुने टूथपेस्ट, पाच लिटर खाद्यतेलाबरोबर जुने दोन लिटर तेलाचे कॅन फुकट देत होते. असे आढळल्यास ग्राहकांनी त्याविरूध्द ताबडतोब आवाज उठवला पाहिजे. त्यासाठी त्या उत्पादकाशी ताबडतोब पत्रव्यवहार करावा. किंवा अन्न-औषध-प्रशासन किंवा वर्तमानपत्रात धाव घ्यावी. मात्र आपण खरेदी केलेल्या वस्तू व त्यांची बिले इ. सांभाळून ठेवली असली पाहिजेत.

यानंतर वस्तू येतात त्या 'कन्झ्यूमर ड्युरेबल्स' म्हणजे काही वर्षे आपण वापरू शकू अशा वस्तू. इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक अशी विविध गृहोपयोगी उपकरणे व मनोरंजनाची साधने याखाली येतात. इस्त्री, टोस्टर, मिक्सर पासून टी.व्ही, होम थियेटर पर्यन्त याचा आवाका असतो. सर्व साधारणपणे प्रसिध्द ब्रॅण्ड पाहून याची खरेदी होते. मात्र आता या प्रकारच्या वस्तू सुध्दा विविध कंपन्यांच्या व परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या, मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्राहकांचा गोंधळ व जबाबदारी दोन्ही वाढत आहे. थेट परदेशातूनच आणलेली 'इम्पोर्टेड' वस्तू जर आपण घेत असाल तर 'आयातदाराचे नाव व पत्ता' आणि मूळ उत्पादकाचे (परदेशस्थ) नाव पत्ता दोन्ही उपलब्ध असणे आवश्यक आहे. बरेचदा २/३ वर्षांनी आपला आयातदार दिलेल्या पत्त्यावर मिळत नाही असा अनुभव येतो. त्यावेळी मूळ उत्पादकाकडून तक्रार सोडवून घेता येते. शिवाय 'विक्री-पश्चात् सेवा' कशी आहे हेही पाहावे.

मुख्य म्हणजे आपण घेतलेले महाग उपकरण नीट चालत नसेल तर 'लेखी' तक्रार त्या उत्पादकाकडे करावी. १० फोन करून कधी कधी फक्त आश्वासनेच मिळतात. कंपनीचा माणूस येऊन जातो तेव्हा 'ग्राहकाची सही' घेतो. ती तो कशासाठी घेतो, त्या कागदावर काय लिहिले आहे ते समजून मगच सही करावी व त्याची प्रत स्वत:जवळ ही ठेवावी. वर्षभरात जर ४/५ वेळा दुरुस्ती लागली असेल व उपकरण समाधानकारक सेवा देत नसेल तर बदलून नवे मागावे अगर हवे असल्यास पैसे ही परत मागावे. यासाठी प्रयत्न करताना कंटाळत नाही तोच जागरूक ग्राहक.

***

# नारायणस्वरूप बालगंधर्व

- विनायक केशव (पृ.२०), वरळी, मुंबई

*जून हा बालगंधर्वांचा जन्ममास. त्यानिमित्त प्रतिष्ठानचे कार्यवाह व्ही. के. यांनी बालगंधर्वांच्या नाट्यकर्तृत्वाचा एका नाट्यवेड्या रसिकाने घेतलेला हा वेध. - संपादक*

बऱ्याच वर्षापूर्वीची गोष्ट! मी मित्रांबरोबर कोल्हापूर-सांगलीच्या परिसरात फेरफटका मारीत होतो. मध्येच एका लहानशा तिठ्यावर 'नागठाणे' अशी पाटी दिसली. अरे, हे तर बालगंधर्वांचे जन्मस्थान! सहज चौकशी केली. अंदाज खरा ठरला. जून महिन्याचे दिवस होते. योगायोगाने नारायणरावांचा तो जन्ममास. खिडकीतून डोकावलो, का कुणास ठाऊक! आम्ही खाली उतरणार म्हणून तिठ्यावर शकुंतला, सुभद्रा, रुक्मिणी, भामिनी, शारदा, सिंधू हातात आमंत्रणाची अक्षता घेऊन उभ्या आहेत असा उगीचच भास झाला. नकार देणे जिवावर आले. गाडी भर वेगात होती. शेवटी बसल्या जागेवरून हात जोडले आणि इतरांच्या नजरेला येणार नाही या बेताने हळूच डोळे पुसले.

आज इतक्या वर्षांनी नारायणरावांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने तो प्रसंग पुन्हा डोळ्यासमोर उभा राहिला. मनात विचार आला - मराठी भाषेतील सर्व गौरववाचक विशेषणे वापरूनसुद्धा दशांगुळे उरेल असा हा अवलिया! खरोखरच, नारायणराव बघता बघता भल्याभल्याचे मन चोरी, वयाच्या केवळ अकराव्या वर्षी नादमधुर स्वराने त्यांनी टिळकांना खिळवून ठेवले. लोकमान्य सहज उद्‌गारले, 'अरे, हा तर बालगंधर्व!' आणि नारायणरावांचे 'बालगंधर्व' झाले. विद्येने कलेचे कौतुक केले. केवळ एका शब्दसुमनाने. पण कलेने ते धारण केले जन्मजन्मांतरी. लोकमान्यांची वाणी नुसती शुभशकुनी नाही, तर भविष्यसूचक ठरली. वाचासिद्धी म्हणतात ती यालाच!

नारायणरावांनी महाराष्ट्राला भुरळ पाडली ती आपल्या निरागस बालस्वभावाने. अंतर्बाह्य कोमल, नितळ, निष्कलंक आणि दयार्द्र. नाही औपचारिकता, नाही पोकळ डामडौल, नाही ऐश्वर्याची धुंदी, नाही मत्सर, नाही लोभाला स्थान. योगी तर खराच; पण राजयोगी! नवरसांची शाल पांघरलेली योगमूर्तीच! भस्म नाही, कमंडलू नाही, वल्कलं नाहीत, जटा नाहीत आणि तामसी वैराग्यही नाही. या सदा गंभीर महाराष्ट्राला, नीरस महाराष्ट्राला, कर्मदरिद्री महाराष्ट्राला या जगावेगळ्या राजस राजयोग्याने 'बाल' स्वभावाची दीक्षा दिली. 'हृदयाची दारे सतत उघडी ठेवा म्हणजे मत्सराची कोळिष्टके राहणार नाहीत' हा जीवन मंत्र दिला.

नारायणराव 'बाल' स्वभाव धारण करून दीर्घ जीवन जगले. म्हणूनच कौटुंबिक, आर्थिक, शारीरिक आणि मानसिक आपत्तीत ते 'सदानंदी' राहिले. पुत्रशोक, कन्याशोक, वित्तशोक, जराशोक सगळे सगळे शोक पचवून ते निर्लेप मनाने व राजस शरीराने एखादे भुकेलेले मूल आईच्या पदरात शिरावे तसे नारायणस्वरूपात विलीन झाले.

बालगंधर्वांचा कालखंड विचारात घेता त्यावेळच्या वाङ्मयाला, पोशाखाला, चालीरीतींना, डामडौलाला भुललेल्या मध्यमवर्गातील सुशिक्षित तरुणांनी एक समस्याच निर्माण केली होती. नारायणरावांनी स्त्रीभूमिकांद्वारे त्यावेळच्या मराठी गृहिणींना आकर्षक नेसावं कसं, नटावं कसं, मृदु, लाघवी पण निग्रही बोलावं कसं हे शिकवलं नसतं, त्यांचं तथाकथित बाळबोध वळण बदललं नसतं; त्यांच्या पुढे आधुनिक, रसिक आकर्षक पण चतुर नायिका उभ्या केल्या नसत्या, तर इंग्रजी वारा प्यालेले हे तरुण नैराश्याच्या भरात घरापेक्षा माड्यांवर जास्त रंगले असते. घरोघरचे संसार मोडले असते. कारण आधुनिकतेचा ध्यास

घेतलेला व तारुण्याला सतत जपणारा नवरा आणि लोकापवादाला भिऊन बाळबोध वळणाला कवटाळून अकाली प्रौढ झालेली बायको यांचा विचित्र संसार किती सुखात चालला असता?

केवळ पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र यामुळेच माणूस, पर्यायाने समाज, जगत नसतो. या समाजाला जिवंत ठेवणाऱ्या किमान गरजा आहेत. सुखी समाजाचे फार तर ते बाह्यांग होऊ शकेल. खरा सुखी समाज हा सर्वार्थाने तृप्त समाज असतो. वात्सल्यसुख, कुटुंबसुख, वित्तसुख, ज्ञानसुख, सत्संगसुख, शृंगारसुख यांनी तो सदैव डवरलेला असतो. 'होती आशा-आकांक्षा पुऱ्या, होतील संग्रामगीते पुरी' अशा अवस्थेत तो असतो. हा काही केवळ कवीचा कल्पनाविलास नाही. असा तृप्त समाज काही शतकापूर्वी या भारतवर्षात सुवर्णभूमीत नांदत होता.

या आनंदी, रसिक, तृप्त समाजाला इस्लामी आक्रमणाचे ग्रहण लागले. मूर्तीपूजेच्या विरोधापायी हजारो सुंदर शिल्पे भंगली, नष्ट झाली. अप्रतिम वास्तू जमीनदोस्त झाल्या. सर्वत्र हाहा:कार उडाला. संकटाची चाहूल लागताच कासव आपले चारही पाय पोटाखाली दुमडून घेते तसा समाज आपले सत्वच हरवून बसला. रणांगणावर हरलेल्या लढाया पुन्हा जिंकता येतात, रुसून गेलेल्या लक्ष्मीला पराक्रमाने पुन्हा आणता येते, पण सत्व गमावलेल्या समाजाला त्याची अस्मिता परत मिळवून देण्यासाठी पिढ्यान् पिढ्या खर्ची घालाव्या लागतात. मराठी जीवनातील रसिकतेचा झरा कायमचा आटतो की काय असा संदेह निर्माण झाला. पण लोकशाहीर आणि एकनाथांसारखे लोकसंत यांनी आपल्या वाणीने आणि लेखणीने मोठ्या शर्थीने तो जिवंत ठेवला. उत्तरपेशवाईत थोडी उसंत मिळतांच तो उसळी मारू लागला. पारतंत्र्यात पुन्हा पूर्वीची परिस्थिती निर्माण झाली. पण या काळात नारायणरावांनी रंगमंचावरील कर्तृत्वाच्या अमृतजलाने सारा महाराष्ट्र शिंपून काढला. सुवर्णयुगाची सुवर्णपुष्पे फुलविली, वेचली आणि महाराष्ट्रमातेच्या चरणी अर्पण केली.

मराठी जीवनात सौंदर्यासक्ती व जीवनासक्ती निर्माण करून नारायणराव थांबले असते तर ते बालगंधर्व झाले नसते. फार तर 'नटसम्राट' झाले असते. नारायणरावांनी मराठी ललनांना, गृहिणींना या गोष्टींबरोबरच संसारनिष्ठा, ध्येयनिष्ठा, सत्यनिष्ठा, प्रीतिनिष्ठा यांचे सर्वांगसुंदर पाठ दिले. हे पाठ देताना त्यांनी रंगमंदिरातील महिलांबरोबर पुरुषांनाही रडविले. अगदी भडभडून रडविले.

सुधाकरांच्या लाथा खात त्याच्या पायाजवळ बसण्याचा हट्ट धरणारी निग्रही सिंधू, दोन घास अन्नासाठी गीतेला मोलकरणीची नोकरी शोधायला सांगणारी असहाय सिंधू, बाळासाक्ष सुधाकराला दारू सोडण्याची शपथ घ्यायला लावणारी भाबडी सिंधू, कृष्णासाठी तिळ तिळ तुटणारी प्रेमविव्हल रुक्मिणी, मुलखावेगळ्या प्रियकरासोबत भावी जीवनाचं स्वप्न रंगविणारी स्वप्नवेडी रुक्मिणी, प्रथम धैर्यधराची निर्धन म्हणून हेटाळणी करणारी पण नंतर कर्तृत्वाची खात्री पटल्यावर त्याच्यावर जीव ओवाळून टाकणारी खट्याळ पण मनस्वी भामिनी, मूर्तिमंत भीती समोर उभी राहिल्यावर 'तू टाक् चिरुन ही मान' असं आईला सांगणारी कारुण्यमूर्ती शारदा या साऱ्या साऱ्या नायिका बालगंधर्वांनी रंगमंचावर जिवंत केल्या व त्यांच्या ओट्या अश्रूंनी भरभरून महाराष्ट्राच्या घरोघरी पोचविल्या.

अभिजात सहजसुंदर अभिनय आणि दैवी स्वरमाधुर्य यांच्या जोरावर नारायणरावांनी कोमल, निष्कलंक, पण तितकीच निग्रही मराठी गृहिणी घडविली. जे कार्य देशभरचे सुधारक व गाडाभर ग्रंथ करू शकले नाहीत ते कार्य बालगंधर्व नामक पुरुष स्त्रीवेषांत रंगभूमीवर वावरून करू शकतो ही गोष्टच जगाच्या इतिहासात, खास करून रंगभूमीच्या इतिहासात अद्वितीय आहे!

यावर कोणी आक्षेप घेईल की एवढे वजन नारायणरावांच्या पारड्यांत टाकणे म्हणजे या सर्व गोष्टी गृहीत धरूनच नारायणराव रंगमंचावर वावरत असत, असे म्हणण्यासारखे आहे. कदाचिक नारायणरावांच्या मनात हे विचार नसतीलही; पण त्याने परिस्थिती बदलत नाही. मोर काही आपल्याला रिझविण्यासाठी नाचत नाही. कोकिळा काही आपले कान तृप्त करण्यासाठी गात नाही, फुलपाखरं काही आपल्याला नेत्रसुख देण्यासाठी नाना तऱ्हेचे रंग धारण करीत नाहीत, इतिहासात पुरावा ठेवण्यासाठी प्रलय होत नाहीत, पण होणार परिणाम होतच राहतात.

आपला भारत जगदीश्वराचा लाडका प्रदेश असावा. कारण ज्या ज्या वेळी मानवधर्माला भारतात ग्लानी आली त्या त्या वेळी मानवधर्माची संस्थापना करण्याकरता त्याने अवतारी पुरुष भारतात जन्माला घातले. हे पुरुषगंधर्व काही वेळा पुष्पाहून मृदु होते तर काही वेळा वज्रापेक्षा कठोर होते. काही वेळा त्यांच्या सुकुमार दर्शनाने आसमंत मोहित होई, तर काही वेळा त्यांच्या धीरगंभीर दर्शनाने शत्रूंची बोबडी वळे. काही वेळा त्यांच्या हाती शस्त्रे होती, तर काही वेळा त्यांच्या हाती शास्त्रं होती. काहींच्या हाती सरस्वतीची वीणा होती, तर काहींना नटराजाचा वरदहस्त लाभला होता. मातेच्या मुक्तीसाठी काहीजण वधस्तंभावर हसतमुखाने चढले, तर काहींना कराल कारागृहात भिंतीवर नितांत रम्य महाकाव्ये कोरली. काहींनी विजनवासात मानवी जीवनाच्या तत्त्वज्ञानाची उकल केली. तर काहींनी नटेश्वराच्या रंगमंदिरात इतिहास घडविला. नारायणराव हे याच कुलातले 'बालगंधर्व' होते.

असे बालगंधर्व त्यांच्या वास्तव्यकालात मूर्खजनांना दिसत नाहीत. दिसले तरी उमजत नाहीत. उमजले तरी तसे म्हणण्याचे धाडस ते करीत नाहीत. आपल्या महद्भाग्याने या बालगंधर्वाला त्याच्या लहानपणातच ओळखणारा दुसरा पुरुषगंधर्व महाराष्ट्रात गाजत होता. यालाच मणीकांचन योग म्हणतात.

पण हे सारे गुणगान करताना या बालगंधर्वाला आयुष्याच्या संध्यासमयी विकलांग अवस्थेत 'मी कुठेही रस्त्यावर बसून दोन अभंग-गाणी आळविली की महाराष्ट्र मला जगवील' हे उद्गार काढण्याची पाळी यावी हे जाणून काळजाचं पाणी पाणी होतं.

कलावंताच्या मृतदेहावर मौल्यवान वस्त्रं बिनदिक्कत पांघरणाऱ्या नारायणरावांची अंतयात्रा पंधरा-वीस माणसांनी घाईघाईने काढावी हा कुठल्या घरचा न्याय?

मराठी माणसाला सर्वस्वाचं दान करून हा महाराष्ट्राचा लाडका राजस बालगंधर्व नेसत्या वस्त्रनिशी आम्हाला पोटभर रडूसुद्धा न देता देवाघरी गेला याची खंत कायमची मनात सलत आहे.

***

# कारागृह ? छे, छे, हे तर सुधारगृह

**- अच्युत महादेव चक्रदेव** (पृ.७३२), कारागृह अधीक्षक (निवृत्त), पुणे

मागील वर्षी हितगुजच्या अंकात मी मला नोकरीचे काळांत आलेले काही अनुभव दिलेले होते. कारागृहाचे सर्वसाधारण प्रशासन कसे चालते हे अगदी थोडक्यात या अंकात मी देत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये कारागृह प्रशासनाचे ध्येयवाक्य आहे. 'सुधारणा व पुनर्वसन'. न्यायालयाने दिलेली शिक्षा कैदी भोगत असतांना त्याच वेळेस त्याचेमध्ये सुधारणा व्हावी व कांहींना काही काम त्यांना शिकवून त्याचे पुनर्वसनास त्याला तयार करावयाचे जेणेकरून तो सुजाण नागरिक बनून समाजांत स्थिर व्हावा. त्या दृष्टीने विणकाम, सुतारकाम, चर्मकाम, शिवणकाम, हातकागद कारखाना, लोहारकाम, बेकरी इ. अनेक कामे कारागृहांत चालतात. कैदी शिक्षा लागून कारागृहांत आला म्हणजे पहिले कांही दिवस त्याला तेथील नियम वगैरे समजावून दिले जातात.

नंतर त्यांचे शास्त्रीय रीतीने वर्गीकरण केले जाते. हे वर्गीकरण करतांना कैद्याबद्दल पुढील बाबी प्रकर्षाने लक्षांत घेतल्या जातात - त्याचे वय, शिक्षण, कौटुंबिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, शेजार, त्याच्या चांगल्या, वाईट संवयी, संगत, पुनर्वसनाचे दृष्टीने उपयुक्त बाबी, पुनर्वसनास बाधक ठरतील अशा बाबी, त्याच्या अंगातील गुण, अवगुण, अंगात असणाऱ्या कला, इ. अधीक्षक, तुरुंगाधिकारी, निरनिराळ्या उद्योगातील प्रभारी प्रशिक्षक, शिक्षक इत्यादींच्या समिती पुढे त्याचे प्रकरण ठेवले जाते. गुन्हा घडला त्यावेळेची परिस्थिती. एखाद्या कामाकडे मुळांत असणारा त्याचा कल, पारंगतता इ. लक्षात घेऊन त्याला समिती काम देते.

सहा महिन्यांनी त्याचे प्रकरण पुनर्विलोकनासाठी ठेवतात व त्याचे कामांतील कौशल्य, आवड लक्षांत घेऊन काम बदलतात किंवा तेथेच पुढे तेच काम चालूं ठेवतात. इतर कैदी सहकारी व विशेषत: प्रशिक्षक त्याला काम शिकवितात व त्याचेकडून काम करवून घेतात. पुढे कांही दिवसांनी कामातील प्रगती पाहून त्याला कामाचे वेतन दिले जाते. तेवढी रक्कम त्याचे नांवावर जमा केली जाते व त्याचे सोयीप्रमाणे तो कुपने घेऊन खर्च करतो. रोख व्यवहार चालत नाहीं. त्याचे लायकीप्रमाणे पुढे त्याला कैद्यांच्यामधील अधिकारी नेमले जाऊन प्रशासन व्यवस्थेमध्येही त्याचा उपयोग करून घेतला जातो.

कामांत दिरंगाई, आळशीपणा, टाळाटाळ, अनुपस्थित रहाणे इ. केल्यास त्याला कारागृहीन शिक्षा मिळते. सवलतीत कपात होते, माफी कमी केली जाते, अलग ठेवले जाते, बढतीपासून वंचित केले जाते. चांगल्या वागणुकीसाठी स्वंतत्र माफी मिळते. विशेष गुण, कला म्हणजेच विविध गुणदर्शनासाठी सुद्धा स्वतंत्र माफी मिळते. ज्या कारागृहात अधिक माफी असते अशा कारागृहांत चांगल्या वागणुकीमुळे जायला मिळते व तेथून असे गुणी कैदी लवकर सुटतात. 'दो आँखे बारह हाथ' या चित्रपटात मुख्यत्वेकरून हीच मध्यवर्ती कल्पना मांडली आहे.

> हसरे हितगुज
>
> **अजब वीज बचत**
>
> - अरे बाळ, उठतोस ना? ११ वाजायला आले. आंघोळ करून लवकर कपडे धुवायला टाक.
> - अगं आई, सध्या वीज बचत करायची आहे ना? मी अजून तासाभराने आंघोळीला जातो. म्हणजे नळाला चांगले गरम पाणी येते. 'गीझर' लावायला नको. तेवढीच वीज बचत!! गीझरचे कंझम्शन खूपच असते म्हणे!!

खरं म्हणजे महाराष्ट्र प्रांत हा अशा सुधारणा व पुनर्वसन ध्येयाचा भारतांत प्रथम क्रमांकाचा पुरस्कर्ता आहे. आपल्याकडे ही वर्गीकरणाची पध्दत १९६४ चे सुमारास राबवली गेली. त्यावेळेचे कारागृह महानिरीक्षक कै. दौलतराव जाधव हे या पध्दतीचे खरे शिल्पकार आहेत. या विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन सर्व तुरुंगाधिकाऱ्यांनी, रक्षकांनी काम करावे या दृष्टीने येरवडा येथे त्यांनी एक प्रशिक्षण महाविद्यालय सुरू केले. दिल्ली मधील तिहार कारागृहातील सुधारणांबाबत व सौ. किरण बेदी यांचेबाबत बरेच बोलले जाते. त्यांचे काम चांगलेच आहे. पण महाराष्ट्र हा याबाबतीत अग्रेसर आहे.

मी स्वत: कला विभागाचा प्रमुख असतांना जवळ, जवळ १५ नाटके कैद्यांकडून बसवून घेतली आहेत. रोज रात्री कारगृहांत जावून त्यांच्या नाटकांचा, अन्य कार्यक्रमांचा सराव घेतला आहे. एकदा तर आतां दुसऱ्या दिवशी नाटक तर अचानक आधीचे दिवशी एक विनोदी काम करणारा परंतु प्रमुख भूमिका असलेला कैदी आजारी पडला. त्यामुळे मोठा प्रश्न निर्माण झाला. आता काय करायचे ? पडद्याआडून मी नाट्यवाचन, दिग्दर्शन करीत असल्याने, मी ठरवले आज आपण कैद्यांबरोबर काम करून वेळ मारून नेऊ. दोन, दोन महिने सराव होऊन ऐन वेळी नाटक होणार नाही म्हणजे माफीही मिळणार नाही, सगळा सराव फुकट जाणार या विचाराने नाटकामधील अन्य पात्रांची तोंडे रडवेली झाली होती, ती मला बघवेनात म्हणून मी स्वत: काम करण्याचा निर्णय घेतला. कारण नाटकाला जिल्हाधिकारी, सरन्यायाधीश इ. मंडळी येणार होती. माझा सराव झाला. अचानक दुसरे दिवशी सकाळी एक कैदी मला म्हणाला, साहेब मी पूर्वी ही भूमिका केलेली आहे. मी ती आत्तासुध्दां करतो. मी त्याचेकडून तालीम करून घेतली व प्राम्टींगवर नाटक निभावून नेले. तेवढीच सगळया कलाकारांबरोबर या नवीन कैद्यालाही माफी मिळाली.

आतां तर गेली दोन तीन वर्षे 'बंदी रजनी' म्हणून महाराष्ट्र शासन अशा प्रकारचा कार्यक्रम सादर करते व त्यासाठी महाराष्ट्रामधील कारागृहामधून निवडक गुणी कलावंत कैदी एकत्रआणून कार्यक्रम सादर केला जातो.

चित्रपट व्यवसायामधील एक तज्ञ कै. अच्युतराव रानडे यांनी कैदी पुनर्वसनासाठी वाहून घेतलेली 'नवजीवन मंडळ' नावाची संस्था पुण्यांत चालू केली आहे. तिला पुढील वर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. याही संस्थेत मी संपर्काधिकारी म्हणून काम करतो आहे व निवृत्तीनंतरही गरजू कैद्यांना संगणक प्रशिक्षण, साक्षरता, अन्य कार्यक्रमाचे आयोजन इ. मध्ये मदत करीत आहे, मार्गदर्शन करतो आहे, वाट चुकलेल्यांनी पुन्हां माणसांत आणण्याचा प्रयत्न करतो आहे. ★★★

# निरामय जीवनाची गुरुकिल्ली

**- मीननाथ लक्ष्मण** (पृ.२८०), पुणे

मानव त्याच्या गुणवैशिष्ट्यानुसार अनेकानेक क्षेत्रात प्रगती करत आहे. त्याचे फायदेही होत आहेत. परंतु मिळणाऱ्या लाभाचे दीर्घकालीन परिणाम निश्चितत: हितकारक आहेत का ? कारण मोजक्या गोष्टी सोडल्या तर बाकी सर्व शोध त्याला क्षणिक सुख वा समाधान देणाऱ्या सुविधा देतात. त्याचा उपभोगसुद्धा जरूर घ्यावा पण त्याबाबत आसक्त होऊ नये. नेमके हेच घडत नाही. हे सर्व दु:खाचे मूळ आहे. मनुष्य त्या सुविधा आवडल्या असे म्हणत त्यांच्या अधिन होतो. अर्थात त्यांच्या नियमित प्राप्तीसाठी तो अधिकाधिक प्रयत्न करतो. जेव्हा सन्मार्गाने त्या लाभात नाहीत तेव्हा वाममार्गाचा अवलंब केला जातो. पर्यायाने ज्याच्यासाठी सुविधा उत्पन्न केल्या गेल्या तोच त्यांचा दास बनतो. त्यांची प्राप्ती हेच त्याचे 'जीवनध्येय' बनते.

सध्या विविध क्षेत्रातील शास्त्रज्ञ नित्य नवे शोध लावत आहेत. हे 'विज्ञानयुग' आहे. त्यामधील प्रामुख्याने वैद्यकीय शास्त्रातील अत्याधुनिक साधने, अणुशक्तीचा केवळ विधायक कामांसाठीचा उपयोग, नैसर्गिक आपत्तीबाबत पूर्वसूचना देणारी यंत्रणा अशा काही क्षेत्रातील प्रगतीचा निश्चितपणे समस्त मानवजातीला उपयोग आहे.

मात्र उपरोक्त वा तत्सम बाबीशिवाय करमणूक क्षेत्रातील दूरदर्शनच्या प्रवेशामुळे, इलेक्ट्रॉनिक्स साधनामुळे अत्यंत अनावश्यक असलेल्या सुखसाधनांची माहिती व जाहिरातबाजीमुळे आकर्षण निर्माण होते. अर्थात स्वभावधर्मामुळे त्यांची प्राप्ती आवश्यक व नंतर नियमित उपलब्धता अत्यावश्यक ठरते. या अवस्थेत भोवतालची सद्य परिस्थिती, वातावरणातील अनिश्चितता भर घालते आणि उपभोग व साधने माणसासाठी आहेत या वास्तवाचे भान हरपून उपभोग साधनांसाठी मनुष्याचे जीवन आहे असे वाटायला लावणारी ही अवस्था येते.

सध्याच्या जीवनाला प्रचंड वेग आहे. तो मर्यादित असणेच योग्य वाटते. कारण अतिगतिमानशीलता अनावश्यक मानसिक व शारीरिक तणाव निर्मिती करते. त्याचे पर्यवसान अनेक व्याधी, उपाधींमध्येच होते. त्याचबरोबर या जीवनपद्धतीत माणूस वाचन, श्रवण, सुसंवाद व यथाशक्ती एकांतवास (मौन) या चार बहूमूल्य सर्वार्थाने हितकारक अशा गोष्टींना आचवला आहे. त्याच्याही अतित असणाऱ्या योग, ध्यान, भक्ती (निष्काम) व कर्मयोग याचे मनन, चिंतन व आचरण फारच दूर राहिले आहे.

अतिगतिमानतेमुळे तो काय गमावतो आणि त्याची पुनर्प्राप्ती होण्यासाठी काय व कसे प्रयत्न करावे याचा अंदाज व माहिती घेणे क्रमप्राप्त ठरते. प्रामुख्याने वैराग्य, विवेक व अनासक्ती यांच्या किमान आचरणाने हे निश्चित घडू शकते. त्या प्रयत्नांचे स्वरूप स्पष्ट असले तरी त्याचे गणित मांडता येणार नाही. तसेच त्याचा शास्त्रविहीत क्रम ठरलेला आहे.

सर्वसामान्यपणे मनुष्य मात्रांच्या जीवनात पूर्व पिढीकडून मिळालेल्या संस्कारांमधून देव, देवतांबाबत श्रद्धा निर्माण होतात. त्यांची पूजा-अर्चा करण्याचे पाठ दिले जातात. मात्र हे सर्व केवळ मला देवाने धन द्यावे, आरोग्य द्यावे, कसलाच त्रास नसावा यासारख्या अपेक्षापूर्तीसाठीच केले जाते. किंबहुना ऐन कठीण प्रसंगीच तू मला सहाय्य कर असेच मागणे असते. एरवी मात्र त्या देवाची आठवण होणे कठीणच असते. म्हणजेच ही केवळ स्वार्थ भक्ती झाली, सकाम भक्ती झाली. अर्थात कोणत्याच भक्तीबाबत अनभिज्ञ व उदासीन असण्यापेक्षा ही भक्ती तरी असणे बरे.

तेव्हा भक्ती व श्रद्धा अत्यावश्यक ठरतात. परंतु त्याचे स्वरूप निर्दोष व उत्तम भक्ती ठरावी असे असावे. हे फक्त निष्काम भक्ती करण्यानेच घडते. ज्या प्रकारच्या भक्तीत देवाकडे लौकिक, व्यावहारिक जगातले काहीच मागितले जात नाही तर केवळ पारलौकिक वा शास्त्रविहीत सद्‌गुणांचा लाभ घडो एवढेच मागितले जाऊ शकते. बाकी भक्त जे घडेल ते देवाचे देणे असे समजतो. ''घडे भोगणे सर्वचि कर्मयोगे, मतिमंद ते खेद मानी नियोगे।।'' अशा अवस्थेस पोचतो. असो!

आता हे सर्व केल्याने काय मिळते ? कसे करायचे ? हे प्रश्न उठणे साहजिकच आहे. तर सर्वांनाच आदर्श भोवताल मिळवता वा राखता येणे शक्य नाही व आवश्यक नाही. पण सर्वांनी बाहेरची गर्दी, कोलाहल, व्यवसाय-नोकरीतले तणाव आणि प्रदीर्घ वेळ नियमित दूरदर्शन बघणे कमी केले, कोण काय म्हणेल म्हणून अनावश्यक महागडी साधन खरेदी टाळणे इ. व अनेक गोष्टी एका किमान मर्यादेत ठेवणे व दिवसाकाठी केवळ व्यक्तीगत असा अर्धा तास वेळ काढून वाचन, मनन, चिंतन करावे. ज्यायोगे दिवसारंभी छोटी प्रार्थना केल्यास व दिवसाअंती सर्व व्याप ताप बाजूला ठेवून फक्त स्वस्थ बसावे, मनात उपजणारे विचार व कल्पना यांचे अवलोकन करावे. कालांतराने मनात उठणारे विचार तरंग उठण्याचे प्रमाण कमी होत जाईल. एवढ्याने सुद्धा एकप्रकारची निरामयता अनुभवता येईल.

* * *


*With Best Compliments From*

**ACCURATE ENGINEERS**

**(An ISO 9000 Company)**

*Manufacturers of graded cast iron castings & precision machined components*

**B 10/2 B.M.C. Ind Estate, Near State Bank of Mysore, Udyambag, Belgaum 590 008 Karnataka**

***Phone 0831-2441297 Fax - 0831-2442807 e-mail : accurate@sancharnet.in***

# ।। पसायदान अष्टादशक ।।

**- प्रभाकर सीताराम** (पृ.३२७), सांताक्रुझ, मुंबई.

*सप्टेंबर २००३ च्या अंकांत प्रभाकर सीताराम यांनी भगवान श्रीकृष्णाला उद्देशून रचलेले कृतज्ञता अष्टादशक सादर केले होते. आता वाचा त्यांचे पसायदान - संपादक*

वाग्यज्ञे याच तोषावे द्यावे पसायदान हे ।
विनंती करतो तुम्हा भक्तीने अति बुद्धि ने ।।१।।

देवो सन्मति सर्वांना दुष्ट होवोत सज्जन ।
निर्वैर सर्व होवोत शान्ति लाभोत सर्व ते ।।२।।

परी राक्षसी वृत्तीचे धरती जे न सन्मति ।
विनाश कर तू त्यांचा शेषानां दे व सन्मति ।।३।।

आतंक माजले क्रूर वर्तमानी जगांत या ।
वाढली राक्षसी वृत्ति भोगवाद उफाळला ।।४।।

लोपली सत्त्वप्रवृत्ती शासकांतहि या क्षणी ।
राक्षसी भोगवृत्तीहि झाली आदर्श या जगी ।।५।।

भोगवादी ते शासक मिळती आततायींना ।
सीमा न राहे दुःखाना लोकांच्या पीडनास त्या ।।६।।

सज्जना न मिळे शान्ति राहती भयभीत ते ।
दीनाना न मिळे न्याय धनसत्तानुसारी तो ।।७।।

आतंकवादी यावनी अत्याचारा करीत ते ।
धर्माचे नांव घेऊन याहूनी दुःख काय ते ।।८।।

अवतार घे म्हणून किंवा पाठव प्रेषित ।
शासना आततायींना सज्जनांच्याच रक्षणा ।।९।।

तुझी जर कृपादृष्टि या महीवर होईल ।
दुष्टांचा नाश होईल सुष्ट होतील शासक ।।१०।।

येवो शासन धर्माचे नान्दो शान्ति निरंतर ।
राहोत निर्भय लोक येवो स्वर्गच भूवर ।।११।।

अखेरी मागणे आता करितो मी निजास्तव ।
करुणासागरापाशी अध्यात्मकारणास्तव ।।१२।।

पितृछत्र जरी झाले अल्पायु पूर्व जीवनीं ।
लाभलास पिता तूच पितामृत्यु अनंतरी ।।१३।।

दिलेस तू मला सर्व पुत्रदारागृहादिक ।
विद्या धन प्रतिष्ठाहि आयु आरोग्यहि तसे ।।१४।।

मग्न अध्यात्मविद्येंत समाधानी मी सर्वशः ।
मागणे भौतिकक्षेत्रीं न काही उरले मला ।।१५।।

तरी हे मागतो अंती पामर हा निजास्तव ।
नामरूप तुझे रोहो चित्ती माझ्या निरंतर ।।१६।।

अशीच होवो वाग्सेवा त्वत्कार्यीच निरंतर ।
असेच होवो व्यतित त्वत्कार्यी शेष जीवन ।।१७।।

होऊ दे अंतकाळीहि तुझे स्मरण मंगल ।
मिळो बोट तुझे तेच त्या क्षणीं धरण्या मज ।।१८।।

---

## मातृहृदय

**- गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई (कल्पना - परकीय)

एका उदास संध्याकाळी
घरात ऐकली अशुभवाणी
मनात चुकचुके पाल तिच्या
काय ठेवले दैवात माझ्या ।।१।।

पती झुंझार शूर रणांगणी
उडवी गनिमा क्षणोक्षणी
शत्रूच्या गोटात बसे धसका
जगी घुमते त्याची वीरगाथा ।।२।।

पण दैवाने केली मात
वीर कोसळता खाली क्षणात
अचूक गोळीने घेतला घास
जवान पहुडला रणांगणात ।।३।।

आणले कलेवर त्याचे सदनी
सत्काराने बिगुल वाजवुनि
हारांचीही पडली रास
केला जनतेने जयजयकार ।।४।।

भार्या त्याची अगदी स्तब्ध
न बोले न चाले एकही शब्द
चेहरा नुसता करुण उदास
ना अश्रू ना हुंदक नुसती भकास ।।५।।

बोलू लागल्या सर्वजणी
जर न रडली या क्षणी
तर होऊन जाईल वेडी पुरती
काय ही देवाची क्रूर गती ।।६।।

होत्या एक हुशार आजी
विपुल अनुभव त्यांच्यापाशी
हळूच त्यांनी उचलले बाळाला
ठेवले त्या तान्हुल्याला मातेच्या अंका ।।७।।

होती जरी ती शूर अंगना
मातृहृदय ते स्तब्ध राहिना
आले दाटुनि हुंदक्यावर हुंदके
ओघळती अश्रू गाली सारखे ।।८।।

## "आता म्हातारपणात...."

**- सुशीलाबाई मराठे** (वय वर्षे ९२), पुणे

*पुणे येथे झालेल्या ७व्या अ. भा. मराठे परिवार संमेलनात नव्वदीच्या 'चिरतरुण' आजींनी सादर केलेली कविता. - संपादक*

आता म्हातारपणात, दंताजीचे ठाणे उठले
कच्ची कैरी पाहुनिया, नाही तोंडा पाणी सुटले ।।१।।

आता म्हातारपणात, मोती बिंदू डोळियात
नाटक सिनेमा टीव्ही, आता नाही पाहता येत ।।२।।

आता म्हातारपणात, कानांनी संप केला
आता जाता येत नाही, संगीताच्या मैफलीला ।।३।।

आता म्हातारपणात, पायामध्ये शक्ती नाही
भिरी भिरी हिंडायाचे, आता काही कारण नाही ।।४।।

आता म्हातारपणात, नाही करायच्या चौकशा
नातवंडे म्हणतात, आजी आता गप्प बसा ।।५।।

आता म्हातारपणात, जेवणावर बंधन
लाडू जिलबी खाल्ली तर, आता होते अपचन ।।६।।

गुलाबजाम, साखरभात कधी खावासा वाटतो
साखर वाढते रक्तात, मधुमेह त्रास देतो ।।७।।

आता म्हातारपणात, हरी हरी करायचे
चंचल मनाला आता, बांधूनच ठेवायचे ।।८।।

आता तरी बोध घ्यावा, अशाश्वत हे जीवन
कशासाठी करायचे, आता तुझे-माझे पण ।।९।।

आता जीवनाची आली आहे समीप अखेरी
बऱ्या वाईट कृत्यांची, काढायची सरासरी ।।१०।।

आता म्हातारपणात, मनी आहे एकच आस
शांतपणे सोडायचा, आता शेवटचा श्वास ।।११।।


**आजोबा हरि प्रभाकर मराठे**

*(१८८९ ते १९६३)*

*यांच्या स्मरणार्थ*



**प्रभाकर दामोदर मराठे,**
वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

हार्दिक शुभेच्छा !

# शैलेश सिल्व्हर पॅलेस

**फोन : २२४१७८८०**
**मोबाईल : ९८९२७८००१६**

## झवेरी बाजार, मुंबई

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता** कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. त्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतात.

मागील तिमाहीत १२ मार्च, १६ एप्रिल आणि १४ मे रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. १२ मार्चच्या सभेत हितगुज संपादक लक्ष्मण शंकर यांनी फेब्रुवारी २० रोजी गोव्यात संमेलन आयोजन समितीच्या सभेतील चर्चेचा वृत्तांत निवेदन केला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्मरणिकेसाठी सुमारे २५ हजार रुपयांच्या जाहिराती मुंबईहून मिळवून द्याव्या अशी अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच श्रीमती शालिनीबाई धुंडिराज यांनी प्रायोजित केलेल्या वैदिक शिक्षण शिष्यवृत्तीची रक्कम प्रत्येक वर्षासाठी रु. १००० प्रमाणे दोन वर्षासाठी रु. २००० बिंबल, गोवा येथील कुलबांधव देऊ उर्फ अभय दिपक यांना देण्यात यावी असे ठरविण्यात आली.

एप्रिल १६ च्या सभेत गोवा संमेलनात म. प्र. कार्यकारी मंडळाच्या सर्व सदस्यांचा सत्कार करण्याच्या आयोजकांच्या प्रस्तावाबाबत वेळ वाचवण्याच्या दृष्टीने सर्वांचे सत्कार न करता प्रतीकात्मक म्हणून फक्त अध्यक्षांचा सत्कार करावा, इतरांची नावे वाचून दाखववावी असे आयोजकांना कळवावे असे ठरले.

तसेच संमेलन आयोजन करणाऱ्या गोव्यातील सुमारे ३५-४० कार्यकर्त्यांचा प्रतिष्ठानतर्फे सन्मान करण्याच्या दृष्टीने त्यांना कृतज्ञतापत्र आणि संमेलन स्मृतिचिन्ह म्हणून १० ग्रॅमचे रौप्य पदक देण्याचे ठरविण्यात आले.

प्रतिष्ठान मार्फत उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने लघुउद्योजक, महिला उद्योजक इत्यादींना विविध प्रदर्शनात वा महोत्सवात भाग घेण्याला प्रवृत्त करण्यासाठी प्रयत्न करावे, त्यांना अशा प्रदर्शनांची माहिती पुरवावी, प्रदर्शनात म. प्र. च्या सौजन्याने असा फलक लावण्यास परवानगी द्यावी, विशेषत: आंबा विक्री व्यवहार म. प्र. च्या पुरस्काराने करण्याबाबत पुढील २००६ मे-जूनच्या हंगामासाठी आधीपासूनच तयारी करावी इ. विचार झाले. म. प्र. च्या सौजन्याने विक्री करणाऱ्यांकडून विक्रीच्या ५ टक्के अगर १० टक्के रक्कम म. प्र. ला देणगी म्हणून घ्यावी असाहि विचार व्यक्त करण्यात आला.

## कुलबांधवांना आवाहन
## कोणी घर देता का घर ?

श्री. वि. वा. शिरवाडकर यांच्या नाटकातल्या नटसम्राटावर म्हातारपणी 'कोणी घर देता का घर?' असं म्हणण्याची पाळी आली होती.

अशी वेळ म. प्र. वर येऊ नये म्हणून गोवा संमेलनात असा विचार अनेक प्रतिनिधींकडून व्यक्त करण्यात आला की -

पंचविशीत आलेल्या म. प्र. ने कुलबांधवांच्या सोयीसाठी किमान मुंबई, पुणे, गोवा, गुहागर अशा काही ठिकाणी तरी अभ्यागतगृह/पर्यटक निवासाच्या सोयी उपलब्ध कराव्या. तिथेच विद्यार्थी व तरुण वर्ग, उद्योजक, व्यावसायिक अशासाठी ग्रंथालय/वाचनालय यांचीहि व्यवस्था करण्यात यावी.

**अशा कामासाठी** प्रतिष्ठानकडे तूर्त निधी उपलब्ध नाही - **निधी उभारणी करावी लागेल.** याबाबत लवकरच निश्चित योजना/कल्पना सर्व सभासदांपुढे येईलच. **तूर्त सर्व सभासदांना हे प्रेमपूर्वक आवाहन.**

मुंबई, पुणे अथवा कोकणात ज्या सभासदांकडे रिकामी जागा अगर जमीन आहे आणि ती त्यांच्या वापरात नाही, भविष्यातहि वापरात आणण्याची शक्यता/गरज नाही. असे कुलबांधव प्रतिष्ठानला मोलाची मदत करू शकतील. कृपया त्वरित संपर्क साधावा अशी कार्यकारी मंडळातर्फे कळकळीची विनंती आहे.

१६ मे च्या सभेत प्रामुख्याने गोवा संमेलनाचा आढावा घेण्यात आला. जमाखर्चाच्या आढाव्यावरून सुमारे किमान ५० हजार रुपये या संमेलनातून उरतील त्यामुळे संमेलनाला साजेसा रंगीत कव्हरसह हितगुजचा संमेलन विशेषांक काढावा व यासाठी संमेलन खर्चात रुपये १५ हजार तरतूद करावी असे या सभेत ठरल्याचे समन्वयक लक्ष्मण शंकर यांनी सांगितले.

तसेच संमेलनातील त्रुटी व कमतरतायांचाहि विचार करण्यात आला. विशेषत: पुण्यातील प्रतिनिधींची राहण्याची सोय संमेलन स्थळापासून जवळ न झाल्यामुळे रात्री उशीरापर्यंत चालणारे व सकाळी लवकर होणारे कार्यक्रम पाहण्याबाबत त्यांची गैरसोय झाली याची नोंद घेऊन यापुढे असे प्रकार होऊ नये म्हणून दक्षता घ्यावी असे ठरविण्यात आले.

**देणग्या -**

मार्च २००५ ते मे २००५ या तिमाहीत मिळालेल्या रकमांचा तपशील.

**सभासदत्व व हितगुज वर्गणी : (प्रत्येकी रु. ३००) -**

सौ. उमा उदय केळकर, मुलुंड, मुंबई, सौ. राधिका मुकुंद लेले, पुणे, सौ. अलका विनायक जोशी, जमशेटपूर, सौ. सुषमा वसंत पळनिटकर, विलेपार्ले, मुंबई, सर्वश्री विजयकुमार भिकाजी, दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग, डॉ. प्रमोद अरुण, बुलढाणा, बाळकृष्ण अनंत, उपळे-राजापूर, राम कृष्णाजी, गोरेगाव, जि. रायगड, महेश्वर एम. मराठे, रामदुर्ग, जि. बेळगाव, विजय यशवंत, डोंबिवली, उत्तम नारायण, बडोदा. (एकूण ११)

**आजीव सभासद : (प्रत्येकी रु. १००)**

सौ. वैशाली विजयकुमार व श्री. चंद्रशेखर विजयकुमार, दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग, सौ. उत्कर्षा उल्हास दाते, डोंबिवली, सौ. संपदा सुबोध गोखले, नौपाडा, ठाणे. (एकूण ४)

**शिक्षण निधी देणगी -**

श्रीमती आशा सुरेश, साखळी, गोवा यांनी कै. सुरेश त्र्यंबक यांच्या स्मरणार्थ शिक्षण निधीसाठी रु. ३००० देणगी दिली.

## १०वी, १२वी, पदविका, पदवी व अन्य परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

**गुणवत्ता पारितोषिके २००४-०५ साठी १५ ऑगस्ट पूर्वी अर्ज पाठवावे**

१०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक/स्पर्धा परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. **अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

**याशिवाय कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पुढील पारितोषिकेहि** देण्यात येतात-

**१. कै. कु. अनिता खांबेटे पारितोषिके -**

इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी) या परीक्षांत मराठे परिवारांत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यास प्रत्येकी रु. २५०

**२. सौ. सुलभा अनंत प्रायोजित पारितोषिक-**

इ. १०वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारांत सर्वाधिक गुणांसाठी रु. १००

**३. प्रभाकर गणेश प्रायोजित पारितोषिक - रु. ५०० - पात्रतेचे निकष -**

i) तांत्रिक विषय घेऊन (vocational) १०वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुण,

ii) "१०वीला तांत्रिक विषय नसले तरी १०वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कंप्युटर इंजिनियरिंग यांसारख्या अभियांत्रिकीच्या कोणत्याहि विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणारा विद्यार्थी/विद्यार्थिनी,

iii) मात्र १०वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यांत यावा.

**४. कै. जगन्नाथ दामोदर शिष्यवृत्ती - वार्षिक रु. २०००**

ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.)

**५. शालिनी धुंडिराज प्रायोजित वैदिक शिक्षण अथवा हिंदुधर्माचा प्रचार यांसाठी** - वार्षिक पुरस्कार रु. १०००.

**६. शैक्षणिक कर्ज -**

**विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/ इंजिनिरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यांसाठीचे अर्ज **१५ ऑगस्ट २००५ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे.** अर्ज फक्त २००४-०५ या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत अर्जाला जोडून पाठवावी, नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. खास बक्षिस योजनेखाली (उदा. हिंदी अथवा तांत्रिक विषय) अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.

पत्रोत्तर देण्यासाठी **अर्जात पूर्ण पत्ता** लिहावा.

**शैक्षणिक, वैद्यकीय मदत**

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजारासाठीहि खास निधीतून (विशिष्ट हेतु निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

***


मुंबई गोवा मार्गाने सावंतवाडीहून गोव्यांत (अस्नोडा) प्रवेश करतांच तिथून केवळ ५ किमी वर सर्व सोयींनी सुसज्ज पर्यटक निवास

**कोटेश्वर रेसिडेन्सी**

*(एसी व नॉन एसी रूम्स)*

सुंदरपेठ, डिचोली, गोवा ४०३ ५०४.
फोन: ३९५००६३.

डिचोली मेनरोडवर भरबाजारांत २४ तास पाणी, वीज, फ्रीज, टेलिफोन, टीव्ही इ. सर्व सोयी उपलब्ध.



मराठे प्रतिष्ठान मुखपत्र 'हितगुज'ला शुभेच्छा !

**श्री. निलेंद्र दत्तोबा मराठे**

६४/१ तामसडो, धारबांदोडा,
व्हाया फोंडा गोवा - ४०३ ४०६.
(दूरध्वनी : ०८३२-२६१४०४३, २६१४१५१
मोबाईल : ९४२२०५५६४७

*वाहतुक व्यवसाय व वृत्तपत्र विक्रेता*

# स्थानिक कलावंतांचे कार्यक्रम









## संमेलन स्मृति-चिन्ह





















